Dr. Dattatray S. Sawant
Dept. of Political Science,
ACS College, Lanja

# प्रकरण १. महाराष्ट्राची राजकीय अर्थव्यवस्था.

## प्रश्न १. रा. सहकारी चळवळ आणि महाराष्ट्राचे राजकारण यावर चर्चा करा.

## महाराष्ट्राचे राजकारण व सहकारी क्षेत्राची वाटचाल स्पष्ट करा.

**१. सहकारी चळवळ -**

भारतात सहकारविषयक पहिला कायदा १९०४ साली मंजूर झाला. १९१२, १९१९,१९२५ या वर्षी निरनिरा

ळे कायदे करून या कायद्यातील उणीवा दूर करण्यात आल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण पत सर्वेक्षण समिती १९५४ व वैकुंटलाल मेहता समिती १९६० यांच्या अहवालात व पंचवार्षिक योजनांच्या मसुद्यांत सहकाराचा सातत्याने पुरस्कार करण्यात आला. देशातील पहिला सहकारी साखर कारखाना महाराष्ट्रात १९४९ मध्ये प्रवरानगर, लोणी जि. अहमदनगर येथे सुरू झाला. देशातील सहकारी चळवळीत आज महाराष्ट्र आघाडीवर आहे. त्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला खंबीर व गतिमान नेतृत्व लाभले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, यशवंतराव मोहिते, शरद पवार अशा राजकारणी नेत्यांनी सहकारी चळवळ रूजविण्यासाठी प्रयत्न केले. आर्थिक मंदीच्या काळातही या संस्था टिकाव्यात म्हणून शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. या संस्थांनी स्वतःच्या पायावर उभे रहावे, दुर्बल गटांना अधिकाधिक सहाय्य द्यावे यासाठी सहकारबाबत राज्य सरकारने उदार धोरण स्वीकारले. देशातील वित्तिय संस्थांनीही सहकारी संस्थांना वित्तसाहय करून त्यांच्या विकासात हातभार लावला.

**२. सहकारी क्षेत्राची वाटचाल -**

**अ. सहकारी संस्था -** महाराष्ट्र राज्य कृषी पतपुरवठा शेती, आदिवासी विकास, बहुउद्देशी पतपुरवठा, साठवणे, सूतगिरण्या, कापसाच्या गाठी बनवणे, तेल गाळणे, साखर उद्योग, गूळ उद्योग, हातमाग, औद्योगिक प्रक्रिया, ग्राहक भंडारे, मत्स्य व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, वराहपालन, मधुमक्षिकापालन, रेशीम उद्योग, घरबांधणी, नागरी बँका, वाहतूक सेवा, विणकाम, चर्मोद्योग, छपाईधंदा, हॉटेल अशा अनेक क्षेत्रामध्ये सहकारी संस्था पोहचल्या आहेत.

**ब. सहकारी संस्थाची यंत्रणा -** सहकारी संस्था तीन स्तरांवर काम करतात. गाव पातळीवर कृषि पतसंस्था, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राज्यस्तरावर राज्य सहकारी बँक अशी सहकारी पतयंत्रणा आहे. सहकारी शेतीची प्रगती राज्यात समाधानकारक नाही. पणन संस्था, ग्राहक भांडारे याची देखील द्विस्तरीय वा त्रिस्तरीय यंत्रणा राज्यात काम करते. त्यांच्यामार्फत राज्यातील ग्राहकांच्या गरजा पुरविल्या जातात.

**क. सहकारी सूत गिरणी -** सहकारी सूत गिरणी क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे. देशातील सुमारे ८% यंत्रमाग कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकंरजी गावात आहे. देशातील सर्वात मोठी सहकारी सूतगिरणी इचलकरंजी येथे सुरू करण्यात आली. मात्र १९८७ नंतरच्या कालखंडात केंद्र सरकारच्या नव्या वस्त्रोद्योग धोरणाने राज्यातील सुतउद्योगांचे कंबरडे मोडले आहे. कापूस, सूत, रसायने यांचे वाढते भाव, वाढता कर्जबाजारीपणा व सदोष व्यवस्थापन यामुळे या उद्योगास हलाखीची परिस्थिती आली आहे. कच्चा माल नियंत्रित दरात मिळावा, कापडावरील सबसिडी वाढवावी अशा मागण्या या उद्योगांकडून केल्या जातात. शेतकऱ्यांसाठी खते, कीटकनाशके, डिझेल, शेतीतील यंत्रासामुग्री यांचे वितरण सहकारी संस्था करत आहेत.

**ड. सहकारी साखर कारखाने -** सहकारी साखर कारखाने ही महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची सर्वात उल्लेखनीय बाब आहे. महाराष्ट्रात २०० हून अधिक सहकारी साखर कारखाने आहेत. त्यापैकी ९२ कारखाने उत्पादन करीत आहेत. राज्यातील साखर कारखान्यांचे ७.५ लाख सभासद आहेत. त्यापैकी ६.९ लाख ऊस उत्पादक शेतकरी सभासद आहेत. राज्यात साखर कारखान्यामध्ये एकूण अंदाजे १०,००० कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक आहे आणि त्याची वार्षिक उलाढाल अंदाजे २५,००० कोटी रुपयांची आहे. जळगाव, धुळे, नाशिक, औरंगाबाद, जालना, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांमध्ये बहुसंख्य सहकारी कारखाने आहेत. उसाची लागवड, रसायन उद्योग, वाहतूक व्यवसाय, शेतीतील यंत्रसामग्री, सहकारी बँका अशा अनेक व्यवसायांना साखर कारखान्यानी चालना दिली आहे. प्रत्येक कारखान्यामागे सरासरी सुमारे ७,७०० सभासद आहेत. त्यापैकी ९३% लहान शेतकरी आहेत. गाळप हंगामात दर कारखान्यामागे सुमारे ५,००० व्यक्तींना रोजगार मिळतो. सहकारी साखर कारखान्यात १०% शेतकऱ्यांचे भांडवल, २५% राज्यसरकारने व ६५% वित्तीय संस्थाचे भांडवल असते. केंद्र शासनाच्या शिथिलीकरणाच्या धोरणानुसार आता खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांनाही मुक्तपणे परवाने दिले जात आहेत. यामुळे पुन्हा खाजगी व सहकारी क्षेत्रातील कारखान्यामध्ये स्पर्धा सुरू झाली आहे.

गेल्या काही वर्षात सहकारी साखर कारखान्यांनी फार मोठी प्रमाणात उत्पादनाचे आणि कामाचे विविधीकरण केले आहे. साखर उत्पादनाबरोबर कृषी औद्योगिक प्रकल्प, मद्य-मद्यार्क रसायने आम्ले, कागद यांची निर्मिती, जलसिंचन योजना, रस्ते व घरबांधनी, भूमिहीनांना घरे, इस्पितळे, शाळा, महाविद्यालये चालविणे, नागरी सहकारी संस्था चालविणे, दुग्धव्यवसाय, पशुखाद्य व कोंबडीचे खाद्य तयार करणे, कुक्कटपालन, वराहपालन संस्था चालविणे, वस्तुभांडार चालविणे अशा अनेक मार्गानी हे विविधीकरण दिसून येते. साखर कारखान्यांच्या कागद व्यवसायाने हळूहळू मूळ धरले आहे. साखर कारखान्यांनी आज वैद्यकीय महाविद्यालये व स्वतःची संशोधन संस्था उभारली आहे.

**३. सहकारी चळवळ आणि महाराष्ट्राचे राजकारण -**

महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी चळवळीने मोलाची भूमिका बजावलेली आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील सत्तेची विविध केंद्रे आपल्या ताब्यात ठेवण्यात सहकारी संस्थांचे पुढारी यशस्वी झालेले आहेत. म्हणून ग्रामीण भागात सहकारी संस्था या राजकीय सत्तेच्या शक्तिस्रोत समजल्या जातात. आज महाराष्ट्राचे राजकारण तीन आखाड्यात खेळले जाते. त्यातील पहिला आखाडा राज्यस्तरावर, दुसरा आखाडा पंचायतीराज संस्थांचे राजकारण, तिसरा आखाडा सहकारी संस्थांचे राजकारण हा आहे. सहकारी संस्थांमध्ये साखर कारखान्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. सत्तेच्या राजकारणासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री आणि लोकांचा पाठिंबा साखर कारखान्यांच्या मदतीने मिळविता येतो. सत्तेच्या राजकारणाचे हे तिन्ही आखाडे राजकीय सत्तेने नियंत्रित केलेले आहेत. या सर्व संस्थांच्या परस्पर व्यवहरामध्ये काँग्रेस पक्षाची भूमिका महत्वाची आहे. राज्यातील सहकारी संस्थांचे राजकारण हे काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत राजकारणाशी संबंधित आहे. सहकारी चळवळ आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचे विविध पैलू खालीलप्रमाणे आहेत

**अ) सहकारी संस्था नवीन सत्ता केंद्रे** : महाराष्ट्रची स्थापना झाल्यानंतर पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या कृषि औद्योगिक विकासाचा कार्यक्रम राबवायला सुरुवात केली. शेती,

सहकार, वीज, पाटबांधारे यांचा विकास करून ग्रामीण भागात शेतमालावर प्रक्रिया करणारे कारखाने उभे करावेत, असे त्यांचे मत होते. म्हणजे ग्रामीण भागातील लोकांची व कार्यकर्त्यांची कर्तृत्वशक्ती जागृत करून विकास प्रक्रिया त्यांना गतिमान करावयाच्या होत्या. शेती क्षेत्रासाठी उपयुक्त अशा सहकारी पतसंस्था व सेवा सहकारी संस्था स्थापन करून ग्रामीण भागात प्रभाव क्षेत्र निर्माण होतील, कर्तृत्वान कार्यकर्ते निर्माण होतील आणि ग्रामीण भागाचा कायापालट होईल, असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांनी सहकारी क्षेत्रातील लोकांना त्यांनी काँग्रेस पक्षात सामावून घेतले. विरोधी पक्षांतून काँग्रेसमध्ये आलेल्या अनेक पुढाऱ्यांना त्यांनी सहकारी संस्थात अधिकारपदे दिली. अनेकांना त्यांनी सहकारी साखर कारखाने काढावयास प्रवृत्त केले. थोडक्यात १९६० नंतर यशवंतरावानी राजकीय सत्ता आणि प्रभाव संपादन करण्याचा एक नवा मार्ग या पुढाऱ्यांच्या पुढे खुला केला.

थोडक्यात सहकारी चळवळ राजकीय कार्यकर्त्यांसाठी उपयुक्त चळवळ आहे. कारण या संस्थांच्या साहाय्याने राजकीय कार्यकर्ते ग्रामीण भागात आपले प्रभाव क्षेत्र निर्माण करतात. आपल्या समर्थकांचे एक जाळे निर्माण होते. सहकारी संस्थांच्या जवळ जी साधनसामुग्री असते त्या साधनांचा निवडणुकीत वापर करता येतो. सहकारी साखर कारखान्याजवळ साधनांची विपुलता असल्याने बहुतेक राजकीय पुढाऱ्यांना सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात पुढाकार घेतला.

**ब) जिल्हा मध्यवर्ती बँका :** निरनिराळया सहकारी संस्थांच्या विकास कार्यास आर्थिक मदत पुरविण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक करते. शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्जपुरवठा करण्याचे कार्य बँकने करतात. पूर्वीच्या काळी या सहकारी बँका शहरी पुढाऱ्यांच्या हातात होत्या आणि त्यांचे कार्यक्षेत्र बरेचसे मर्यादित होते. परंतु ग्रामीण भागात शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या संस्थांतील मुख्य संस्था म्हणून तिला मान्यता मिळल्यानंतर बँकाच्या कायद्यात अनेक बदल करण्यात आले. १९६० नंतर या बँका ग्रामीण भागातील राजकीय पुढाऱ्यांच्या ताब्यात आल्या. सरकारच्या अनेक योजना या बँकांच्याद्वारे राबविण्यात आल्या. शेतकऱ्यांना खते, बी-बीयाणे कर्जाऊ देण्यात आले. सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यासाठीचे बीज भांडवल या बँकाच्या मदतीने गोळा करण्यात आले. सहकारी बँकाच्या नियंत्रणाद्वारे लोकांशी जवळचे संबंध प्रस्थापित झाले आणि त्यातून राजकीय पुढाऱ्यांची एक नवी फळी राजकारणात आली. सहकारी चळवळीतील मोक्याच्या बहुसंख्य जागा मराठा जातीतील पुढाऱ्यांना मिळाल्या. जैन, लिंगायत, लेवा पाटील वगैरे शेती क्षेत्रात मालमत्ता असणाऱ्या जातीतील पुढाऱ्यांनाही त्यात महत्वाच्या जागा मिळाल्या.

**क) काँग्रेस पक्षांतर्गात राजकारण व सहकारी चळवळ :** महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील राजकारणामध्ये पंचायतीराज्य संस्था व सहकारी संस्थांचे जवळचे संबंध आहेत. या संस्था सत्तेचे केंद्रस्थान असल्यामुळे त्या संस्थाच्या राजकारणात मोठ्या प्रमाणात सत्ता संघर्ष होतो. या गटबाजीच्या राजकारणाचा संबंध कांग्रेसपक्षातील गटबाजीशी व सत्तासंघर्षाशी असतो, म्हणून या सत्तासंघर्षात हस्तक्षेप करून मतभेदांचे निराकरण करण्याचे काम काँग्रेस पक्षाला करावे लागते.

**ड) साखरेचे राजकारण** - स्थानिक राजकारणाच्या संदर्भात सहकारी साखर कारखाने राजकीय सत्तेची केंद्रे आहेत. त्यामुळे प्रत्येक साखर कारखान्याच्या अध्यक्षास आमदार, खासदार किंवा मंत्री व्हावयाचे असते किंवा प्रत्येक आमदार, खासदार व मंत्री आपला स्वतःचा असा कारखाना स्थापन करण्याची इच्छा बाळगून असतो. ज्या उमेदवराच्या पाठीमागे साखर कारखान्याचे बळ असते तो विधानसभेत किंवा लोकसभेत सहज निवडून येतो.

**इ) राज्यपातळीवरील राजकारणावरचा प्रभाव -** महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील राजकारणाचा राज्यपातळीवरील राजकारणाशी व काँग्रेस पक्षाच्या राजकारणाशी जवळचा संबंध आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सहकारी संस्थांवर सरकारचे नियंत्रण असते. सहकारी संस्थांची रचना, निवडणुका, अध्यक्षपदाची मुदत याबाबतचे कायदे करण्यचा राज्यसरकारला अधिकार असतो. शिवाय राज्य पातळीवर सत्तेत वाटा मिळविण्याची सर्वच राजकीय पुढाऱ्यांची इच्छा असते.

महाराष्ट्राच्या राजकारणात १९६५-६६ नंतर काही बदल झाले. १९६७ साली वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्र प्रदेश समितीचे अध्यक्ष विनायकराव पाटील हे राज्याचे सहकार मंत्री झाले. १९६८ साली केंद्रसरकारने आणखी काही नव्या साखर कारखान्यांना मंजुरी दिल्याने साखर कारखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. त्यातून साखर कारखान्यांत स्वतःचा पैसा न घालता समाजाच्या पैशाचा गैरवापर करणारे साखरसम्राट निर्माण होत आहेत, हे त्यांच्या लक्षात आले. वसंतराव नाईक यांनाही साखर काखानदारांच्या वाढत्या सामर्थ्याची भीती वाटत होती. म्हणूनच त्यांनी ६ वर्षापेक्षा कोणत्याही पदाधिकाऱ्याकडे साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी राहू नये, असा नियम करण्याचा घाट घातला. वसंतदादा सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष असलेल्या वसंतदादा पाटीलांनी त्यास विरोध केला. शेवटी सरकारला हा नियम लागू करता आला नाही.

वसंतदादा पाटील यांची १९७२ मध्ये नाईक सरकारात पाटबंधारे मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी मंत्रिपद स्वीकारल्यानंतर सहकारी साखर कारखानदारांची लॉबी जास्त प्रबळ झाली. त्यांच्या दबावामुळे १९७५ साली वसंतराव नाईक यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर चार साडेचार महिन्यातच आणीबाणीची घोषणा करण्यात आली. त्यांनी सहकारी संस्थांची सत्ता कमी करण्याचा प्रयत्न सुरू केला. आणीबाणीच्या काळात त्यांच्या या धोरणामुळे साखर कारखानदार चिडलेले होते. ते चव्हाणांना पदच्युत करण्याची वाट पाहात होते. १९७७ साली चव्हाणांची उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या जागी वसंतदादा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

१९७८ साली काँग्रेस पक्षाचे विभाजन झाले. त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखानदारांची लॉबीही विभागली गेली. जुलै १९७८ मध्ये शदर पवारांनी वसंतदादांचे सरकार खाली खेचले व ते मुख्यमंत्री झाले. त्यामुळे राज्यातील सहकारी साखर कारखानदारांची लॉबी पुनः विभागली. वसंतदादा राज्याच्या राजकारणात एकाकी पडले. १९७८ च्या साखर कारखाना निवडणुकीत शरद पवारांच्या गटाने वसंतदादा गटाला मोठे आवाहन दिले. १९७८-७९ साली वसंतदादा अडचणीत असतानाही सहकारी चळवळीतील त्यांच्या कामामुळे ते राजकारणात टिकू शकले. त्यांनी आपले सामर्थ्य राखून ठेवले व १९७९ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत चांगल्या जागा मिळविल्या. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत शरद पवारांनी अनेक साखर कारखानदार उभे केले होते पण ते पराभूत झाले. खुद्द वसंतदादा लोकसभेवर निवडून गेले. बहुतेक साखर कारखानदारांच्या हे लक्षात आले की, काँग्रेस पक्षाची अधिमान्यता असल्याशिवाय निवडणुक जिंकता येत नाही.

श्री. शंकरराव चव्हाण यांनी पुन्हा मुख्यमंत्री झाल्यावर (१९८६) सहकारी साखर कारखानदारांचे पंख कापन्यास सुरुवात केली. सहकारी साखर कारखानदारांनी लोकांना गुलाम केले आहे, असे त्यांचे मत होते. सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षांनी निर्माण केलेले खाजगी ट्रस्ट त्यांनी सहकारी साखर कारखान्याच्या विद्यमान संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली आणले.

पाण्याच्या बारमाही पुरवठ्याऐवजी आठमाही पाणीपुरवठा करण्यात यावा, असे मत त्यांनी मांडले. नव्या धरणांच्या बाबतीत हे धोरण अंमलात आणले जाईल, असे त्यांनी सांगितले. वसंतदादा त्यावेळी राजस्थानचे राज्यपाल होते. पण शंकररावांच्या धोरणामुळे आपली लॉबी कमजोर होत आहे, म्हणून त्यांनी राज्यपाल पदाचा राजीनामा दिला. शरद पवार यांच्यावर जुना राग असूनही त्यांच्याशी हातमिळवणी केली. शरद पवार यांनी मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतर सहकारी साखर कारखाने आपल्या मागे उभे करण्यास सुरुवात केली. पुन्हा एकदा 'शुगर लॉबी"चे वर्चस्व प्रस्थापित झाले.

**४. सारांश -**

महाराष्ट्राच्या राजकारणावर सहकारी क्षेत्रातील बँकाचे व साखर कारखान्यांचे वर्चस्व आहे. या वर्चस्याचे स्वरूप अनेकपदरी आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अशा प्रकारच्या राजकारणास उत्तेजन देत असत. २०१४ पर्यंत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्रात सत्तेवर असताना, स्वतःचे हित जोपासण्यासाठी 'शुगर लॉबी'ला त्यांचा पाठिंबा होता. मात्र २०१४ मध्ये महाराष्ट्रात सत्तापालट झाल्यानंतर अनेक सहकार महर्षी भाजपामध्ये दाखल झाले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील राजकारणावरील काँग्रेस-राष्ट्रवादी पक्षांची पकड शिथिल झाली आहे. सहकारी साखर कारख्यान्यांच्या 'मालक' वर्गाला आपले हितसंबंध जोपासायचे असतात. त्यामुळे १९९५-९९ आणि २०१४ नंतर त्यांनी शिवसेना भाजपाशी जुळवून घेतले आहे.

**प्रश्न २. ला. व्यापारी-उद्योजक वर्ग आणि महाराष्ट्राचे राजकारण स्पष्ट करा.**

**दबावगट म्हणजे काय ते सांगून व्यापारी-उद्योजकांचा दबावगट व महाराष्ट्राचे राजकारण यावर चर्चा करा.**

**१. प्रास्तविक -**

दबावगट किंवा सक्रिय हितसंबंधी गट हे राजकीय प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटक असतात, असे मत डेव्हिड इस्टन व गॅब्रिएल आलमंड सारख्या वर्तनवादी व आर्थर बेंटले डॅनियल टुमन, अर्ल लेथेम सारख्या समूहात्मक विचारवंतांनी मांडले. आर्थर बेंटलेने The Process of Government या ग्रंथात असे स्पष्ट केले की, "समाज म्हणजे केवळ संस्थात्मक रचनांचा व मूल्यांचा आकृतिबंध नसून गतिमान कृतींची आणि प्रक्रियांची ती एक संबंध साखळी असते." कल्पना, विचार, भावना, कायदे व घटना समित्यांचे निर्णय यांना स्वतःचा स्वतंत्र अर्थ नसतो, कोणत्या तरी कृतीशी संबंध आल्यावरच त्यांना अर्थ प्राप्त होतो.

**२. दबावगट -**

हितसंबंधी गट (Interest group), दबाव गट (Pressure group) लॉबी (Lobby) हे शब्द बऱ्याच वेळा समानार्थी वापरले जातात. परंतु त्यात फरक आहे. हितसंबंधाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी स्थापन झालेला म्हणजे हितसंबंधी गट होय. सामाजिक संबंधातून व गरजांतून असे गट निर्माण होतात. भारताच्या सामाजिक इतिहासात निर्माण झालेली जातीसंस्था, महाराष्ट्रातील बलुतेदारांची पद्धती ही हितसंबंधी गटाची उदाहरण आहेत. विशिष्ट व्यवसायाचे कौशल्य जतन करणे, ते पुढील पिढ्यांना देणे, इतर गटांकडून होणाऱ्या आक्रमणापासून बचाव करणे या हेतूने गट निर्माण होतात. या सर्वांना दबावगट म्हणणे योग्य नाही. आपल्या मागण्यांच्या पूर्तीसाठी दबावाचा, प्रभावाचा वापर यशस्वीपणे करू पाहणाऱ्या हितसंबंधी गटांना दबाव गट मानता येईल. प्रत्येक दबाव गट हा

हितसंबंधी गट असतो. अशा गटाने आपल्या कार्यसिद्धीसाठी सामाजिक, आर्थिक दडपण वापरावयास सुरुवात केली की, त्याचे दबावगटात रूपांतर होते. जे दबावगट अशाप्रकारे यशस्वी दडपण आणून राजकीय प्रक्रियेवर परिणाम घडवितात त्यांना राजकीयदृष्ट्या सक्रिय किंवा प्रभावी गट असे म्हणतात.

प्रातिनिधिक लोकशाहीच्या विकासाबरोबर, १९ व्या शतकापासून विधिमंडळावर प्रभाव पाडणारे गट निर्माण झाले. या गटांना लॉबी असेही नाव मिळाले. सामान्य नागरिक व शासकीय धोरण ठरविणारे विधिमंडळाचे सभासद यांच्यात दुवा साधणारी लॉबी ही राजकीय संसूचनाची प्रक्रिया आहे. दबाव गटांचे काही सभासद विधिमंडळाच्या आवारात विधिमंडळाच्या सभासदांना भेटून त्यांच्यावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ महाराष्ट्राच्या राजकारणात 'शुगर लॉबी' प्रभावी आहे. 'लॉबी' ही एक प्रक्रिया आहे. हितसंबंधी गट कायदे निर्माण करीत नाहीत तर ते कायदे निर्माण करण्याच्या विधिमंडळाच्या सभासदांवर प्रभाव पाडण्यासाठी प्रयत्नशील असतात.

**३. दबावगट व्याख्या -**

i. फ्रान्सिस कैंसल्स - 'दबावगट हा शासकीय किंवा अन्य मार्गांनी राजकीय परिवर्तन साधण्याचा प्रयत्न करतो. परंतु विधिमंडळात प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय पक्षासारखे त्याचे स्वरूप नसते'.

ii. डेव्हिड ट्रमनच्या - "इतर समानशील गटांवर प्रभाव पाडणारा, समान उद्दिष्ट असणारा गट हितसंबंधी गट होय. असा गट ज्यावेळी शासनाच्या विभागामार्फत अथवा शासनावर आपल्या मागण्यांचे दडपण निर्माण करतो त्यावेळी तो राजकीय हितसंबंधी गट बनतो.

"राजकीय हितसंबंधी गट शासकीय प्रक्रियेवर परिणाम करू पाहतात. हितसंबंधी गट आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी केवळ बघ्याची भूमिका न घेता प्रत्यक्ष कार्य करतात. म्हणून गॅब्रिएल अल्मंड यांनी 'शासकीय हितसंबंधी' गट असाही शब्दप्रयोग केला आहे. व्ही. ओ. की यांनी 'सरकारी धोरणावर प्रभाव पाडण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या खाजगी संघटना असे विवरण केले आहे.

**४. व्यापारी उद्योजक वर्ग :**

पारंपारिक जातीप्रधान भारतीय समाजव्यवस्थेत व्यापार करणाऱ्या लोकांचा वैश्य जातीसमूहात समावेश होत असे. व्यापार, सावकारी या मार्गाने हा वर्ग आपले उदरभरण करत. ब्रिटिश काळात या व्यापारी वर्गाने भारतात उत्पादित कापूस, तंबाखू हा कच्चा माल इंग्लंडला निर्यात करणाच्या व्यवसाय केला. वऱ्हाडातील कापूस खरेदी मुंबई शहरातील गुजराथी, मारवाड़ी-पारशी व्यापारी वर्ग करत असे. १९व्या शतकाच्या शेवटी भारतात औद्योगिकरणाची प्रक्रिया सुरू झाल्याने आयात-निर्यात व सावकारीच्या व्यवसायातून श्रीमंत देशी व्यापाऱ्यांनी सुरुवातीस थोड्या फार प्रमाणात उद्योगधंद्यात भांडवलाची गुंतवणूक केली. २० व्या शतकात व्यापारी वर्गातील अधिक संपन्न वर्ग उद्योजक वर्ग झाला. देशी भांडवलांद्वारा व्यतिरिक्त परकीय भांडवलदारांनीही भारतात उद्योग व्यवसायात व कारखानदारीत मोठी भांडवली गुंतवणूक केली. खनिज तेलावर प्रक्रिया करणारे सर्व उद्योग, चहा व कॉफीचे मळे, ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणारे कोलगेट, पामोलिव्ह, हिंदुस्तान लिवर इ. उद्योग परकीय भांडवलदार किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे होते. स्वातंत्र्यानंतर परकीयांच्या मालकीच्या काही उद्योग-व्यवसायांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. उदाहरणार्थ खनिज तेलाचे उत्पादन करणाऱ्या बर्माशिल सारख्या कंपन्या; तसेच अन्य व्यवसायात परकीय भागभांडवल ५०% हून कमी असेल असे निर्बंध लादण्यात आले. हे निर्बंध जागतिकीकरनानंतर शिथिल केले आहेत.

या घटकांव्यतिरिक्त संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर सहकारी क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. सहकारी क्षेत्रातील अनेक उद्योग-व्यवसायांची आर्थिक क्षमता फार मोठी आहे आणि त्यांचे स्वतःचे विशिष्ट स्वरूपाचे हितसंबंध आहे. अशा प्रकारे सहकारी संस्था चालवणाऱ्या संचालकांचा सहकारी भांडवलदार वर्ग महाराष्ट्रात अस्तित्वात आला आहे. या नवीन भांडवलदार वर्गाचे ग्रामीण अर्थव्यवस्था व राजकारणावर नियंत्रण आणि प्रभाव आहे. वरील विवेचनाच्या आधारे व्यापारी-उद्योजक वर्गातील प्रमुख घटक पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

i. छोटे आणि पाऊक व्यापारी.
ii. देशी व विदेशी सावकार.
iii. स्वतः च्या भांडवलातून उद्योग उभारणारे देशी उद्योजक.
iv. जनतेकडून भाग-भांडवल गोळा करून उद्योग व्यवसाय चालवणारे उद्योगसमूह.
v. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे उद्योग व्यवसाय.
vi. भाग-भांडवलधारकांच्या सहकारी संस्था.

**५.व्यापारी-उद्योजक वर्ग आणि राजकारण -**

राज्यकर्ते व सावकार यांचे फार जुने संबंध आहेत. मराठ्यांच्या उतरत्या काळात पेशवे पुण्यातील ब्राह्मण- मारवाडी सावकारांकडून कर्ज घेत. अशा सावकारांचा पेशव्यांचा दरबारात दबदबा असे, परंतु राकारणावरील त्यांचा प्रभाव नगण्य होता. सन १७५७ ते १८५८ या कालखंडात या काळात भारतावर ईस्ट इंडिया कंपनी या व्यापाऱ्यांच्या संस्थेने राज्य केले. त्यांना राज्यकारभार करण्यापेक्षा नफा कमावण्यात अधिक स्वारस्य होते.

**अ. स्वातंत्र्यपूर्व कालखंड -**

१९ व्या शतकात भारतात औद्योगिकरणाची प्रक्रिया सुरू झाली. तत्पूर्वी भारतातील व्यापारी वर्गाने आयात-निर्यात व्यवसायाद्वारे, कृषी उत्पादनाच्या खरेदी व्यवहारात व सावकारीच्या मार्गाने अमाप नफा कमवला. १९ व्या व २० व्या शतकात देशी सावकारांनी संपत्तीची अधिक फायदेशीर अशा कारखानदारीत गुंतवणूक केली. त्यातून भारतीय उद्योजक वर्ग उदयास आला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आपल्या व्यवसाय व कारखानदारीकडे अधिक उदार धोरण स्वीकारावे, या उद्देशाने शासनावर प्रभाव पाडण्याकरीता विदेशी उद्योजकांप्रमाणेच देशी व्यापारी उद्योजकांनी त्यांच्या संघटना स्थापन केल्या. पुढे लोकमान्य टिळकांनी परकीय मालावर बहिष्कार व स्वदेशीचा पुरस्कार केल्यानंतर या वर्गाच्या दृष्टिकोनात बदल घडून आला. मुंबई शहरात इंडियन मर्चंटस चेंबरच्या कार्यात दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा, पुरुषोत्तमदास ठाकूरदास, इब्राहिम रहिमतुल्ला हे राष्ट्रीय नेते सहभागी होत असे. त्याचाच परिणाम म्हणजे या संघटनांनी राजकीय व घटनात्मक सुधारनाना उघडपणे पाठिंबा देण्यास सुरुवात केली. गांधी युगात राष्ट्रीय महासभेचे जनआंदोलनात रूपांतर झाले. असे जनआंदोलन चालविण्याकरिता आवश्यक असलेले आर्थिक पाठबळ देशी व्यापारी उद्योजकांनी उपलब्ध करून दिले. त्याचप्रमाणे पाकिस्तान चळवळीला मुंबईतील खोजा, बाहेरी, मेमन इ. जमातीच्या व्यापारी वर्गानि आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले होते. बजाज व बिर्ला या दोन प्रमुख उद्योजक कुटुंबांचे राष्ट्रीय महासभा व व्यक्तिशः गांधीशी घनिष्ट संबंध होते.

टिकाकारांच्या मते, काँग्रेसने भारतीय कामगार चळवळीविषयी फारशी आस्था दाखविली नाही. कारण काँग्रेस नेत्यांवर भांडवलदार वर्गाचा प्रभाव होता. मात्र गांधीनी देशी उद्योजकांना त्यांच्या हितसंबंधाच्या पूर्ततेकरिता काँग्रेसचा वापर करू दिला नाही. १९३७ व १९४५ च्या

निवडणुकीत काँग्रेसी उमेदवारांनी आपापला खर्च केला. निवडणुकीकरिता व्यापारी उद्योजकांच्या अर्थसहाय्याची गरज नव्हती. म्हणजे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात राष्ट्रीय महासभा आणि व्यापारी उद्योजक यांचे संबंध सौहार्दपूर्ण होते आणि देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्दिष्टांबाबत त्यांच्यात एकमत होते. त्याकरिता समाजातील इतर वर्गांप्रमाणेच व्यापारी उद्योजक महासभेला अर्थसाह्य करत असे.

**ब. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील संबंधाचे बदलते स्वरूप -**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात उद्योजक-व्यापारी वर्ग आणि राजकीय पक्ष यांच्यातील संबंधात गुणात्मक बदल घडून आले. यासंबंधांचे विश्लेषण पुढील चार टप्प्यात करता येते.

- **व्यापारी उद्योजकांचे हितसंबंधी गट :** स्वातंत्र्योत्तर काळात राज्यकर्त्यांनी लोककल्याणकारी राज्य व नंतर समाजवादी समाजरचनेचे उद्दीष्ट स्वीकारले. त्याकरिता आर्थिक नियोजनाचा स्वीकारले. १९४८ च्या औद्योगिक धोरणानुसार अनेक उद्योग व्यवसाय सार्वजनिक क्षेत्रात सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. खाजगी क्षेत्रावर लायसन्स, परमिट, कोटा असे निर्बंध लादण्यात आले. याचा अर्थ असा की, व्यापारी उद्योजकांच्या हितसंबंधावर शासकीय धोरणांचा अनुकूल-प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता होती. त्यातूनच व्यापारी उद्योजकांचे हितसंबंधी गट निर्माण झाले. या गटाने सत्तारुढ काँग्रेस पक्षाशी संधान जुळवले आणि या संघटनांच्या नेत्यांच्या प्रभावाखाली शासकीय धोरणांची जडणघडण होऊ लागली. उदा. चिंतामणराव देशमुख यांचा राजीनामा नेहरूंनी स्वीकारावा याकरता बिर्ला उद्योगसमूहांनी दबाव आणला होता. काँग्रेसच्या निवडणूक निधीस व्यापारी-उद्योजक वर्गाकडून मोठ्या प्रमाणात हातभार लागत असला तरी व्यापारी उद्योजक शासनावर हुकूमत गाजवत नव्हते. फक्त आपल्या आर्थिक सामर्थ्यांचा वापर करुन ते आपले हितसंबंध जोपासत असत. तत्कालिन मुंबई राज्यात आसलेल्या मुंबई प्रदेश काँग्रेस समितीवर अमराठी भाषिक, गुजराथी - मारवाडी गटाचे वर्चस्व होते. त्यांना अशी भिती वाटत होती की, जर मराठी भाषिक राज्यात मुंबई शहराचा समावेश केला तर आपल्या आर्थिक हितसंबधाना धक्का बसेल. म्हणून मुंबई प्रदेश काँग्रेसने संयुक्त महाराष्ट्रला विरोध केला. एवढेच नव्हे तर, मुंबई प्रदेश काँग्रेसने मुंबई शहर केन्द्रशासित प्रदेश करावे अशीही मागणी केली. त्याचप्रमाणे नागपूर प्रदेश कॉंग्रेसवर हिंदी-भाषिक मारवाडी गटाचे वर्चस्व होते. ब्रिजलाल बियाणी आणि प्रेमचंद रांका हे नागपूरचे काँग्रेसचे नेते मारवाडी होते. संयुक्त महाराष्ट्रात आपल्या हितसंबंधांवर अनिष्ट परिणाम होतील, असे विदर्भातील व्यापारी वर्गाला वाटत होते. म्हणून नाग-विदर्भाचे वेगळे राज्य हवे अशी मागणी राज्य पुनर्रचना आयोगाकडे करण्यात आली होती. ही मागणी काँग्रेस श्रेष्ठींनी फेटाळल्यानंतर त्यांच्यावर दबाव आणण्याकरिता नाग-विदर्भ आंदोलन समिती स्थापन करण्यात आली. त्यात बियाणी व इतर अमराठी भाषिक नेते सक्रीय होते. २००९ साली पुन्हा एकदा या मागणीने उचल खाल्ली आहे. त्यास विदर्भातील व्यापारी वर्गाचा पाठिंबा आहे.
- **व्यापारी-उद्योजकांचा राजकीय पक्ष** : स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाचा कल वाजवीपेक्षा अधिक डावीकडे झुकलेला आहे, असा व्यापारी-उद्योजक वर्गातील एका गटाचा समज झाला. समाजवादी समाजरचनेचा प्रस्ताव काँग्रेसने त्याच्या आवाडी येथे भरलेल्या अधिवेशनात (१९५३) स्वीकारल्याने, जमीन सुधारणाविषयक कायदे संमत केल्याने प्रस्थापित वर्गात अस्वस्थता निर्माण झाली. त्याचा परिनाम म्हणजे, देशी संस्थानिक, बडे जमीनदार, व्यापारी व उद्योजकांच्या सक्रिय सहकार्याने जेष्ठ काँग्रेस नेते चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी स्वतंत्र पक्षाची स्थापना १९५७ साली

केली. देशातल्या काही भागात या पक्षाला उल्लेखनीय पाठिंबा मिळाला असला तरीही मराठी-भाषिक प्रदेशात आणि महाराष्ट्रमध्ये सर्व उमेदवार पराभूत झाले. १९६९ साली काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीचे प्रस्थापित नेतृत्व संघटना काँग्रेसमध्ये सामील झाले. संघटना काँग्रेस भांडवलवाद-धार्जिणी आहे, असा सार्वत्रिक समज निर्माण झाला. कारण व्यापारी-उद्योजक वर्गाने संघटना काँग्रेसला पाठिंबा दिला. स्वतंत्र पक्षाप्रमाणे हा पक्ष महाराष्ट्रात मूळ देखील धरू शकला नाही. १९७७ साली संघटना काँग्रेस जनता पक्षात विलीन झाला. म्हणजेच महाराष्ट्रातील व्यापारी उद्योजक वर्गाच्या एका गटाचे स्वतःचा पक्ष स्थापन करण्याचे प्रयत्न पूर्णपणे अयशस्वी ठरले.

- **राजकीय पक्षांचे आश्रयदाते :** राजकीय पक्षाचे आश्रयदाते ही भूमिका जगातल्या सर्व लोकशाही प्रधान देशात व्यापारी उद्योजक भांडवलदारांचा प्रस्थापित वर्ग पार पाडतो. इतर हितसंबंधी गटांप्रमाणेच प्रस्थापितांचा गट सत्ताप्राप्तीच्या, म्हणजेच निवडणुकांचा राजकारणात प्रत्यक्षरीत्या सहभागी होत नाहीत, तर आपले हितसंबंध जोपासणाऱ्या राजकीय पक्षास आर्थिक मदत करतात. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून व्यापारी उद्योजक उद्योग समूहांकडून निवडणूक निधीत भरीव योगदान देत अह्हेत, हे सर्वज्ञात आहे. गेल्या ५० वर्षात धनसत्तेचा प्रभाव अधिकच वाढला आहे. कारण निवडणुकीच्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. १९६७ पर्यंत निवडणूक खर्च तसा मर्यादित असल्याने राजकीय पक्ष अधिकृतपणे निधी स्वीकारत. त्याची पावतीदेखील संबंधितांना दिली जात असे. मात्र १९६९ साली काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर, १९७१ ची निवडणूक कोणत्याही परिस्थितीत जिंकलीच पाहिजे असा निर्धार इंदिरा गांधी यांनी व्यक्त केला होता. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा त्यांनी वापर करून पक्षाकरिता प्रचंड निवडणूक निधी गोळा केला. अशा या परिस्थितीत 'अनधिकृत' मार्गाने व्यक्तींकडून निवडणूक निधी गोळा करण्याची सुरुवात झाली. १९६७ नंतर सत्तेवर आलेल्या बिगरकाँग्रेसी पक्षाच्या सरकारांनी निधी संकलनाकरिता प्रशासकीय यंत्रणेचा वापर केला. याचाच अर्थ असा होईल की, काँग्रेससह सर्व राजकीय पक्ष व्यापारी उद्योजकांवर दबाव आणने किंवा त्यांना प्रलोभने दाखवून त्यांच्याकडून बेहिशेबी पैसा प्राप्त करू लागले. त्याबदल्यात अशा आश्रयदात्यांना अनेक सवलती दिल्या जाऊ लागल्या. इतर व्यवसायांप्रमाणेच निवडणूक-राजकारण हा एक व्यवसाय बनला. त्यात होणारी गुंतवणूक अन्य व्यवसायांपेक्षा कितीतरी अधिक किफायतशीर ठरू लागली. त्यामुळे भारतीय राजकारणावर व्यापारी उद्योजक वर्गाचा प्रभाव वाढत गेला. यातूनच राज्यकर्ते, सनदी नोकर आणि उद्योजक व्यापाऱ्यांच्या संगमताने, विशिष्ट उद्योगसमूहाचे हितसंबंध जोपासणारी धोरणे आखली जाऊ लागली. म्हणजेच शासनच्या धोरणाचे स्वरूप काय असावे, हे व्यापारी-उद्योजक ठरवू लागले. देशी व्यापारी उद्योजक वर्गावरील आपले परावलंबित्व कमी करण्यासाठी राज्यकर्त्यांनी परदेशातून यंत्रसामुग्री, अन्नधान्य, शस्त्रास्त्रांची खरेदी करताना किंवा देशांतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील मोठे प्रकल्प उभारण्याचे परवाने देताना, परकीय उद्योजकांकडून त्यांचा हिस्सा मागण्यास सुरुवात केली. महाराष्ट्राच्या संदर्भात १९८५ च्या निवडणुकीच्या वेळी निवडणूक निधी उभारण्याकरिता इंदिरा कॉंग्रेस आणि समाजवादी काँग्रेसकडून त्यांच्या नियंत्रणाखालील साखर कारखान्यांकडून अनधिकृतपणे साखर विक्री करून कोट्यवधी रुपये गोळा केले अशी टीका होते. तर इतर राजकीय पक्षही त्यात मागे नाहीत. शिवसेनेकडून अनेक

उपक्रमांकरिता छोटया मोठ्या व्यापाऱ्यांकडून स्वच्छेने मोठ्या देणग्या गोळा केल्या जातात. या व्यक्तिरिक्त गल्लीबोळातील भाई लोक खंडणी गोळा करतात आणि त्यातला वाटा संघटनेला देतात, असेही म्हटले जाते. शिवसेनेचे काही नगरसेवक, आमदार व शाखाप्रमुख पूर्वाश्रमीचे भाई लोक असल्याने त्याला पुष्टी मिळते. पुढील काळात भारतीय जनता पक्ष सत्तेवर येण्याची शक्यता निर्माण झाल्याने काही उद्योगसमूहांनी भाजपाला मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य केले. या व्यतिरिक्त छोटे मोठे व्यापारी भाजपच्या स्थानिक उमेदवारांना मोठ्या प्रमाणात अर्थसाहय करत होते. अन्य राजकीय पक्षात अशा प्रकारचे कौशल्य किंवा प्रभाव नसल्याने त्यांच्याकडे निधीची कमतरता होती. मंडल प्रश्नाबाबत लोकमताचा व्यापक पाठिंबा असूनदेखील, संघटना व निधीच्या अभावी जनता दल महाराष्ट्रात बहुतांशी निष्प्रभ ठरला. म्हणजेच राजकीय पक्षांना निवडणुका जिंकण्याकरिता मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज आहे. अशी गुंतवणूक करण्यास उद्योजक-व्यापारी वर्ग तयार आहे. त्याकरिता त्यांच्या अटी राजकीय पक्ष आनंदाने स्वीकारतात. अशा प्रकारे ते परस्परांच्या हितसंबंधांची जोपासना करतात.

- **राजकीय निर्णय प्रक्रियेचे धुरीणत्व :** भारतीय राजकारणात गेल्या दोन दशकात "प्रस्थापित वर्गा"चा प्रभाव वाढत गेल्याने राजकीय निर्णय प्रक्रियेचे धुरीणत्व त्यांच्याकडे गेले. त्यातही उल्लेखनीय बाब म्हणजे देशी भांडवलदार वर्गाची जागा बहुराष्ट्रीय कंपन्यांचे परदेशी भांडवलदार घेत आहेत. परकीय सरकारे, परकीय भांडवलदार, परकीय उद्योजक भारत सरकारवर आपल्या अटी लादतात. त्या अटींची पूर्तता करण्याकरिता सरकारला आपल्या आर्थिक, उद्योगविषयक, आयात-निर्यात धोरणात बदल करावे लागतात. म्हणजे औपचारिक अर्थाने भारत सरकारला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असले तरीही प्रत्यक्षात ते स्वातंत्र्य संपले आहे. मुंबई शहर महाराष्ट्राची राजधानी व भारताची व्यापारी राजधानी असल्याने महाराष्ट्राच्या राजकारणावर या परिवर्तनाचे पडसाद उमटले आहेत. त्याचा राष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणावरही परिणाम होत आहे. 'हरितक्रांतीच्या काळात राष्ट्रीय नेतृत्वाने कृषी व्यवसायाला प्रोत्साहानपर सवलती देण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील राज्यकर्ता वर्ग मराठा जातीतील श्रीमंत शेतकरी वर्ग संपन्न झाला. याच मराठा नेतृत्वाचे खच्चीकरण करण्याकरिता राष्ट्रीय नेतृत्वाने धोरणात्मक बदल केले. म्हणजेच सत्ता व अधिकाराच्या उतरंडीत आंतरराष्ट्रीय भांडवलदार वर्गाचे राष्ट्रीय नेतृत्वावर वर्चस्व आणि राष्ट्रीय नेतृत्वाचे महाराष्ट्राच्या नेतृत्वावर वर्चस्व अशी साखळी आहे. राजेन्द्र व्होरा यांच्या मते, या बदललेल्या संदर्भात मराठा जातीचे किंवा श्रीमंत शेतकरी वर्गाचे प्रभुत्व / धुरीणत्व या संकल्पना आता कालबाह्य झाल्या आहेत; कारण आज आंतरराष्ट्रीय भांडवलदारवर्गाचे धुरीणत्व प्रस्थापित झाले आहे. त्यांनी ठरवलेल्या चौकटीत राहून राज्यपातळीवरचे नेतृत्व आपले धोरण आखते. व्होरांच्या मते, ग्रामीण भागातील सहकारी भांडवलदार व शहरी भागातील उद्योजक वर्ग यांचे संगनमत होऊन त्यांनी परस्परपूरक कार्यपद्धती स्वीकारली आहे. म्हणजेच आंतरराष्ट्रीय भांडवलदार, देशी भांडवलदार आणि सहकारी भांडवलदार वर्ग राजकीय प्रक्रियेवर संयुक्तरीत्या वर्चस्व गाजवतात. त्यांच्या हितसंबंधाशी विसंगत धोरणाचा आग्रह धरणाऱ्या वसंतराव नाईक आणि शंकरराव चव्हाण यांना त्यांनी राजीनामा देण्यास भाग पाडले होते. म्हणजेच महाराष्ट्र पातळीवरील राजकारणाची सूत्रे अर्थकारण करणाऱ्या वर्गाच्या हातात गेली आहेत.

**प्रश्न ३ रा. महाराष्ट्राच्या राजकारणातील चेंबर्स ऑफ कॉमर्सचा उदय, विकास व कार्यभाग स्पष्ट करा.**

**१. प्रास्ताविक -**

व्यापारी व उद्योजकात राज्यकर्ते आणि सनदी नोकरावर व्यक्तिगत पातळीवर प्रभाव पाडण्याची क्षमता असते. त्यामुळे ते स्वतःची परवाना, क्योटा इत्यादी प्रकारची कार्ये सहजरीत्या करवून घेतात. काही बाबी संपूर्ण व्यापारी आणि उद्योजक वर्गाच्या हितसंबंधाशी निगडित असतात. उदाहरणार्थ विक्री कराचे दर, आंतरराज्य व्यापारावरील नियंत्रण, सरकारी करआकारणी, कर संकलनाची पद्धत, जकात व वसुली इत्यादी अशा प्रकारच्या समान हितसंबंधाच्या जोपासनेकरीता विविध प्रकारच्या उपक्रमातील व्यापारी व उद्योजक वर्ग आपापल्या संघटना स्थापन करतात. अशा प्रकारच्या सर्व संघटना व महासंघ अखिल भारतीय पातळीवर 'महासंघांच्या महासंघाशी', म्हणजेच फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीजशी संलग्न असतात. व्यापारी व उद्योजक वर्गाची ही अखिल भारतीय संघटना भारतातील सर्वात प्रभावी सक्रिय हितसंबंधी गट आहे.

**२. उगम आणि विकास -**

१९ व्या शतकात व्यापारी उद्योजकांची संघटित होण्याची प्रक्रिया सुरु झाली. १८२६ साली मुंबई शहरातील इंग्लिश व्यापारी वर्गाने बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना केली. प्रांतीक सरकारकडे विनंती/अर्जाच्या माध्यमातून आपल्या समस्या सोडविण्याकरिता ही संघटना स्थापन झाली. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी या संघटनेच्या विनंती अर्जाकडे सहानुभूतिपूर्वक पहिले. सामाजिक व्यवहारात राज्यकर्ते व इंग्लिश व्यापारी वर्ग एकत्र येत असल्याने, परस्पर विचाराने व सौहार्दपूर्ण वातावरणात व्यापारी वर्गाकरिता शासकीय धोरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे निराकरण केले जाते असे. मुंबई प्रांताच्या आर्थिक विकासासंबंधीचे आपले प्रस्ताव / सूचना संघटना शासनाकडे सादर करत. मात्र राजकीय प्रश्नांपासून ती कटाक्षाने दूर राहात. बॉम्बे आणि बंगाल चेंबर्स ऑफ कॉमर्सचे सदस्यत्व केवळ युरोपीय व्यापा-यांना खुले असल्यामुळे देशी व्यापाऱ्यांना समस्या सोडविण्याकरिता संघटनेची गरज भासली. त्यातून १८८७ साली बंगाल नेशनल चेंबर ऑफ कॉमर्सची आणि १९०७ साली मुंबई प्रांतात इंडियन मर्चंट चेंबर्सची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय महासभेचे दादाभाई नौरोजी, दिनशा बाच्छा, ठाकूरदास पुरुषोत्तमदास इत्यादी अनेक नेते व्यापार उद्योग क्षेत्रातून आलेले असल्याने, त्यांनी व्यापारी संघटनांच्या उभारणीत हातभार लावला. मराठी भाषिक प्रदेशात मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स (१९२४), महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (१९२७), विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स (१९३३) स्थापन करण्यात आल्या होत्या. भारतीय (देशी) व्यापारी व उद्योजकांना युरोपीय (परदेशी) व्यापा-यांप्रमाणे सवलती मिळाव्या याकरीता त्यांच्या संघटना प्रयत्नशील असे. आपले साम्राज्य टिकवण्याकरिता देशी भांडवलदार वर्गाचा पाठिंबा आवश्यक आहे, याची जाणीव परकीय राज्यकत्यांना असल्याने, त्यांचा व्यापारी उद्योजकांच्या संघटनांच्या मागण्यांबाबत त्यांचा दृष्टीकोन उदार असायचा.

शासकीय यंत्रणेशी संलग्न करून घेण्याच्या उद्देशाने १८६१ साली मुंबई प्रांतिक विधिमंडळावर बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सच्या एका सदस्याची नियुक्ती करण्यात आली. १८९२ साली बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सच्या व्यतिरिक्त देशी व्यापारी, मुंबई गिरणी मालक संघ आणि अहमदाबाद गिरणी मालक संघ यांच्या प्रत्येकी एका प्रतिनिधीची मुंबई प्रांतिक विधिमंडळावर नियुक्ती करण्यात आली. संबंधित वर्गाशी विचारविनिमय करून गव्हर्नर त्यांच्या प्रतिनिधींची नेमणूक करत. १९०९ च्या सुधारणेनुसार विधिमंडळावरील आपल्या प्रतिनिधींची 'निवड' करण्याची मुभा संबंधित संघटनांना देण्यात आली.

१९३५ च्या सुधारणेनुसार प्रांतिक विधिमंडळाव्यतिरिक्त विधिमंडळात व्यापारी व उद्योजकांना अधिक प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले. म्हणजेच ब्रिटिशांचा उद्योजक व व्यापारी वर्गाविषयीचा दृष्टिकोन उदार होता. असे असले तरीही देशी व विदेशी व्यापारात नेहमीच भेदभाव केला जात असे. ब्रिटिश कारखानदारीच्या हितसंबंधांना नेहमीच प्राधान्य दिले जात असे. त्यामुळे देशी उद्योजक व व्यापायांचे काही वेळा नुकसान होत असे. त्यामुळे परकीय राजवटीशी त्यांनी संघर्ष जरी केला असला, तरी ते त्याबाबत समाधानी नव्हते.

राष्ट्रीय महासभेच्या बाबतीत देशी व्यापारी व उद्योजकांच्या संघटना सुरवातीपासूनच अनुकूल असल्या तरीही ब्रिटिश राज्यकर्ते त्यामुळे नाराज होणार नाहीत याची दक्षता त्यांच्याकडून घेतली जात असे. लोकमान्य टिळकांचा स्वदेशी व विदेशी मालाच्या बहिष्काराचा कार्यक्रम देशी उद्योजकांच्या हिताचा असल्यामुळे चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या वार्षिक अधिवेशनाचा राजकीय स्वरूपाचे प्रस्ताव संमत होऊ लागले. अध्यक्षीय भाषणात देशातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन, राजकीय प्रश्नांवर राष्ट्रीय महासभेविषयी सहानुभूतीकारक किंवा पाठिंबा देणारी विधाने केली जाऊ लागली. राष्ट्रीय महासभेच्या वार्षिक अधिवेशनाचा खर्च भागविण्याकरीता मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्सद्वारा मोठ्या देणग्या दिल्या जात असे. तरीही व्यापारी उद्योजकांच्या या संघटनांनी ब्रिटिश शासनाच्या बाबतीत नेहमीच सावधपणाची विधाने व ठराव केले. उघडउघड संघर्षांची भूमिका घेतली नाही. म्हणजेच जमेल तेवढा राष्ट्रीय आंदोलनाला पाठिंबा आणि तसा पाठिंबा देताना सरकारची अवकृपा होणार नाही याची काळजी घेतली. अशा प्रकारची तारेवरची कसरत व्यापारी उद्योजकांच्या संघटना महासंघांनी स्वातंत्र्यपूर्व काळात केली.

**३. स्वातंत्र्योत्तर कालखंडतील कार्यभाग :**

व्यापारी, उद्योजक वर्ग आणि त्यांच्या संघटना शक्यतो शासन धार्जिणे असतात. कारण शासनाशी संघर्ष करणे त्यांना 'परवडत' नाही. स्वातंत्रोत्तर काळात भारत सरकारने जरी समाजवादी विचारसरणीचे कार्यक्रम स्वीकारले असले तरी आर्थिक नियोजनाची यंत्रणा उभारून पंचवार्षिक योजना सुरू केल्या. सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार केला असला तरी, व्यापार उद्योगावर अनेक प्रकारचे निर्बंध लादले असले तरीही त्या धोरणांची कार्यवाही करताना, व्यापारी व उद्योजक वर्गावर प्रतिकूल परिणाम होणार नाही याची काळजी घेतली गेली. त्यात अखिल भारतीय पातळीवर FICCI तर राज्य पातळीवर महाराष्ट्र किंवा मराठा किंवा विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स यांची भूमिका महत्वाची आहे. FICCI संघटनेशी देशातील व्यापारी व उद्योजकांच्या ४०,००० हून अधिक संघटना संलग्न आहेत. चेंबर्स ऑफ कॉमर्सकडे व्यापारी व उद्योजक आर्थिकदृष्ट्या संपन्न असल्याने आर्थिक पाठबळ उपलब्ध आहे. त्यांचे व्यावसायिक संघटन सतत कार्यरत असते. विधिज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, संख्याशास्त्रज्ञ, अशा विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य असलेले कर्मचारी संघटनेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नांसबंधी संशोधन करतात, माहिती व आकडेवारीचे संकलन करतात आणि शासनाकरीता आपले प्रस्ताव तयार करतात. त्यांची माहिती 'परिपूर्ण' असल्याने शासनाला त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करता येत नाही. राज्यकर्ते व प्रशासक वर्गाची या संघटना सतत संपर्क ठेऊन असतात. त्याचा फायदा संघटनेला होत असतो. संघटनेशी संपर्क ठेवण्याबाबत राज्यकर्तेही उत्सुक असतात. आज FICCI च्या वार्षिक बैठकीत पंतप्रधान किंवा अर्थमंत्री उद्घाटक म्हणून येण्याचा संकेत प्रस्थापित झाला आहे. अशा प्रकारच्या विचारविनिमय संघटनेच्या हिताचा ठरत आहे. म्हणजे विविध प्रकारच्या शासकीय सल्लागार समित्यांवर संघटनेस प्रतिनिधित्व

मिळत आहे. त्यामुळे संघटनेच्या मागण्या शासनापर्यंत पोहचतात. त्यांच्या समस्यांचे निवारण चर्चा व विचार विनिमयाच्या माध्यमातून होत असल्याने, आंदोलनाच्या मार्गाचा त्यांना सहसा अवलंब करावा लागत नाही. मात्र विचार विनिमयानंतर देखील शासन त्यांच्या 'न्याय्य' मागण्यांकडे दुर्लक्ष करत असेल, तर ते राष्ट्रव्यापी, राज्यव्यापी स्वरुपाची आंदोलने हाती घेतात. विक्री करातील अन्यायकारक दुरुस्त्या, वाहन कर कायद्यातील अन्याकारक तरतुदी आणि कालबाह्य व जाचक जकातविरोधी व्यापारी उद्योजकांच्या संघटनांनी अनेक आंदोलने केली. ती १००% यशस्वी झाली होती. शासनाने विक्री व वाहनकरातील अन्यायकारक तरतुदी मागे घेतल्या आणि महाराष्ट्र शासनाने जकात रद्द केली आहे. राज्यातील सर्व व्यापारी संघटनांचे महासंघ असलेले चेंबर ऑफ कॉमर्स पक्षीय राजकारणापासून पूर्णतः अलिप्त असते; त्यांच्याशी संलग्न असलेल्या संघटनांना त्या बाबतीत निर्णय घेण्याचे पूर्ण स्वतंत्र्य असते. चेंबर ऑफ कॉमर्स विशिष्ट प्रश्नांबाबत 'लॉबींग' करत नाही. परंतु विशिष्ट उद्योगव्यवसायांच्या 'लॉबी' कार्यरत असतात. उदाहरणार्थ महाराष्ट्रात 'शुगर लॉबी' अत्यंत प्रभावी आहे, हे सर्वज्ञात आहे.

**प्रश्न ४ था. शहरी आणि ग्रामीण भागातील जमीन विषयक समस्या स्पष्ट करा.**

**१. प्रास्ताविक -**

जमीन / भूमी हा निसर्ग निर्मित उत्पादन घटक आहे. त्याचा उपयोग मानव उत्पादनासाठी करतो. इतिहास पूर्व कालखंडात जमीनीवर वनसंपदा असे. कालांतराने शेती व्यवसायाची सुरुवात झाली. मानवी संस्कृतीच्या प्रगतीबरोबरच उत्पादन कार्यासाठी जमिनीचा अधिकाधिक वापर होऊ लागला. औद्योगिक क्रांतीनंतर शहरे उदयास आली आणि बिगरशेती कामासाठी जमिनीचा अधिकाधिक उपयोग केला जाऊ लागला. त्यामुळे शेती व तत्सम व्यवसायासाठी जमिनीची उपलब्धता उत्तरोत्तर कमी होत गेली. जमिनीच्या वापरातून शहरी आणि नागरी भागात उद्भवलेल्या समस्यांचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**२. शहरी भागातील समस्या -**

शहरी भागात बिगर शेती उपक्रमांसाठी जमिनीचा वापर करण्यात येतो. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेने मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद इत्यादी मोठ्या शहरांचा भौगोलिक विस्तार वाढत गेला. मुंबई शहराच्या वाढीचा परिणाम म्हणजे उपनगरांची संख्या वाढत गेली. म्हणजेच मुख्य शहराला लागून असलेल्या ग्रामीण भागात शहराचा विस्तार झाला. डोंबिवली-कल्याण महानगरपालिका निर्माण करताना त्या परिसरातील २७ गावांचा, तर वसई-विरार महानगरपालिकेत सभोवतालचा ३३ गावांचा समावेश करण्यात आला. अशा प्रकारे महानगरांचा विस्तार होत असताना, त्यांची लोकसंख्या विस्तार होत असताना, त्यांची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत गेली. त्या लोकसंख्येसाठी निवाऱ्याची सोय करणे कठिण होऊ लागले. या परिसरातील जमिनीच्या किंमती प्रचंड वेगाने वाढत गेल्या. मुख्य शहरात निवासी जागा घेणे सर्वसामान्यांच्या आवाक्यापलीकडे गेले. मध्यमवर्ग उपनगरांमध्ये स्थलांतरीत झाला. मात्र कनिष्ठ वर्गाला प्रचलीत दराने घरांची खरेदी करणे अशक्य झाल्याने शहरातील शासकीय आणि खाजगी मालकीच्या जमीनीवर झोपडपट्ट्यांचा प्रसार झाला. मुंबई शहरातील सुमारे ५०% लोकसंख्या अशा गलिच्छ झोपडपट्ट्यात राहते. त्या अनाधिकृत वसाहतीत किमान नागरीसेवा उपलब्ध नसल्याने, सर्वसामान्यांच्यात असंतोष वाढत आहे. या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणे ही शहरी भागातील जमिनीची निगडित प्रमुख समस्या आहे.

शहराच्या विकासाबरोबरच सार्वजनिक वाहतूक सेवेचा विस्तार करणे गरजेचे झाले. लोकसंख्येच्या प्रचंड दबावामुळे सार्वजनिक वाहतूक सेवा कोलमडून पडली आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाहतूक कोंडी होऊन वाहतूक नियंत्रण यंत्रणा पूर्णपणे कोलमडून पडली आहे. मुंबई शहरावरील लोकसंख्येचा दबाव कमी करण्यासाठी नवी मुंबई वसवण्यात आली. मात्र त्यामुळे मुंबईतील लोकसंख्येचे स्थलांतर होत असताना, नवी मुंबई शहरीकरणातून उद्भवणाच्या समस्या सोडवण्यासाठी पुरेशी यंत्रणा उपलब्ध नाही. त्यातून दुसरी नवी मुंबई, नवीन पनवेल, नवीन ठाणे इत्यादी प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. परंतु या उपाययोजना तात्पुरती मलमपट्टी सारख्या आहेत. कारण राज्याच्या ग्रामीण भागातून आणि देशातील कमी विकसित भागातून मुंबई आणि अन्य शहरात लोकसंख्येचे स्थलांतर प्रचंड प्रमाणात होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील महानगरे बकाल होण्याचा धोका उद्भवतो. त्याला आळा घालण्याची मागणी काही राजकीय पक्ष करत असले, तरी हे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांशी विसंगत आहे. नागरीकरणाबरोबरच संरचनात्मक साधनांचा विकास करण्यासाठी जमीन आवश्यक आहे. बुलेट ट्रेन, रेल्वे विस्तार, महामार्ग विस्तार, नवीन मुंबईतील विमानतळ, नागपूर येथील मिहान' प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात भू-संपादन यंत्रणा कार्यरत आहे. सक्तीच्या भूसंपादनास असलेला विरोध पाशवी बळाचा वापर करून मोडून काढला जातो. याव्यतिरिक्त विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) निर्माण करण्यासाठी शेतजमीन संपादन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पनवेल, उरण आणि पेण तालुक्यातील २५०० एकर जमिन रिलायन्स कंपनीच्या SEZ साठी संपादन करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यास स्थानिक लोकांचा विरोध आहे. कारण त्यामुळे पनवेल तालुक्यातील २५ गावातील ४०,००० लोकसंख्या विस्थापित होणार आहे.

**३. ग्रामीण भागातील समस्या -**

वाढते औद्योगिकरण, शहरीकरण आणि संरचनात्मक साधनांच्या विकासासाठी शेतीखालील जमीन काढून घेतली जाते. त्यामुळे राज्यातील लागवडीखालील क्षेत्र प्रचंड वेगाने कमी होत आहे. त्याचा प्रत्यक्ष परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर होत आहे. महाराष्ट्र राज्य अन्नधान्याच्या गरजेबाबत कधीही स्वयंपूर्ण नव्हते. आता ती परिस्थिती अधिक बिकट होत चालली आहे.

महाराष्ट्रातील ओलिताखालील, जलसिंचनाखालील क्षेत्र १८% आहे. म्हणजेच ८२% क्षेत्र कोरडवाहू असून, शेती पावसावर अवलंबून असते. महाराष्ट्रातील ९७ तालुके कायम दुष्काळग्रस्त आहेत. राज्यातील २०,००० हून अधिक गावांना टँकरद्वारा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा लागतो. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यासाठी ही बाब भूषणावह नाही. मराठवाडा आणि विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्येची समस्या अधिकाधिक बिकट होत चालली आहे. पावसावर अवलंबून असणारे शेतकरी शेतीमालासाठी कर्ज काढतात आणि निसर्गाच्या अवकृपेने त्यांची भांडवली गुंतवणूक आणि श्रम वाया जाते. कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करण्याकडे वळतात. अतिसिंचनामुळे भूगर्भातील पाण्याचा साठा कमी होत आहे आणि त्याची पातळी कमी झाल्याने शेतीसाठी पाण्याची उपलब्धता कमी होत आहे. ही परिस्थिती बिकट होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे ऊस उत्पादक शेतकरी पाण्याचा बेसुमार वापर करतात. पाण्याचा आणि रासायनिक खतांचा बेसुमार वापर करण्यात आल्याने, 'साखर क्षेत्रातील जमीन क्षारमुक्त होऊन ती नापिक होत आहे. जपीन क्षारयुक्त झाल्याने ऊसातील साखरेचा उतारा कमी होत आहे. कोकण क्षेत्रातील किनारपट्टीवरील ६५,००० हेक्टर जमीन क्षारयुक्त झाली आहे. कारण समुद्रातील पाणी शेत जमिनीत शिरते. कालांतराने ही जमीन कोणत्याही पिकाच्या लागवडीस योग्य रहात नाही.

## प्रकरण २. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धती आणि राजकीय पक्ष.

**प्रश्न १. रा. महाराष्ट्रातील पक्षपद्धतीचा उदय आणि विकास स्पष्ट करा.**

**१. प्रास्तविक -**

लोकशाही शासनव्यवस्थेत राजकीय पक्षाचे स्थान महत्वाचे असते. ते आपापली विचारसरणी जनतेसमोर, निवडणुकीच्या निमित्ताने मांडीत असतात. ज्या राजकीय पक्षाची विचारसरणी बहुसंख्य नागरिकांना जास्त जवळची वाटते, त्या पक्षाकडे राज्यकारभार सोपविला जातो. बहुमतात असलेला पक्ष राज्यकारभार चालवतो. म्हणजेच लोकशाही शासनव्यवस्थेत राजकीय पक्ष आवश्यक आहेत. थोडक्यात राजकीय पक्ष लोकशाही शासनप्रणालीचा अविभाज्य भाग असून, शासनसंस्था व त्यांचे अतूट संबंध असतात.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे, राजकीय पक्ष भारतीय राजकीय व्यवस्थेचा अविभाज्य घटक बनले. भारतीय पक्ष पद्धतीचा विकास स्वातंत्र्योत्तर काळात विविध राजकीय विचारसरणी आणि आर्थिक व सामाजिक हितसंबंधाच्या सत्तासंघर्षातून झाली आहे. विविधतेमुळे विभागातील लोकांच्या राजकीय आशा आकांक्षा, भाषा-धर्म-संस्कृतीची विविधता इत्यादींमुळे भारतात अनेक राजकीय पक्षांची निर्मिती झाली. भारताच्या पक्षपद्धतीचे स्वरूप बहुपक्षीय असले तरी १९८९ पर्यंत 'एकपक्ष प्रभुत्व पद्धती' प्रचलित होती. स्वातंत्र्यपूर्व काळातील म्हणजे काँग्रेस पक्षाचा प्रभाव भारतीय जनतेवर असल्याने केन्द्र व राज्य सरकारात या पक्षाचे प्रभुत्व १९६७ पर्यंत होते. त्या नंतरच्या कालखंडात काँग्रेसच्या प्रभुत्वास इतर राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांचे आव्हान मिळाल्याने भारताच्या पक्षपद्धतीच्या स्वरूपात अनेक स्थित्यंतरे आल्याचेही दिसून येते.

**२. महाराष्ट्रातील पक्षपद्धती -**

महाराष्ट्राचा विचार करता, पक्ष पद्धतीची सुरुवात स्वातंत्र्याच्या चळवळीतून झाली आहे. १८८५ साली राष्ट्रीय महासभेची स्थापना झाली. महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गाकडे तीचे नेतृत्व होते. १९३० नंतर महाराष्ट्रातील बहुजन समाजही मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील झाला. राष्ट्रीय महासभेव्यतिरिक्त हिंदू महासभा, ब्राह्मणेतर पक्ष, स्वतंत्र मजूर पक्ष, भारतीय कम्युनिष्ट पक्ष हे राजकीय पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही हिंदुत्ववादी संघटना महाराष्ट्रात राजकीय कार्य करत होती.

महाराष्ट्रातील समाजवादी आणि साम्यवादी विचारसरणीचे राजकीय नेते व कार्यकर्ते राष्ट्रीय महासभेच्या अंतर्गतच आपले राजकीय कार्य करत होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात साम्यवादी पक्ष उघडपणे कार्य करू लागला. १९४८ साली काँगेसमधले समाजवादी आणि सत्यशोधकवादी पक्षातून बाहेर पडले. त्यांनी समाजवादी पक्षाची आणि शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. डॉ. आंबेडकरांनी आपल्या पक्षाला व्यापक पाया देण्याकरिता पक्षाचे शेड्युल्ड कास्टस फेडरेशन असे नामकरण केले. तर दुसरीकडे आर. एस. एस. वर बंदी आल्यानंतर, आपले हितसंबंध जोपासण्याकरिता १९४९ साली भारतीय जनसंघ पक्षाची स्थापना केली. म्हणजेच महाराष्ट्रातील पक्षपद्धतीची वास्तविक अर्थाने सुरुवात स्वातंत्र्योत्तर कालखंडात झाली. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्रातील एक प्रभुत्व पक्ष पद्धतीची मुहूर्तमेढ रोवली.

**३. महाराष्ट्रातील पक्षपद्धतीचा उदय आणि विकास -**

१९९५ पर्यंतच्या काळातील महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीचे स्वरूप 'एक पक्ष प्रभुत्व पद्धती' असे होते. १९४७ ते १९९५ या काळात काँग्रेस पक्ष काही अपवाद वगळता सतत सत्तेवर राहिला.

**४. महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीच्या उदय व विकासाचे प्रमुख टप्पे –**

**१) स्वातंत्र्यपूर्व कालखंड :** स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय राजवट व स्वातंत्र्याची चळवळ या कारणांनी वास्तविक अर्थाने पक्षपद्धती अस्तित्वात नव्हती. राष्ट्रीय कॉंग्रेस हाच मुख्य राजकीय पक्ष होता. १९२० साली बहुजन समाज काँग्रेसमध्ये सामील झाल्याने टिळकपंथीय नेते काँग्रेसपासून दूर गेले व ते १९३७ मध्ये हिंदू महासभेत सामील झाले. उच्चवर्णियांप्रमाणे दलित समाजदेखील मुख्य राजकीय प्रवाहापासून अलिप्त होता. दलितांना संघटित करण्याचे कार्य डॉ. आंबेडकर यांनी केले. म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व काळात राजकीय पक्ष अस्तित्वात असले तरीही पक्षपद्धती अस्तित्वात नव्हती.

**२) पक्षपद्धती निर्मितीचा कालखंड (१९४७ ते ५२)** - स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय महासभा ही सर्व विचारसरणीच्या लोकांची संयुक्त आघाडी होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय महासभा विसर्जित करण्याचा गांधींचा सल्ला इतर नेत्यांनी स्वीकारला नाही. पुढे राष्ट्रीय चळवळीचे सत्तारुढ गटाशी मतभेद असलेले विविध गट पक्षाच्या बाहेर पडले. १९५२ च्या निवडणूकीत काँग्रेस व इतर पक्षानी सत्ता प्राप्तीसाठी निवडणुकीचे राजकारण सुरु केले आणि त्यातून पक्ष पद्धती अस्तित्वात आली.

**३) एक पक्ष प्रभुत्व पद्धती (१९५२-५७)** - १९५२ च्या निवडणूकीत केंद्रात व सर्व राज्यात काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. मराठी भाषिक प्रदेशात मुंबई प्रांत, मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेशात काँग्रेसला ३०१ पैकी २४४ जागा मिळाल्या. सर्व ईतर पक्षांना ५७ जागा मिळाल्या, प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या शेकापला २५ जागा मिळाल्या.

**४) स्पर्धात्मक प्रभुत्य (१९५७ ते ६२)** - १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत काँग्रेसला २६४ पैकी १३५ व संयुक्त महाराष्ट्र समितीच्या घटक पक्षांना १२९ जागा मिळाल्या. संयुक्त महाराष्ट्र समितीस मराठी भाषिक भागात निर्विवाद बहुमत मिळाले नाही. कारण विदर्भ आणि मराठवाड्यात घटकपक्षांची एकजूट होऊ शकली नाही. संयुक्त महाराष्ट्र समितीचा नैतिक विजय झाला असला तरी, गुजराथी भाषिक भागात काँग्रेसला भरघोस मते मिळाल्याने द्विभाषिक मुंबई राज्यात काँग्रेस पक्षच सत्तेवर कायम राहिला. १९६० साली संयुक्त महाराष्ट्र स्थापनेनंतर काँग्रेसने विरोधी पक्षातील बहुजन समाजातील नेत्यांना अपल्याकडे वळवळे. त्यामुळे १९६०-६२ या काळात काँग्रेसचे संख्याबल उत्तरोत्तर वाढत गेले.

**५) निर्विवाद एक पक्ष प्रभुत्व पद्धती (१९६२ ते १९७८)** - १९५७ साली खंडित झालेले काँग्रेसचे वर्चस्व १९६२ साली पुन्हा एकदा प्रस्थापित झाले. विधानसभेच्या २६४ पैकी २१५ जागा, तर सर्व विरोधी पक्षांना मिळून ३९ जागा मिळाल्या. १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेसचे बहुमत अल्पप्रमाणात घटले. २७० पैकी २०३ जागा काँग्रेसला आणि ६७ जागा इतर सर्व पक्षांना मिळाल्या. १९७२ साली काँग्रेसला २२२ इतर सर्व पक्षांना ४८ जागा मिळाल्या. यशवंतराव चव्हाण जरी केंद्रीय मंत्रिमंडळात १९६२ साली गेले. मात्र आणीबाणीच्या कालखंडात केंद्रीय नेत्यांनी चव्हाण व मराठा नेतृत्वाची जाणीवपूर्वक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षाची एकजूट झाल्याने त्यांना ४८ पैकी २८ जागा प्राप्त झाल्या. त्यात भर म्हणजे १९७८ मध्ये काँग्रेस पक्ष दुभंगला, प्रस्थापित नेतृत्व चव्हाणांच्या बाजूला राहिले असले तरी मराठ्यांच्या सर्वस्वाला शह देण्याकरिता इतर मागासवर्गीय अनुसूचित जातीजमाती व अल्पसंख्य गटातील नेते व त्यांचे समर्थक इंदिरा गांधीच्या बाजूस गेले.

**६) एक पक्ष प्रभुत्व पद्धतीचा अस्त आणि बहुपक्ष पद्धतीचा प्रारंभ -** १९५२ पासून जरी महाराष्ट्रात बहु पक्षपद्धती अस्तित्वात असली तरी संयुक्त महाराष्ट्र समितीचा अपवाद वगळता कांग्रेसेतर पक्ष होते. त्यामुळे महाराष्ट्रात एक पक्ष प्रभुत्व पद्धती प्रचलित होती. या पद्धतीला पहिला लोकसभा निवडणुकीत विजय मिळाला. त्यानंतर फेब्रुवारी १९७८ मध्ये केंद्रात काँग्रेसतर पक्षाचे सरकार सत्तेवर आले. थोडक्यात जर काँग्रेसेतर पक्षाची एकजूट झाली तर महाराष्ट्रात देखील काँग्रेसचा पराभव करता येईल, या जाणीवेमुळे समाजवादी पक्ष व भारतीय जनसंघ यांचे विलिनीकरण होऊन जनता पक्षाची स्थापना झाली. शेतकरी कामगार पक्ष व कम्युनिस्ट पक्षाशी त्यांनी निवडणुकीत समझोता केला. १९७८ साली महाराष्ट्रात इंदिरावादी काँग्रेस, समाजवादी काँग्रेस व काँग्रेसतर पक्ष अशी सत्ता स्पर्धा झाली. इंदिरावादी काँग्रेसला ७१ तर समाजवादी काँग्रेसला ६९ जागा मिळाल्या. म्हणजेच कोणताही राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नाही. या परिस्थितीत समाजवादी काँग्रेसमध्ये एक गट जनता पक्षाच्या सहकार्याने संमिश्र सरकार स्थापनेवर तर दूसरा गट दोन्ही काँग्रेस पक्षांचे मित्र मंत्रिमंडळ स्थापन करावे या विचारावर ठाम होता.

पु.लो.आ.चा प्रयोग केंद्रातील जनता सरकार प्रमाणेच अल्पायुषी ठरला. ऑगस्ट १९७९ मध्ये जनता पक्ष दुभंगला आणि त्याची परिणिती म्हणजे महाराष्ट्रातील जनता पक्ष विभागला गेला. एका गटाने नेतृत्व समाजवादी पन्नालाल सुराणा यांच्याकडे तर दुसऱ्या गटांचे नेतृत्व जनसंधी हशू अडवाणी यांच्याकडे गेले. असे असले तरीही महाराष्ट्रातील पु.लो.आ. कायम राहीली. परंतु देशात एकूणच काँग्रेसेतर पक्षविषयी जनतेचा भ्रमनिरास झाल्याने, जानेवारी १९८० च्या निवडणूकीत इंदिरा गांधीचा काँग्रेस (इं) केंन्द्रात पुन्हा सत्तेवर आला. फेब्रुवारी १९८० मध्ये महाराष्ट्राची विधानसभा बरखास्त करण्यात आली. म्हणजेच महाराष्ट्रातला काँग्रेसेतर शासनाचा पहिला प्रयत्न अल्पायुषी ठरला.

**७) एक पक्ष प्रभुत्व पद्धतीचा दुसरा टप्पा (१९८०-९०) -** १९८० च्या विधानसभा निवडणुकीत एक पक्ष प्रभुत्व पद्धतीची फेर स्थापना झाली. १९८० व १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत (ई) काँग्रेसनी स्पष्ट बहुमत मिळवले. १९८० व १९८५ च्या निवडणुकात काँग्रेसला मुख्य आव्हान समाजवादी काँग्रेस पक्षाचे होते. परंतु या कालखंडात टप्याटप्याने या पक्षातील बहुसंख्य नेते व कार्यकर्ते स्वगृही परतले. डिसेंबर १९८६ मध्ये काँग्रेस (स) चे काँग्रेस (इं) मध्ये विलिनीकरण झाले. शरद पवार काँग्रेसमध्ये गेल्यानंतर विरोधी पक्षाच्या राजकारणात फार मोठी पोकळी निर्माण झाली. परंतु अल्पावधीत ती पोकळी शिवसेना या आक्रमक प्रादेशिक पक्षाने भरून काढली. १९८६-८९ या काळात शिवसेना या प्रादेशिक पक्षांचा ग्रामीण महाराष्ट्रात प्रचंड वेगाने प्रसार झाला. १९८९ साली शिवसेना व भारतीय जनता पक्ष यांची आघाडी झाली. हिंदुत्वाच्या मुद्यावर या आघाडीला १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत १९ जागा मिळाल्या. देशातील इतर राज्याप्रमाणे, महाराष्ट्रात एका प्रादेशिक पक्षाने एका राष्ट्रीय पक्षाशी आघाडी करून काँग्रेस पक्षाला जबरदस्त आव्हान निर्माण केले.

**८) द्विपक्ष पद्धतीची सुरुवात (१९९० नंतरचा कालखंड) -** १९९० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला १४१ तर शिवसेना-भाजप युतीला ९४ जागा मिळाल्या. म्हणजेच महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला समर्थ पर्याय ठरू शकेल अशा राजकीय शक्तीचा उदय झाला. काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत गटबाजीचे राजकारण अधिक तीव्र झाले आणि पक्ष अधिकाधिक क्षीण होत गेला. तर शिवसेना-भाजपा युतीने आक्रमक धोरण स्वीकारले. या सर्वांची परिणिती म्हणजे १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला केवळ ८० जागा मिळाल्या. शिवसेना-भाजपा युतीस सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या तरी

स्पष्ट बहुमत मिळाले नाही. काँग्रेस पक्षाने उमेदवारी नाकारलेले बंडखोर अपक्ष म्हणून निवडून आले. काँग्रेस पक्ष सत्तेवर येण्याची शक्यता नसल्याने या अपक्षांची शिवसेना-भाजपाबरोबर राजकीय सौदेबाजी करून युतीला आपला पाठिंबा दिला. अशाप्रकारे वास्तव अर्थाने पहिले बिगर काँग्रेस सरकार १९९५ साली सत्तेवर आले. १९९० साली प्रारंभ झालेल्या स्पर्धात्मक द्विपक्ष पद्धतीची परिणिती १९९५ सालच्या सत्तांतरात झाली. काँग्रेस पक्षाने सत्ता गमावली असली तरी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रातील प्रभावी राजकीय शक्ती आहे आणि त्यात फेरसत्ता संपादन करण्याची क्षमता आहे. याची प्रचिती १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत आली. राजकीय ध्रुवीकरणाच्या प्रक्रियेची सुरुवात या निवडणुकीच्या निमित्ताने झाली. आपला सामाजिक पाया विस्तृत करण्यासाठी काँग्रेसने रिपब्लिकन पक्ष व समाजवादी पक्षांशी युती केली. लोकसभेच्या ४८ पैकी ३७ जागा काँग्रेस युतीने जिंकल्या. शिवसेना-भाजपा युतीला केवळ १० जागा मिळाल्या. शेतकरी कामगार पक्षाला १ जागा मिळाली. अन्य सर्व राजकीय पक्ष निष्प्रभ ठरले. केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखली संमिश्र सरकारच्या विरोधात अन्य राजकीय पक्ष एकत्र येण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. त्याच प्रक्रियेचा एक भाग म्हणजे महाराष्ट्रात 'धर्मनिरपेक्ष' शक्तींचे ऐक्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने केले जाणारे प्रयत्न होय. १९९९ च्या विधानसभा निवडणुकीच्यावेळी महाराष्ट्रातील मतदारांनी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाड्या आणि शिवसेना-भाजपा युती दोन समर्थ पर्याय उपलब्ध होते. कारण आता राष्ट्रवादी काँग्रेस इतर राजकीय पक्ष यापैकी एका युतीचे घटक असतील. अशा प्रकारे एक पक्ष प्रभुत्वापासून स्पर्धात्मक द्विपक्ष पद्धती अशी महाराष्ट्रातील पक्षपद्धतीची वाटचाल आहे. सत्तेचे राजकारण, स्थानिक समस्या व प्रादेशिक अस्मिता यातून प्रादेशिक पक्षांची निर्मिती होत असते. काँग्रेसमधून बाहेर पडून महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्ष हा प्रादेशिक पक्ष १९४८ साली अस्तित्वात आला. डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांचा रिपब्लिकन पक्ष स्वतःला भारतीय म्हणवत असला तरी तो प्रादेशिक पक्षच आहे. या व्यतिरिक्त शिवसेना वास्तव अर्थाने प्रादेशिक अस्मितेचे प्रतिनिधित्व करणाराच पक्ष आहे. काँग्रेसेतर अखिल भारतीय पक्षांच्या तुलनेत शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी काँग्रेस पक्ष आणि गेल्या दशकात शिवसेना अधिक प्रभावी असल्याचे दिसून येते.

**प्रश्न २. रा. काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व स्पष्ट करा / काँग्रेस पक्षाची निवडणुकीतील कामगिरी स्पष्ट करा. काँग्रेसच्या सामर्थ्याची कारणमिमांसा करा.**

**१. प्रास्तविक -**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने लोकशाहीचा स्वीकार केल्याने, राजकीय पक्ष भारतीय राजकीय व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनले. येथे पक्षपद्धतीचा विकास स्वातंत्र्योत्तर काळात विविध राजकीय विचारसरणी, आर्थिक, सामाजिक हितसंबंधाच्या सत्तासंघर्षातून झाला. लोकांच्या राजकीय आकांक्षा, भाषा-धर्म-संस्कृतीची विविधता यामुळे भारतात अनेक राजकीय पक्षांची निर्मिती झाली. १८८५ मध्ये काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. त्यांचे १९६७ पर्यंत केन्द्र व राज्य सरकारात प्रभुत्व होते. त्यानंतरच्या काळात त्यास इतर पक्षांचे आव्हान मिळाल्याने भारतीय पक्षपद्धतीच्या स्वरूपात अनेक बदल झाले.

**२. काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व -**

स्वातंत्र्योत्तर काळात प्रा. रजनी कोठारी यांनी विशद केलेली काँग्रेस व्यवस्था महाराष्ट्रात जरी १९९५ पर्यंत अस्तित्वात असली तरी काँग्रेस पक्षाच्या स्वरुपात, नेतृत्वात अनेक उल्लेखनिय बदल

घडून आले. एकसंघ असलेला काँग्रेस पक्ष, राष्ट्रपती पदाकरिता उमेदवार निवडण्याच्या प्रश्नावर १९६९ साली फुटून सत्तारुढ व संघटना काँग्रेस असे दोन काँग्रेस पक्ष राष्ट्रीय पातळीवर स्थापन झाले. महाराष्ट्रात मात्र हा पक्ष जवळपास एकसंघ राहीला. १९७८ साली काँग्रेस पक्ष पुन्हा दुभंगला. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांना मानणारा आणि इंदिरानिष्ठांचा गट असे दोन पक्ष स्थापन झाले. याचाच पुढचा टप्पा म्हणजे १९७८ साली शरद पवार यांनी समाजवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. १९९८ साली पुन्हा फूट पडून, शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्याची स्थापना केली.

प्रा. रजनी कोठारी यांनी १९६४ साली भारतीय राजकीय व्यवस्थेचे 'काँग्रेसी व्यवस्था' असे वर्णन केले होते. १९९९ पर्यंतच्या महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीचे ते अत्यंत समर्पक वर्णन आहे. प्रा. कोठारी यांचा काँग्रेस पद्धतीचा अभिप्रेत असलेला अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

**i) सत्तेत केंद्रस्थानी** : या शब्दप्रयोगाचे विश्लेषण करतांना प्रा. कोठारी यांनी असे म्हटले आहे की, हा देशातला एकमेव राजकीय पक्ष आहे, जो १९५२ पासून काँग्रेस पक्ष सतत सत्तेवर राहीला व काँग्रेसेतर पक्ष विरोधी पक्षाची भूमिका बजावतात. १९७८-८० आणि १९९५ ते १९९९ या कालखंडाचा अपवाद वगळता २०१४ पर्यंत महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष सतत सत्तेवर राहिला. तर इतर पक्षांचे स्वरूप दबाव गटाचे आहे.

**ii) मुख्य प्रवाह पक्ष** : स्वातंत्र्यपूर्व काळात विभिन्न राजकीय विचारसरणीचे लोक काँग्रेसमध्ये होते. स्वातंत्र्यनंतर ते काँग्रेसमधून बाहेर पडले. यातून समाजवादी पक्षाची व शेतकरी कामगार पक्षांची निर्मिती झाली. १९६९ साली संघटना काँग्रेस, १९७८ साली चव्हाणांचा काँग्रेस पक्ष, १९७८ साली शरद पवारांचा समाजवादी काँग्रेस पक्ष आणि १९९८ साली राष्ट्रवादी काँग्रेस इत्यादी मुख्य प्रवाहातून अलग झालेले राजकीय पक्ष आहेत. कालांतराने असे बाहेर गेलेले अनेक गट, नेते व कार्यकर्ते महाराष्ट्रात स्वगृही परतले आहेत.

**iii) मध्य-मार्गी विचारसरणी** : राजकीय विचारसरणीच्या दृष्टीने भाजप, शिवसेना हे उजवीकडे झुकलेले तर शेतकरी कामगार पक्ष व साम्यवादी पक्ष डावीकडे झुकलेले पक्ष आणि काँग्रेस हा मध्यमार्गी पक्ष आहे. इतर राजकीय पक्षांचे कार्यक्रम काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमाची प्रतिक्रिया म्हणून हाती घेतले जात असे. इतर काही पक्षांच्या निवडणूक जाहिरनाम्याशी तुलना केली तर बहुसख्य पक्षांचा जाहिरनामा काँग्रेसच्या जाहिरनाम्याशी मिळताजुळता वाटतो. त्यामुळे इतर पक्ष वैचारिकदृष्ट्या काँग्रेसपेक्षा कसा वेगळा आहे याचे उत्तर देऊ शकत नाही. म्हणून भारतीय राजकीय व्यवस्थेची वैचारिक भूमिका ही काँग्रेसचीच वैचारिक भूमिका आहे.

**३. कांग्रेस सामर्थ्याची कारणमिमांसा -**

ज्यास प्रा. रजनी कोठारी 'कांग्रेस व्यवस्था' म्हणतात त्या वस्तुस्थितीचे वर्णन मोरिस जॉन्ससारखे पाश्चात्य विचारवंत, 'एक पक्ष प्रभुत्व पद्धती' असे करतात. काँग्रेस व्यवस्था किंवा एक पक्ष प्रभुत्व पद्धती महाराष्ट्रात १९९५ पर्यंत होती. याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:

**i) प्रभावी जातीसमूह** : राजकीय विचारवंताच्या मते, जाती संस्थेने भारतीय राजकारण पूर्णपणे व्यापून टाकले आहे. निवडणुकीच्या वेळी उमेदवारांची निवड करतांना राजकीय पक्ष उमेदवारांची जात बघतात. तर मतदार आपल्या जातीच्या उमेदवारास मतदान करतात. महाराष्ट्राच्या राजकारणाचे खास वैशिष्ट्य म्हणजे मराठी-कुणबी जाती समुहाचे प्रभुत्व होय. महाराष्ट्रात या जाती समुहाची लोकसंख्या ४० टक्के आहे. १९९० सालापर्यंत या जातीसमुहाचा काँग्रेसला पाठिंबा होता. संयुक्त

महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर इतर पक्षातील मराठा नेते काँग्रेसमध्ये आले. या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील अनुसूचित जातींचा व अनुसूचित जमातींचा आणि अल्पसंख्यांक गटांचा काँग्रेसला पाठिंबा मिळत राहिला. त्यामुळे १९९९ सालपर्यंत काँग्रेस पक्षांतर्गत कितीही गटबाजी असली तरीही काँग्रेस पक्ष सत्तेवर राहण्यात यशस्वी ठरला. मात्र १९८७ सालापासून भाजपा आणि शिवसेना या पक्षांनी अपला सामाजिक पाया विस्तृत केल्याने, इतर मागास जाती व असंतुष्ट मराठा समाज काँग्रेसपासून दुरावत गेला. गेल्या काही वर्षात अल्पसंख्यांकदेखील काँग्रेसपासून दुरावले आहेत.

**ii) पंचायती राज आणि सहकारी संस्था** : प्रा. सिरसीकर यांनी पंचायतीराज संस्था व सहकारी संस्थाना महाराष्ट्रातील प्रभावी सत्ताकेंद्रे असे म्हटले आहे. महाराष्ट्रात पंचायतीराज संस्था अस्तित्वात आल्यापासून काही अपवाद वगळता त्या कांग्रेस पक्षाच्या नियंत्रणाखाली राहिल्या आहेत. मात्र गेल्या २० वर्षात भाजपा-शिवसेनेने काही जिल्ह्यांत काँग्रेसला कडवे आव्हान उभे केले. आहे. १९६० नंतर ग्रामीण महाराष्ट्रात सहकारी संस्थाचा फार मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. त्यापैकी जिल्हा सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या सर्वात महत्वाच्या आहेत. या सहकारी संस्थाचा अपवाद वगळता, इतर सर्व काँग्रेसच्या नियंत्रणाखाली होत्या, म्हणजेच ७० टक्केहून अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामीण महाराष्ट्रातील राजकीय व आर्थिक व्यवहारांची सूत्रे काँग्रेसच्या ताब्यात असल्याने काँग्रेस पक्ष प्रदीर्घ काळ सत्तेवर राहीला.

**iii) प्रभावी नेतृत्व** : भारतासारख्या विकसनशील देशात अलौकिक व्यक्तित्वाची भूरळ जनसामान्यांवर नेहमीच पडते. पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी हे राष्ट्रीय पातळीरचे काँग्रेसचे अलौकिक व्यक्तिमत्त्व असलेले नेते होते. त्यांचा प्रभाव महाराष्ट्रातील सर्वसामान्य मतदारांवर दिसतो. राज्यपातळीवर यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व शरद पवार यासारखे खंबीर नेतृत्व काँग्रेस पक्षाला मिळाले. त्यांनी ग्रामीण व शहरी भागावरची आपली पकड ढिली होऊ दिली नाही. आपलाच पक्ष बहुजन समाजाचा आणि इतर पक्ष 'ब्राह्मणी पक्ष' अशा प्रकारच्या मिथ्थकांचा काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी अत्यंत प्रभावीपणे वापर केला. त्यामुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजाला काँग्रेसपक्षाचे नेतृत्व आपले नेतृत्व वाटत होते.

**iv) बेरजेचे राजकारण** : संयुक्त महाराष्ट्राच्या स्थपनेनंतर काँग्रेस पक्षाचे नेतृत्वात फेरबदल प्रस्थापित करण्याकरिता व विरोधी पक्षास, नामोहरम करण्यास यशवंतराव चव्हाणानी बेरजेच्या राजकारणाचा वापर केला. बेरजेचे राजकारण म्हणजे माणसे जोडणे. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतरावांनी काँग्रेसेतर पक्षांतील मराठा नेतृत्वास काँग्रेसमध्ये येण्यास उद्युक्त केले. त्यामुळे केवळ शेकापमधील नव्हे तर प्रजासमाजवादी व साम्यवादी पक्षातील बहुसंख्य मराठा नेते काँग्रेसमध्ये गेले. पंचायती राजच्या स्थापनेनंतर इतर पक्षातून काँग्रेस पक्षात आलेल्या कार्यकर्त्यांना स्थानिक पातळीवरील राजकारणात नेतृत्वाची संधी दिली. त्यांच्या पुरोगामी धोरणामुळे दलितांतील अनेक गट काँग्रेसमध्ये आले. तर १९६७ साली गायकवाड गट तर १९९० पासून रामदास आठवले यांचा गट काँग्रेसशी सहकार्य करत होता. इतर मागासवर्गीयांना देखील यशवंतरावांनी नेतृत्वाची पुरेशी संधी उपलब्ध करून दिली. १९७५ पर्यंत काँग्रेस पक्षांतर्गत जातीनिहाय गट असले तरी यशवंतरावांचे नेतृत्व सर्वमान्य होते. अशा प्रकारे यशवंतरावांनी विविध गटांना काँग्रेस पक्षात आणून विशेषतः ग्रामीण भागात काँग्रेसचा पाया व्यापक व भक्कम केला. मात्र गेल्या तीन दशकात काही समाज घटक काँग्रेसपासून दूरावले आहेत.

**v) कमकुवत विरोधी पक्ष** : शिवसेनेचा उदय होईपर्यंत महाराष्ट्रात वास्तविक अर्थाने प्रभावी विरोधी पक्ष अस्तित्वात नव्हता. काँग्रेसतर पक्षांनी नकारात्मक मतदानाचा फायदा १९५७ व १९७७ साली प्राप्त केला असला तरी पुढच्या निवडणूकीत त्या जागा त्यांना टिकविता आल्या नाही. याचे प्रमुख कारण इतर पक्षाकडे संघटनात्मक बळ नव्हते. या पक्षांत अंतर्गत मतभेद असल्याने, त्यांची एकजूट दीर्घकाळ टिकत नाही. १९७९ साली जनता पक्ष व १९९१ साली जनता दल दुभंगले. १९९० पर्यंत आपणास सत्ता प्राप्त होईल अशी अपेक्षा काँग्रेसतर पक्षांनी बाळगली नाही. त्यामळे सत्ता प्राप्तीकरिता कसोशिने कधीही प्रयत्न केला नाही. पंचायती राज व सहकारी संस्था यांनी काँग्रेसला आंदण दिल्यामुळे बहुसंख्य राजकिय पक्षांचा प्रभाव शहरी भागापुरता सीमित होता.

**vi) सतत सत्तेवर रहाण्यापासून होणारे फायदे** : १९४६ ते १९९५ पर्यंत मराठी भाषिक प्रदेशावर काँग्रेस पक्षाने राज्य केले. सतत सत्तेत असल्याने प्रशासकीय यंत्रणा काँग्रेस धार्जिणी बनली. उद्योगपती, उद्योग समुहांच्या देणग्या काँग्रेस पक्षालाच प्राप्त होत असत. काँग्रेस पक्षात गेलो तरच आपली सत्ता प्राप्तीची आकांक्षा पूर्ण होईल असे विरोधी पक्ष नेत्यांना वाटत असल्याने सातत्याने एकमार्गी पक्षांतरे होत गेली. परिणामी काँग्रेसच्या सामर्थ्यात वाढ झाली. अशा प्रकारे सतत सत्तेवर राहण्याचे फायदे काँग्रेस पक्षाला मिळाले.

**४. काँग्रेस पक्षाच्या कामगिरीचे विश्लेषण :**

१८८५ साली मुंबई मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसव्ही स्थापना झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महात्मा गांधीनी राष्ट्रीय महासभेचे विसर्जन करावे व संघटनेच्या कार्यकर्त्यांची रचनात्मक कार्य करावे असा सल्ला दिला होता. परंतु घटनानिर्मितीच्या आणि स्वातंत्र्योतर काळात देशासमोर उद्भवलेल्य समस्यांमुळे असा सल्ला अमान्य केला. पुढे काँग्रेसचे १९४८ साली राजकीय पक्षात रूपांतर झाले.

टिळक-गांधी-नेहरु आणि यशवंतराव चव्हाणांचा पक्ष अशी या पक्षाची महाराष्ट्रातील जनमानसातील प्रतिमा आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा हा पक्ष आहे. मराठी-कुणबी जातीसमूहाच्या हितसंबंधाचे, श्रीमंत शेतकरी वर्गाचे संवर्धन करणारा पक्ष म्हणजे काँग्रेस पक्ष होय. प्रा. सिरसिकर यांच्या मते, महाराष्ट्रात कांग्रेस पक्षाचे, एका जातिसमूहाचे व एका वर्गाचे प्रभुत्व आहे आणि ते पूर्णपणे एकरूप झाले आहेत. तर ज्यांचे महाराष्ट्र काँग्रेस पक्षावर वर्चस्व आहे तो मराठा जातीसमूह आणि मराठा जातीचे धुरिणत्व ज्यांच्याकडे आहे ते म्हणजे ग्रामीण भागातील सहकारी चळवळीतून श्रीमंत झालेले बागाईतदार शेतकरी होय. तर बहुसंख्य अनुसूचित जाती-जमाती काँग्रेसला अनुकूल आहेत. तर बहुसंख्य नवबौध्द रिपब्लिक पक्षाचे पाठेराखे आहेत. अल्पसंख्याकांचा पाठिंबा काँग्रेसला असे, परंतु १९९२ नंतर अल्पसंख्याकांपैकी मुस्लिम मतदार काँग्रेसला पाठिंबा देत नाहीत, परंतु काँग्रेसला पर्यायी ठरू शकेल असा अन्य प्रभावी मध्यमार्गी पक्ष १९९० पर्यंत महाराष्ट्रात नसल्याने, अल्पसंख्य असलेल्या मुस्लिम समुदायाला मुलायमसिंग यादव यांच्याशिवाय 'दुसरा पर्याय' मिळाला नाही. त्यामुळे काँग्रेस आणि समाजवादी पक्षात त्यांच्या मतांची विभागणी झाल्याचे दिसून आले.

**५. काँग्रेस पक्षाची संघटनात्मक रचना :**

अखिल भारतीय आणि राज्यव्यापी स्वरुपाची संघटना असलेला काँग्रेस एकमेव राजकीय पक्ष आहे. प्रत्येक गावात आणि शहरात स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात या पक्षाची संघटना स्थापन करण्यात आली होती. स्वातंत्र्योत्तर कालखंडात विधानसभा मतदारसंघ पातळीवर तालुका काँग्रेस समिती, जिल्हा पातळीवर जिल्हा काँग्रेस समिती आणि यातून निर्वाचित प्रतिनिधींची प्रदेश काँग्रेस

समिती स्थापन करण्यात येते. १९६० पूर्वी मराठी भाषिक प्रदेशास महाराष्ट्र, नागपूर, विदर्भ मराठवाडा आणि मुंबई अशा पाच प्रदेश काँग्रेस समित्या होत्या. १९६० साली मुंबइ प्रदेश समिती आणि उर्वरित भागाकरिता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीची स्थापना करण्यात आली होती. १९६९ पूर्वी नियोजित वेळी प्राथमिक व क्रियाशील सभासद गट काँग्रेस समित्यांच्या निवडणुकात सहभागी होत असे. त्यानंतर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची पक्षश्रेष्ठींद्वारा नेमणूक करण्याची पद्धत प्रचलित होती. काँग्रेस अखिल भारतीय पक्ष असल्याने महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समिती अखिल भारतीय काँग्रेस समिती वरील आपल्या प्रतिनिधींची निवड करते. त्यातूनच पक्षाच्या कार्यकारी मंडळांची व संसदीय मंडळाची निवड करण्यात येते. राज्य पातळीवर संघटना व शासनाची फारकत करण्यात आल्याचे दिसून येते. इंटक, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, माथाडी कामगार संघ या कामगार संघटना, एन.एस.यु.आय. ही विद्यार्थी संघटना महिला काँग्रेस, सेवादल इत्यादी पक्षाशी निगडित संघटना आहे.

**६. निवडणूकीतील कामगिरी :**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात विधानसभेची पहिली निवडणूक १९६२ साली झाली. त्यात काँग्रेसला ५१ % मते व २६४ पैकी २१५ जागा मिळाल्या. १९६७ साली महागाईग्रस्त जनतेत असमाधान असल्याने व विदर्भ भागात महाविदर्भाचा प्रश्न प्रतिष्ठेचा झाल्याने, काँग्रेसच्या मतांची टक्केवारी व जागांची संख्या कमी झाली.

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्ष १९७८ मध्ये दुभंगला व विधानसभेच्या २८८ पैकी १४० जागा काँग्रेस(इं)व काँग्रेस(स)या पक्षांना मिळाल्या. दोन्ही पक्षांच्या एकूण मतांची टक्केवारी १९७२ प्रमाणे ५६% होती. म्हणजे काँग्रेस पक्षच काँग्रेसला पराभूत करू शकतो याची प्रचिती आली.

१९८० च्या निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षाविषयी जनतेचा भ्रमनिरास झाला होता. त्यामुळे काँग्रेस(आय)व काँग्रेस (स)यांनी एकत्रित ६५% मते आणि २३३ जागा मिळाल्या. त्यापैकी १८५ जागा काँग्रेस आयला मिळाल्या. १९८५ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षांना संयुक्तपणे ६१% मते २९६ जागा आणि काँग्रेस आयला १५५ जागा मिळाल्या. १९९० च्या निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीने व पुलोदने काँग्रेसला कडवी झुंज दिली. काँग्रेसच्या मताच्या टक्केवारीचे निच्चांक गाठला. तसेच २८८ पैकी १४१ जागा मिळवून काँग्रेसने अल्पमतातील सरकार स्थापन केले. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसचा नामुष्कीकारक पराभव झाला. केवळ ८० जागा मिळाल्या. त्याची परिणिती राजकीय सत्तांतर होऊन सत्तारुढ काँग्रेस पक्ष प्रमुख विरोधी पक्ष बनला. १९९९ साली काँग्रेसने, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सहकार्याने सत्ता संपादन केली २००४ आणि २००९ च्या निवडणुकात आपली सत्ता टिकवली. २०१४ व २०१९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला.

**प्रश्न ३. रा. काँग्रेसच्या ऱ्हासाची कारणमिमांसा करा.**

**१) प्रास्तविक -**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात लोकांच्या राजकीय आकांक्षा, भाषा-धर्म-संस्कृतीची विविधता यामुळे अनेक राजकीय पक्षांची निर्मिती झाली. १८८५ मध्ये काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. त्यांचे १९६७ पर्यंत केन्द्र व राज्य सरकारात प्रभुत्व होते. त्यानंतरच्या काळात त्यास इतर पक्षांचे आव्हान मिळाल्याने भारतीय पक्षपद्धतीत अनेक बदल झाले. पुढे २००४ नंतर काँग्रेसचा ऱ्हास होत गेला.

२) काँग्रेसच्या ऱ्हासाची कारणमिमांसा :

१९७८ ते १९९५ हा कालखंड महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभुत्व गाजवणाऱ्या काँग्रेस पक्षाचा प्रभाव, सामर्थ्य उतरणीस लागण्याचा कालखंड आहे. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी संपूर्ण देशात काँग्रेस विरोधाची लाट आली असतानाही, महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाने ४८ पैकी २८ जागा मिळवल्या. परंतु १९७८ तो पक्ष दुभंगला. त्याचे पडसाद १९७८ नंतरच्या विधानसभा दोन्ही काँग्रेस पक्ष एकत्र आले असली तरी काँगेस पक्ष पुन्हा एकसंघ होऊ शकला नाही. त्यातूनच काँग्रेस पक्षाचे सामर्थ्य कमी होत गेले. त्याची कारणीमीमांसा खालीलप्रमाणे करता येईल.

**i) पक्षश्रेष्ठींची धोरणे** : १९६२ ते १९७५ या कालखंडात यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व महाराष्ट्र काँग्रेसमध्ये होते. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत श्रीमती इंदिरा गांधी यांचे राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व सर्वमान्य झाल्यानंतर त्यांनी राज्यस्तरावरील सामर्थ्यशाली नेत्यांच्या सामर्थ्याची खच्चीकरणाचे धोरण स्वीकारले. यशवंतराव चव्हाण वास्तवरीत्या बहुजन समाजाचे सर्वसामन्य नेते असताना ते मराठा समाजाचे नेते आहेत, म्हणून बहुसंख्य असलेल्या मराठेतर समाजाने त्यांना विरोध करावा अशी व्यूहरचना आखली. १९७२ नंतर मराठा-मराठेतर वाद वाढत गेला आणि १९७८ साली पक्ष दुभंगला. या वादाची परिणिती म्हणजे काँग्रेस हा मराठ्यांचा पक्ष आहे आणि मराठेतर जातींवर अन्याय होत आहे, या समजुतीमुळे काही समाजघटक काँग्रेस पक्षापासून दुरावले. पुढे १९७५ साली पक्षश्रेष्ठींच्या दबावामुळे प्रदीर्घ काळ मुख्यमंत्री असलेल्या वसंतराव नाईकाना राजीनामा द्यावा लागला आणि पक्षश्रेष्ठी म्हणजेच 'हाय कमांड' ने महाराष्ट्रावर मुख्यमंत्री लादण्याचा आणि बदलण्याच्या चूकीचा पायंडा पाडला. मंत्रिमंडळांची रचना पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार करण्याची प्रथा सुरु झाली आणि त्यात शहकाटशहाचे राजकारण करण्यात आले. अशा प्रकारे पक्षश्रेष्ठींचे दीर्घदृष्टीचा अभाव असलेले धोरण आणि कूटनिती महाराष्ट्रात काँग्रेसच्या पराभवास जबाबदार ठरली.

**ii) तिव्र स्वरुपाची गटबाजी** : महाराष्ट्र काँग्रेमध्ये १९७२ पूर्वी गटबाजीचे राजकारण असले तरी ते पक्षाच्या अस्तित्वाला धक्का देण्याइतपत तिव्र नव्हते. पक्षश्रेष्ठींच्या आशिर्वादाने हेच राजकारण वाढत गेले आणि शेवटी १९९५ साली काँग्रेसनेच काँग्रेसचा पराभव केला. पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात असंतुष्ट गट बंडखोरी करू लागले किंवा अधिकृत उमेदवारास पराभव करण्यासाठी काँग्रेसेतर पक्षाच्या उमेदवारांना फौजफाटा पुरवू लागले. अश्या कारणामुळे १९७५ नंतर वारंवार मुख्यमंत्री बदलले जाऊ लागले. थोडक्यात गटबाजीच्या राजकारणामुळे काँग्रेस पक्ष पोखरला गेला. तरीही १९९० पर्यंत प्रभावी विरोधी पक्ष अस्तित्वात नसल्याने हाच पक्ष पुन्हा सत्तेत येत. त्याला १९९० च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाने धोक्याचा इशारा दिला, परंतु गटबाजीच्या राजकारणात मग्न असलेल्या नेत्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. अखेर १९९५ साली सत्ता गमावली. विशेष म्हणजे शिवसेना भाजपाला स्पष्ट बहुमत मिळवून देण्यासाठी अपक्षांचा फौजफाटा काँग्रेस पक्षाच्या विशिष्ट गटानेच पुरवला. म्हणजेच पक्षांतर्गत असलेली तीव्र स्वरुपाची गटबाजी काँग्रेसच्या ऱ्हासास कारणीभूत ठरली.

**iii) मराठ्यांचे धुरिणत्व** : मराठ्यांचे धुरिणत्व हे काँग्रेस पक्षाचे सामर्थ्य आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाणांनी बेरजेचे राजकारण करताना मराठेतर जातीसमुहांच्या राजकीय आकांक्षांची योग्य ती दखल घेतली. पक्षश्रेष्ठींच्या आत्मघातकी राजकारणामुळे १९७२ नंतर महाराष्ट्रात मराठा-मराठेतर वाद वाढत गेला. महाराष्ट्रात काँग्रेसच्या राजकारणाचे सुत्रे सर्वकाळ मराठा नेतृत्वाकडेच राहिली. त्यामुळे मराठ्यांचे घुरिणत्व संपुष्टात आणण्यास मराठेतर जातीचे नेते प्रयत्न

करून लागले. त्यास काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी खतपाणी पुरविले. मराठा-मराठेतर वादाची परिणिती पक्षांतर्गत गटबाजी वाढण्यात झाली. ते गट शिवसेना-भाजपा या काँग्रेसला पर्याय ठरू शकरणाऱ्या राजकीय शक्तीकडे वळले. तर असंतुष्ट मराठा नेतेदेखील आपल्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्यासाठी शिवसेना-भाजपाकडे वळले. म्हणजेच मराठा जातीचे धुरिणत्व मराठेतर जातींना मान्य नाही. विशिष्ट मराठ्यांचे नेतृत्व अन्य मराठा नेत्यांना मान्य नाही. याचा एकत्रित परिणाम म्हणजे काँग्रेसचा पाया कमकुवत झाला. परिणामी महाराष्ट्राच्या राजकारणावरील त्यांचे वर्चस्व संपुष्टात आले.

**iv) सामाजिक पायाचे आकुंचन**: १९६० साली काँग्रेस पक्षाचा सामाजिक पाया व्यापक होता आणि बेरजेच्या राजकारणामुळे तो उत्तरोत्तर विस्तृत झाला होता. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या पार्श्वभूमीवर हा पक्ष बहुजन समाजाच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करत होता. अनुसूचित जाती व अनुसूचीत जमाती आणि अल्पसंख्य गटांचा देखील त्यास पाठिंबा होता. पक्षाचा सामाजिक पाया व्यापक असल्याने पक्षातील गटबाजीचा पक्षाच्या निवडणुकांतील कामगिरीवर विशेष परिणाम होत नसे. १९७२ नंतर मराठा-मराठेतर वादामुळे विदर्भातील काही इतर मागास जाती काँग्रेसपासून दुरावल्या. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर केल्याने मराठा समाज व  मंडल आयोगाच्या शिफारसींच्या अंमलबजावणीवरून काही इतर मागास जाती दुरावल्या. तर अंमलबजावणी करण्याच्या निर्णयामुळे मराठा महासंघ काँग्रेसच्या विरोधात गेला. १९९२-९३ च्या दंगलीनंतर मुस्लीम समाज दुखावला गेला आणि त्याच्या पाठिंब्यात घट झाली. अशा प्रकारे काँग्रेस पक्षाचा सामाजिक पाया घटत गेला.

**v) संघटनात्मक दौर्बल्य** : १९६० साली महाराष्ट्रव्यापी संघटना असलेला काँग्रेस हा एकमेव राजकीय पक्ष होता. संघटनात्मक पाया विस्तृत करण्याच्या उद्देशाने पंचायतीराज संस्था व सहकारी संस्थांमध्ये ग्रामीण भागातील नेत्यांना, कार्यकत्यांना संधी देण्यात आली. मात्र कालांतराने पंचायती राजसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी साखर कारखाने इत्यादी ग्रामीण भागातील सत्ताकेंद्रे बनली. स्थानिक नेतृत्वाने त्यावर आपले लक्ष केंद्रित केले. परिणामी पक्षाच्या संघटनेकडे दुर्लक्ष केले. प्रभावी पक्ष संघटना अस्तित्वात नाही किंवा निष्क्रिय आहे अशी परिस्थिती उद्भवली.

**vi) आत्मकेंद्रीत राजकारण** : प्रदीर्घ काळ सत्तेवर राहिल्याने जसे फायदे असतात, तसेच काही तोटेही असतात. सत्तेच्या राजकारणात मशगूल असणाऱ्या काँग्रेस नेत्यांना पक्ष कमकुवत होत चालला आहे, त्याचा पाया ढासळत आहे याची जाणीव नव्हती. प्रत्येक नेता पक्षाचे हिताऐवजी स्वतः चे, हित जोपासत असे. उदा. १९९५ सालच्या निवडणुकीत त्यांनी परस्परांचे इतके उमेदवार नामोहरम केले की बहुमतातील काँग्रेस पक्ष अल्पमतात केव्हा गेला हे त्यांना समजले देखील नाही. थोडक्यात आत्मकेंद्री राजकारण काँग्रेसच्या ऱ्हासाचे महत्त्वाचे कारण आहे.

**vii) पक्ष आणि पक्षनेतृत्वाची डागाळलेली प्रतिमा** : सतत सत्तेवर राहिल्यामुळे भ्रष्ट राजकारण्यांचा पक्ष अशी काँग्रेसची प्रतिमा निर्माण झाली. तर काँग्रेस नेत्यांच्या अखत्यारीतील प्रत्येक संस्थेत कमी-अधिक प्रमाणात भ्रष्टाचार सुरु झाला. सहकारी साखर कारखाने तोट्यात चालतात, ऊस उत्पादक शेतकऱ्यांची व कारखान्यातील कामगारांची थकबाकी वाढत चालली आहे. विज व पाण्याची करोडो रुपयांची देयके थकली आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पतसंस्थांची आर्थिक परिस्थिती खालावली आहे. या अवनतीस काँग्रेस पक्षाचे नेतृत्व जबाबदार आहे असा सर्वसामान्य मतदारांचा समज होत गेला. पक्षाची एकूण प्रतिमाच डागाळलेली असल्याने, खैरनार, अण्णा हजारे यांनी केलेल्या आरोपांची सत्य-असत्यता आजमावण्याची गरज लोकांना वाटली नाही. त्यांनी काँग्रेसला धडा शिकविण्यासाठी

उपलब्ध असलेल्या अन्य पर्यायी पक्षांच्या बाजूने मतदान केले. अशा प्रकारे पक्ष व त्यांच्या नेत्यांची डागाळलेली प्रतिमा काँग्रेसच्या ऱ्हासास कारणीभूत ठरली. पुढील काळात कॉंग्रेस विरोधी पर्याय प्रभावी होत असताना काँग्रेस नेते निष्क्रिय राहिले, गटबाजीचे राजकारण करत राहिले. त्यामुळे 'एक धक्का और दो' आणि 'कांग्रेस फेक दो' ही कृती प्रत्यक्षात साकार होऊ लागली. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचे अस्तित्व धोक्यात आले आहे याची जाणीव काँग्रेस नेत्यांना झाली.

**प्रश्न ४ था. भारतीय जनता पक्षाची निवडणुकीतील कामगिरी स्पष्ट करा.**

**१. प्रास्ताविक -**

भारतीय जनता पक्ष म्हणजेच पूर्वाश्रमाचा भारतीय जनसंघ हा पक्ष आघाडीच्या राजकारणात अग्रेसर आहे. भारतीय जनसंघ संयुक्त महाराष्ट्र समितीचा एक घटक पक्ष होता. १९५७ सालच्या सार्वत्रिक निवडणूकीत भारतीय जनसंघाने लोकसभेच्या दोन आणि विधानसभेच्या चार जागा मिळविल्या. आपल्या कार्यपद्धतीमुळे संयुक्त महाराष्ट्र समितीत जनसंघ एकाकी पडला आणि तो १९५८ साली समितीच्या बाहेर पडला.

**२. भारतीय जनता पक्षाचा पूर्व इतिहास -**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतरची पहिली निवडणूक १९६२ जनसंघाचे स्वसामर्थ्यावर लढवण्याचा निर्णय घेतला. लोकसभेच्या १७ जागा व विधानसभेच्या १२७ जागांकरिता पक्ष उमेदवार उभे केले. परंतु सर्वच उमेदवार पराभूत झाले. मात्र प्राप्त मतांची टक्केवारी दोन टक्क्यावरून पाच टक्के इतकी वाढली. याचाच अर्थ असा की, १२७ विधानसभा मतदारसंघाच्या क्षेत्रात पक्ष संघटना अस्तित्वात आली. १९६७ च्या निवडणुकीत जनसंघाने लोकसभेच्या २७ व विधानसभेच्या १६५ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. त्यात विधानसभेच्या चार जागा जिंकल्या. तर मतांची टक्केवारी आठ टक्के झाली. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाने १३ जागा लढवल्या. परंतु सर्व मतदारसंघात पक्षाचा दारूण पराभव झाला. मतांची टक्केवारी सुद्धा घसरली. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत या पक्षाने १२२ जागा लढवल्या व ५ जिंकल्या. मात्र मतांची टक्केवारी ८% वरून ६% इतकी कमी झाली. म्हणजेच १९५२ ते १९९७ या पहिल्या टप्यात पक्षाने गटाने आपले संघटनात्मक जाळे राज्यव्यापी करण्याचा प्रयत्न केला.

**३. भारतीय जनता पक्षाची स्थापना व निवडणुकीतील कामगिरी -**

१९७५ साली देशात लादण्यात आलेल्या आणीबाणीचा सर्वात जास्त फटका जनसंघाला बसला. त्या काळात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांत विचार विनिमयाचा परिणाम म्हणजे जनसंघाला राजकीय एकाकीपण संपले आणि आणीबाणीनंतर १९७७ साली स्थापन करण्यात आलेल्या जनता पक्षाचा एक घटक पक्ष म्हणून त्यास स्वीकृत करण्यात आले. १९७७-७८ च्या निवडणुकीत जनता पक्षाचा एक घटक पक्ष म्हणून जनसंघ गटाला बऱ्यापैकी जागा मिळाल्या. १९७८ साली पुरोगामी लोकशाही आघाडीच्या सरकारात काही पूर्वीश्रमीच्या जनसंघीयांना मंत्रिपदाचीही प्राप्ती झाली. १९७९ साली जनता पक्ष अखिल भारतीय पातळीवर फुटल्याने महाराष्ट्रातही तो पक्ष दुभंगला. तरीही जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघ गटाने जनता पक्षात राहण्याचा आणि पुलोआची एकजुट टिकविण्याचा निर्णय घेतला. १९८० च्या लोकसभा निवडणुकील जनता पक्षाचा घटक असलेल्या

पूर्वाश्रमीच्या जनसंघाचे दोन उमेदवार निवडून आले. १९८० च्या लोकसभा निवडणुकीनंतर जनता पक्षात पुन्हा एकदा फुट पडली. ७ एप्रिल १९८० रोजी अटलबिहारी वाजपेयीच्या अध्यक्षतेखाली 'भारतीय जनता पार्टी' या नावाने पूर्वाश्रमीच्या जनसंधाची फेरस्थापना करण्यात आली. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातील पुलोआ सरकार बरखास्त झाले. १९८० च्या विधानसभा निवडणुका भारतीय जनता पक्षाने स्वसामर्थ्यावर लढवण्याचा निर्णय घेतला. त्यात भाजपाचे १४५ पैकी १४ उमेदवार निवडून आले. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाचे सर्वच्यासर्व २० उमेदवार पराभूत झाले. मात्र प्राप्त मतांची टक्केवारी १०% च्या पुढे गेली. राजीव गांधीच्या नेतृत्वाखालील काँग्रेससमोर विरोधी पक्षंनी एकजुट केली तरच त्यांचा टिकाव लागेल. या जाणिवेतून १९८५ साली शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही आघाडीची नव्याने स्थापन करण्यात आली. भारतीय जनता पक्ष या आघाडीचा एक घटक पक्ष होता. पक्षाच्या वाट्याला ६५ जागा आल्या आणि त्यापैकी १६ जागा पक्षाने जिंकल्या. १९८६ साली शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस(स) काँग्रेसमध्ये विलीन झाल्यानंतर पुरोगामी लोकशाही आघाडीतील मतभेद तीव्र होत गेले आणि पुन्हा एकदा भारतीय जनता पक्ष एकाकी पडला. १९८४ लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या दारूण पराभवाचे विश्लेषण केल्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील पक्ष 'गांधीवादी समाजवादा'चा त्याग करून उघडउघड हिंदुत्वाची भूमिका स्वीकारण्याचा व त्याकरिता आक्रमक व्यूहरचना करण्याचा निर्णय घेतला. त्याचाच परिणाम म्हणजे महाराष्ट्रात १९८९ साली भारतीय जनता पक्ष व शिवसेनेची युती झाली. भारतीय जनता पक्ष जरी अखिल भारतीय पक्ष असला तरीही व्यावहारिक शहाणपण म्हणून त्यने युतीतील कनिष्ठ भागीदर होण्याचे मान्य केले. १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने १० जागा जिंकल्या. म्हणजेच शिवसेनेच्या सहकार्याने भाजपाला उल्लेखनीय यश आणि ग्रामीण भागात शिरकाव करण्याची संधी मिळाली. १९९० च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला ४२ व शिवसेनेस ५२ जागा मिळाल्या. म्हणजेच काँग्रेसला समर्थ पर्याय अशी या युतीची प्रतिमा निर्माण झाली. भाजप शिवसेना युती १९९१ च्या लोकसभेच्या निवडणुकीत कायम राहिली. मात्र १९८९ साली महाराष्ट्रात काँग्रेसला असलेल्या विरोधाची आणि हिंदुत्वाची तीव्रता कमी झाल्याने भाजपाचे संख्या सामर्थ्य १० वरून ५ पर्यंत घसरले. १९९२ साली शिवसेना फुटीनंतर भाजपाचे विरोधी पक्षनेते पदावरील आपला दावा मांडल्याने ही युती अनौपचारीकरीत्या संपुष्ट आली. १९९२ च्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत भाजपाने स्वसामर्थ्यावर मुंबई महानगपालिका, नगरपालिका व पंचायती राज्यसंस्थांच्या निवडणुका लढवल्या. शिवसेनेने मुंबई व ठाणे महानगरपालिका गमावल्या. याचाच परिणाम म्हणजे शिवसेना-भाजपा युती पुन्हा झाली. १९९५ च्या विधानसभा निवडणुका त्यांनी एकत्रित लढवल्या व महाराष्ट्रात सत्ता संपादन केली.

१९९९, २००४ व २००९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना भाजपा युतीचा पराभव झाला. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसनी मित्रपक्ष व अपक्षांच्या सहाय्याने सत्ता संपादन केली. २०१४ साली शिवसेना-भाजपा युती संपुष्टात आली असली, तरी भाजपाला सर्वाधिक १२२ जागा मिळाल्या आणि अपक्षांच्या पाठिंब्याने भाजपाने सत्ता संपादन केली. अशा प्रकारे १९९५ सालापासून महाराष्ट्रात संमिश्र आघाडीच्या राजकारणाची वाटचाल झाली आहे.

**प्रश्न ४ था. शिवेसना पक्षाची निवडणुकीतील कामगिरी स्पष्ट करा.**

**१. प्रास्ताविक -**

शिवसेना हा सर्वार्थाने एक प्रादेशिक पक्ष आहे. कारण तेलगु देसम, द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षांप्रमाणेच शिवसेना प्रादेशिक अस्मितेबाबत आग्रहीपक्ष आहे. शिवसेनेची स्थापना प्रादेशिक हितसंबंधांची, म्हणजेच मराठी हितसंबंध जोपासणारी एक चळवळ म्हणून झाला. कालांतराने त्याचे प्रादेशिक राजकीय पक्षात रुपांतर झाले. १९७९ पासून जरी शिवसेना महाराष्ट्र राज्यात होणाऱ्या विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुकीत उमेदवार उभा करत असली तरी सत्ता काबीज करण्याचा कसोशिने प्रयत्न मात्र १९९० सालीच करण्यात आला. प्रादेशिक चळवळीचे राजकीय पक्षात रुपांतर होत असताना, मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांची आणि हिंदुत्वाची जोपासना करणारा पक्ष असे, या पक्षाचे वर्णन त्याच्या सर्वोच्च नेत्यांद्वारेच करण्यात आले. १९६७ नंतरच्या कालखंडात भारताच्या अनेक राज्यात प्रादेशिक अस्मितेचे प्रतिनिधित्व करणारे राजकीय पक्ष प्रभावी झाले आणि त्यापैकी काही प्रादेशिक पक्षांनी आपल्या राज्यात सत्ता-संपादन केली. शिवसेना हा प्रादेशिक पक्ष, भाजपा या मित्रपक्षाच्या सहकार्याने, १९९५ साली महाराष्ट्रातील सत्तारूढ पक्ष बनला.

**२. शिवेसना व निवडणुका -**

१९८५ नंतर संघटनेने राज्याच्या ग्रामीण भागात शाखा विस्ताराचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला. प्रादेशिक राजकीय पक्ष म्हणून शिवसेनेच्या वाटचालीची सुरूवात १९८९ च्या निवडणुकीपासून अधिकृतरीत्या झाली. १९८७ च्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाला काठावरचे बहुमत मिळाले. मुंबई, ठाणे या प्रभाव क्षेत्राच्या पलिकडे पक्षाचा प्रभाव आहे हे प्रस्थापित झाले. हिंदुत्वाच्या प्रश्नावर शिवसेनेने भारतीय जनता पक्षाबरोबर निवडणूक युती करून १९८९ व ११९१ च्या लोकसभा निवडणुका लढविल्या. या निवडणुकात पक्षाचे प्रत्येक चार उमेदवार निवडून आले. १९९० च्या विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाचे ५२ उमेदवार निवडून आले. म्हणजेच शिवसेना महाराष्ट्र राज्य पातळीवरील काँग्रेसच्या खालोखाल प्रभावी आणि पर्यायी शक्ती आहे याची प्रचिती आली. १९९० ते १९९५ या कालखंडात शिवसेना-भाजपा युतीत काही वेळा तणाव निर्माण झाले असले तरी सत्ता संपादन करण्यासाठी युती टिकवणे आवश्यक आहे हे व्यावहारिक शहाणपण शिवसेनेच्या नेतृत्वात निश्चितच होते. शिवसेना प्रमुखांनी या काळात मेहनत करून आपल्या पक्षाचा सामाजिक पाया वाढवला. विशेषतः तरुण वर्गात या पक्षाच्या लोकप्रियतेत प्रचंड वाढ झाली. ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशिद उद्धवस्त झाली. त्यानंतर मुंबई शहरात जमातवादी दंगली उद्भवल्या .शिवसेनेच्या नेत्यांचा असा दावा आहे की, या काळात त्यांनी हिंदू धर्मीयांच्या जीविताचे व संपत्तीचे संरक्षण केले. १९९२ नंतरच्या कालखंडात मुंबई शहर व सभोवतालच्या परिसरात शिवसेनेच्या लोकप्रियतेत प्रचंड वाढ झाली. त्याची प्रचिती १९९५ च्या विधानसभा व १९९६ च्या लोकसभा निवडणुकात आली. शिवसेनेच्या वाढत्या सामर्थ्यांची प्रचिती आल्याने काँग्रेस आणि अन्य पक्षातील असंतुष्ट नेते व कार्यकर्ते यांनी शिवसेनेत प्रवेश केला. केवळ मुंबई नव्हे तर कोकण, विदर्भ व मराठवाड्यात शिवसेनेच्या जनाधारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. खैरनार आणि अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन शिवसेना-भाजपा युतीला उपयुक्त ठरले. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजपा युतीने सर्वाधिक जागा प्राप्त केल्या आणि अपक्षांच्या पाठिंब्याने सत्ता

संपादन केली. अश्या प्रकारे प्रादेशिक अस्मितेची चळवळ म्हणून स्थापन झालेली शिवसेना महाराष्ट्राचा राज्यकर्ता पक्ष बनली आणि महाराष्ट्रात शिवशाही अवतीर्ण झाली. २०१४ व २०१९ मध्ये शिवसेना महाराष्ट्रात सत्तेत आली. २०१९ ला मात्र शिवसेनेने भाजप बरोबरची युती तोडली व कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मदतीने सत्तेत आली. परंतु २०२२ मध्ये एकनाथ शिंदे गट बाहेर पडल्याने शिवसेनेस आपली सत्ता गमवावी लागली.

**प्रश्न ५ था. भारतीय रिपब्लिकन पक्षाची निवडणुकीतील कामगिरी स्पष्ट करा.**

**१. प्रास्ताविक -**

डॉ. आंबेडकरांच्या अनुयायाचा अनेक गटात विभागलेला भारतीय रिपब्लिकन पक्ष 'दलित' अस्मितेचे प्रतिनिधित्वाचा दावा करणारा राजकीय पक्ष आहे. असे असले तरीही महाराष्ट्रातील 'दलित' अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नवबौद्ध असे विभागलेले आहेत. त्यापैकी केवळ 'नवबौद्धाचा पक्ष' ही रिपब्लिकन पक्षाबाबत राजकीय वास्तविकता आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी २२ टक्केपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या दलितांपैकी केवळ ६.५% नवबौद्धांचा या राजकीय पक्षाला पाठिंबा आहे. पक्षांतर्गत हेवेदावे व गटबाजीमुळे नवबौद्धांची 'एकगठ्ठा' मतेदेखील रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांना प्राप्त होत नाहीत. विशेष म्हणजे विदर्भातील काही जिल्हे व मुंबई शहरातील विशिष्ट भाग वगळता ही नवबौद्धाची मते राज्यभर विखुरलेली असल्याने, अनुसूचित जातींकरिता राखीव असलेल्या बहुसंख्य मतदारसंघातही रिपब्लिकन पक्ष निकामी ठरला आहे. राजकीय वैफल्यातून भारतातील पददलितांचा प्रतिनिधित्व करणारा पक्ष समजणाऱ्या, रिपब्लिकन पक्षाचे अस्तित्व महाराष्ट्रापुरते व महाराष्ट्रातील काही मतदारसंघापुरते मर्यादित आहे. निवडणूक आयोगाने रिपब्लिकन पक्षाला एक 'राज्यपक्ष' अशी मान्यता दिली असल्याने तो प्रादेशिक पक्ष आहे. त्याचा प्रभाव विशिष्ट जमातीपुरता सीमित असल्याने त्यास जमात किंवा संप्रदायवादी पक्ष असे म्हणता येईल.

**२. भारतीय रिपब्लिकन पक्षाचा उदय आणि विकास -**

आज क्षीण अवस्थेत आढळणाऱ्या भारतीय रिपब्लिकन पक्षास ५० वर्षांहून अधिक वर्षांचा इतिहास आहे. डॉ. आंबेडकरांनी १९२४ साली बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना करून महाराष्ट्रातील 'अस्पृश्य जातीच्या' लोकांना संघटित करण्याचा, संघर्ष करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी गोलमेज परिषदेत अस्पृश्यांकरिता स्वतंत्र मतदारसंघ असावेत या मागणीचा पाठपुरावा केला. १९३२ च्या जातीय निवाड्यात ब्रिटिश सरकारने अस्पृश्य जातीच्या मतदारांकरिता स्वतंत्र मतदारसंघ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यास महात्मा गांधी व राष्ट्रीय महासभेने विरोध केला. त्यातूनच डॉ. आंबेडकर व गांधी यांच्यात विचारविनिमय होऊन स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव मतदारसंघाबाबत एकमत झाले. १९३५ च्या प्रशासन कायद्यानुसार प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकात सहभागी होण्याकरिता आंबेडकरांनी १९३६ साली 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली. मुंबई, मध्य प्रांतात मजूर पक्षाने १९३७ साली निवडणुका लढवल्या. मुंबई प्रातांत या पक्षास १३ जागा मिळाल्या. १९४२ साली आंबेडकरांच्या अनुयायांनी केवळ अनुसूचित जातीच्या लोकांकरिता वेगळा राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मजूर पक्ष विसर्जित करण्यात आला व त्याऐवजी 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन पक्षा'ची स्थापना करण्यात आली. या पक्षाने १९४६ च्या प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुका लढविल्या. मात्र त्यात दारुण पराभव झाला. दरम्यानच्या काळात डॉ. आंबेडकर घटना

परिषदेवर निवडून आले. भारताच्या राज्यघटनेत अनुसूचित जाती व जमातीकरिता त्यांच्या संख्याबलाच्या प्रमाणात राखीव जागांची तरतूद करण्यात आली. डॉ. आंबेडकर हे नेहरू मंत्रिमंडळात सामील झाले. परंतु 'हिंदू कोड बिल'बाबत मतभेद झाल्याने त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

**३. निवडणुकीतील कामगिरी व पक्षातील फाटाफूट -**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात डॉ. आंबेडकर शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने शेतकरी कामगार पक्षाबरोबर पश्चिम महाराष्ट्र व हैद्राबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेश आणि समाजवादी पक्षाबरोबर मुंबई शहरापुरता निवडणूक समझोता केला. सोलापूर संयुक्त मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाच्या तुळशीदास जाधव यांच्याबरोबर शेड्यूल कास्ट फेडरेशनचे सरचिटणीस राजभोस लोकसभेवर निवडून आले. मात्र पक्षाचे डॉ. आंबेडकरांसह उर्वरित नेते पराभूत झाले. विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाच्या ७४ उमेदवारांपैकी तीन उमेदवार निवडून आले. पक्षाला ७% च्या जवळपास मते मिळाली असली तरी लोकसभेच्या १ व विधानसभेच्या ३ जागा मिळाल्या. म्हणजेच निवडणुकीच्या राजकारणाचा पहिला फटका १९५२ साली पक्षाला मिळाला. त्यातून हा पक्ष स्वत:ला सावरू शकला नाही. खासदार राजभोज यांनी १९५५ साली पक्षाचा राजीनामा देऊन काँग्रेस पक्षात प्रवेश करून पक्षाला दुसरा धक्का दिला. या काळात राजकारण करण्याऐवजी समाजकारण करावे असे मत पक्षाच्या काही ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केले. परंतु बहुसंख्य नेते राजकारणाला अनुकूल असल्याने तो विचार प्रभावी ठरला नाही. त्यातूनच शेड्यूल्ड कास्टस फेडरेशन हा अनुसूचित जातीपुरता मर्यादित असलेला पक्ष अधिक प्रभावी व्हावा याकरिता सर्वजाती जमातीतील दुर्बल घटकांना सामावून घेणारा व्यापक स्वरूपाचा पक्ष स्थापन करण्याचा प्रस्ताव डॉ. आंबेडकरांनी मांडला. परंतु नवीन पक्षाची स्थापना होण्यापूर्वीच ६ डिसेंबर १९५६ रोजी आंबेडकरांचे देहावसन झाले. तत्पूर्वी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आंबेडकरांनी आपल्या अनुयायांसह हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारला.

डॉ. आंबेडकरांच्या निधनापश्चात त्यांच्या अनुयायांनी ३ ऑक्टोबर १९५७ रोजी 'बाबांचे स्वप्न पूर्ण केले'. ऑल इंडिया रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. तत्पूर्वी १९५७ च्या निवडणुकीत ज्या संयुक्त महाराष्ट्रास डॉ. आंबेडकरांचा विरोध होता त्याच संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र समितीत शेड्यूल्ड कास्टम् फेडरेशन सहभागी झाला. कारण प्रचलित लोकमताच्या विरोधात जाण्याचे धैर्य व कुवत आंबेडकरांच्या कोणत्याच अनुयायात नव्हती. यालाच अभ्यासक 'सोईचे राजकारण' असे म्हणतात. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पक्षाची लोकप्रियता कमी होत गेली. पक्षाच्या या अवस्थेला पक्षाचे नेतृत्व कारणीभूत ठरले. पक्षाच्या नेत्यांच्या महत्त्वाकांक्षी व्यक्तिगत हेवेदावे, शहकाटशहाचे राजकारण इत्यादींमुळे सर्वसामान्य मतदारांसमोर या पक्षाची प्रतिमा डागाळली. पक्षाच्या विघटनाची सुरुवात १९५९ ला बी. सी. कांबळे यांच्यापासून झाली. त्यांच्या पाठोपाठ दादासाहेब रूपवते यांच्या गटांनी आपला सवतासुभा मांडला. १९६० दादासाहेब गायकवाड यांनी डाव्या विचारसरणीच्या पक्षांशी सहकार्य करावे असा विचार मांडला. त्यास कवाडे गटाने विरोध केला. याचाच परिणाम म्हणजे १९६२ च्या निवडणुकीत पक्षाचे केवळ तीन उमेदवार विधानसभेवर निवडून आले. १९६२ नंतर सत्तारुढ कांग्रेस पक्षाशी सहकार्य करावे असा नवा विचार पक्षात उदयास आला. गायकवाड खोब्रागडयाना सहकार्याची गरज पटली होती. परंतु काँग्रेसमध्ये आपला पक्ष विलिन करण्यास त्यांचा विरोध होता. विलिनीकरणवादी भंडारे यांनी १९६२ साली पक्षाचा त्याग केला व आपला गट काँग्रेसमध्ये विलीन केला. त्याच्या पाठोपाठ रूपवते गटही काँग्रेसमध्ये विलीन झाला.

१९६७ च्या निवडणुकीच्या वेळी यशवंतराव चव्हाणांनी या पक्षाशी अखिल भारतीय स्वरूपाचा समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. मात्र महाराष्ट्रापुरता हा समझोता होऊ शकला आणि पक्षाला विधानसभेच्या ५ जागांची प्राप्ती झाली. जिल्हा परिषदांच्या निवडणुकीतही ही आघाडी कायम राहिली. त्याचा मर्यादित फायदा या पक्षाला मिळाला. पक्षाचे सरचिटणीस राजाभाऊ खोब्रागडे यांची काँग्रेसच्या सहकार्याने राज्यसभेवर निवड झाली. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत दादासाहेब गायकवाड यांच्याकरिता काँग्रेसने लोकसभेची एक जागा सोडली. दरम्यान गायकवाड आणि खोब्रागडे गटात वैमनस्य निर्माण होऊन पुन्हा एकदा पक्ष दुभंगला. गायकवाड यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या गटाचे नेतृत्व रा. सु. गवई यांच्याकडे गेले. काँग्रेसच्या सहकार्याने गवई विधानपरिषदेवर निवडून आले. १९७७ च्या निवडणुकीत गायकवाड गट काँग्रेस(ई)बरोबर तर कांबळे व खोब्रागडे गट जनता पक्षाबरोबर होते. जनता पक्षाद्वारा पुरस्कृत बी. सी. कांबळे लोकसभेवर व राजाभाऊ खोब्रागडे राज्यसभेवर निवडून आले. खोब्रागडे यांची राज्यसभेच्या उपाध्यक्षपदी निवड झाली. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत कांबळे गटाचे जनता पक्ष पुरस्कृत दोन उमेदवार निवडून आले. तर १९८० साली केवळ एकच उमेदवार निवडून आला. १९८० ते १९९५ या कालखंडात पक्षाचा एकही उमेदवार लोकसभा किंवा विधानसभेवर निवडून आला नाही. याचे एक प्रमुख कारण म्हणजे पक्षांतर्गत असलेली आत्यंतिक स्वरुपाची गटबाजी व नेत्यांचे आत्मकेंद्रित राजकारण होय.

पुढे आंबेडकरवादी जनतेच्या पाठिंब्यामुळे रिपब्लिकन पक्षात ऐक्य साधले गेले. रमाबाई आंबेडकरनगर मधील दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर पक्षाने १९९८ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी समझोता केला. पक्षाचे सर्व उमेदवार काँग्रेस व समाजवादी पक्षाच्या पाठिंब्याने लोकसभेवर निवडून आले. मात्र त्यानंतर या पक्षाचा प्रभाव कमी होत गेला. मात्र प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील गट-पक्ष विदर्भात आपले अस्तित्व टिकवून आहे.

**४. पक्षाची विचारसरणी -**

रिपब्लिकन पक्षाचे नेते स्वत:ला 'आबेडकरवादी' म्हणवतात. दलितांच्या हितसंबंधांची जोपासना करणे. त्यांच्याकरिता सवलती प्राप्त करून घेणे, त्यांच्यावरील अन्यायाबाबत आंदोलने करणे अशा प्रकारचे कार्यक्रम रिपब्लिकन पक्षाचे विविध गट आयोजित करतात. अलीकडच्या काळात 'नामांतरचा प्रश्न' त्यांच्या दृष्टीने सर्वात जिव्हाळ्याचा आहे. त्याकरिता गेली काही वर्षे पक्ष सातत्याने आंदोलने उभारत आहे. डॉ. आबेडकरांच्या लिखाणावर आधारित ग्रंथात हिंदू देवतांवर करण्यात आलेल्या टीकांमुळे, त्याग्रंथांवर बंदी आणावी अशी हिंदुत्ववादी संघटनांनी मागणी केल्यानंतर आंबेडकरवाद्यांनी त्याबाबत प्रतिआंदोलन केले. या पक्षाच्या काही नेत्यांवर कार्ल मार्क्सच्या विचारसणीचा मर्यादित प्रभाव दिसतो.

**प्रश्न ५ था. शेतकरी कामगार पक्षाची निवडणुकीतील कामगिरी स्पष्ट करा.**
**शेतकरी कामगार पक्षाची विचारसरणी व कार्यक्रम स्पष्ट करा.**
**शेतकरी कामगार पक्षाची वाटचाल स्पष्ट करा.**

**१. प्रास्ताविक -**

काँग्रेसप्रमाणेच शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व बहुजन समाजातून आलेले असल्याने महाराष्ट्रातील ग्रामीण भागात या पक्षाला मर्यादित पाठिंबा होता. मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या

स्थापनेनंतर पक्षाचे अनेक प्रमुख नेते व कार्यकर्ते काँग्रेस पक्षात गेल्याने हा पक्ष कमकुवत होत गेला व आज त्याचे नाममात्र अस्तित्व शिल्लक राहिले आहे.

**२. शेतकरी कामगार पक्षाची स्थापना -**

शेतकरी कामगार पक्षाचा उगम महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीत सापडतो. या चळवळीचे नेतृत्व कोल्हापूरचे संस्थानिक शाहू महाराज यांनी केले. अल्पावधीत ब्राह्मणेतर पक्ष उच्च मराठे व सरंजामदार वर्गाचा प्रवक्ता बनला. महात्मा गांधींच्या उदयानंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये ब्राह्मणी नेतृत्वाची पिछेहाट झाली. सर्वसामान्य जनतेच्या आशाआकांक्षाचे प्रतिनिधित्व गांधींची राष्ट्रीय चळवळ करत असल्याने १९३० नंतर बहुजन समाजातील तरुण वर्ग राष्ट्रीय मुख्य प्रवाहात विलिन झाला. महाराष्ट्र काँग्रेसमध्ये बहुजन समाजातील नेते व कार्यकर्ते यांचा प्रभाव वाढत गेला असला तरीही १९३७ ला मुंबई प्रातांच्या मुख्यमंत्रीपदी बाळासाहेब खेर यांची निवड झाल्याने बहुजन समाजात असंतोष निर्माण झाला. १९४६ च्या निवडणुकीतही मुंबई प्रांतात बहुजन समाजाचे आमदार मोठ्या संख्येने निवडून आले असताना पुन्हा एकदा खेर यांची मुंबई प्रांताच्या मुख्यमंत्री झाले. तेव्हा मंत्रिमंडळाची स्थापना करताना महाराष्ट्र प्रांतिक प्रदेशाचे अध्यक्ष केशवराव जेधे यांच्याशी साधा विचारविनिमयही करण्यात आला नाही. बहुजन समाजाला पुरेसे प्रतिनिधित्वही दिले नाही. त्यातून काँग्रेस पक्षांतर्गत 'शेतकरी कामगार संघा'ची स्थापना झाली. १९४८ साली पक्षश्रेष्ठींनी ही संघटना बरखास्त करावी असा आदेश दिल्याने जेधेच्या नेतृत्वाखाली बहुजन समाजातील बहुसंख्य नेते काँग्रेस पक्षाबाहेर पडले व जून १९४८ मध्ये 'शेकाप'ची स्थापना केली. केवळ केशवराव जेधेच पक्षाबाहेर पडले नाहीत तर ते प्रांताध्यक्ष असल्याने शेकापला काँग्रेस पक्षाची ग्रामीण भागातील संघटना आपोआप प्राप्त झाली. बहुजन समाजातील ज्येष्ठ नेते शेकापमध्ये समाविष्ट झाल्याने महाराष्ट्रात काँग्रेस पक्षासमोर मोठे आव्हान निर्माण झाले.

**३. विचारसरणी व कार्यक्रम -**

शेकाप स्वतःला अखिल भारतीय व डाव्या विचारसरणीचा पक्ष म्हणवितो. म्हणूनच पक्षाचे अधिकृत नाव अखिल भारतीय शेतकरी कामगार पक्ष आहे. तरीही प्रत्यक्षात तो एक प्रादेशिक पक्ष आहे. त्याच्या कार्य व प्रभावाची व्याप्ती महाराष्ट्रापुरती सीमित आहे. या पक्षाच्या निवडणूक कार्यक्रमात संयुक्त महाराष्ट्राची स्थापना किंवा बेळगाव, कारवार इत्यादी वादग्रस्त मराठी भाषिक प्रदेशांचा महाराष्ट्रात समावेश या प्रादेशिक प्रश्नांनाच प्राधान्य देण्यात आले आहे. या पक्षाने केवळ मराठी भाषिक प्रदेशातच निवडणुका लढविल्या आहेत. या मराठी भाषिक भागाचे द्विभाषिक मुंबई राज्यात विलिनीकरण झाल्यानंतर, केवळ मुंबई प्रांत व नंतर महाराष्ट्र राज्यात या पक्षाने निवडणूका लढविल्या. निवडणूक आयोगाने या पक्षाला एक राज्य अधिकृत पक्ष अशी मान्यता दिली आहे.

शेतकरी कामगार पक्ष आपला पक्षाच्या विचारसरणीचा मार्क्स व लेनीनच्या साम्यवादावर श्रद्धा असणारा व समाजातील 'नाहीरे' वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा आणि त्याकरिता संघर्ष करणारा पक्ष आहे, असा दावा केला. दाभाडी येथे १९५० साली भरलेल्या पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनात पक्षाची विचारसरणी विशद करणारा 'दाभाडी प्रबंध' स्वीकृत करण्यात आला. या प्रबंधात भारतीय साम्यवादी पक्ष, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे तपशील विवेचन, त्याबबात पक्षाची टीकाटिप्पणी व पक्षाच्या कार्यक्रमाची विस्ताराने चर्चा करण्यात आली. चीनमधील साम्यवादी क्रांतीत माओ-त्से-तुंगच्या नेतृत्वाखाली शेतकरी वर्गाने महत्वाची भूमिका बजावली. त्याचप्रमाणे

भारतासारख्या विकसनशील व कृषीप्रधान देशात शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाखाली भारतात क्रांती घडवून आणता येईल. असा आशावाद व्यक्त करण्यात आला. आपलाच पक्ष वास्तविक साम्यवादी पक्ष आहे असा दावा करताना अति उत्साहाच्या भरात, सोव्हिएत रशियातील साम्यवादी पक्षाची 'साम्राज्यवादी' पक्ष अशी संभावना दाभाडी प्रबंधात करण्यात आली आहे. म्हणजेच अप्रत्यक्षरित्या अमेरिकेच्या, आंतरराष्ट्रीय राजकारणातील, शीतयुद्धाच्या कालखंडातील भूमिकेला आपण पाठिंबा देत आहोत याचे भानही शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांना राहिले नाही.

शेतकरी कामगार पक्षाची वैचारिक भूमिका, निदान वरकरणी डावीकडे झुकलेली आहे. दाभाडी प्रबंधात 'मार्क्सच्या राजकीय तत्वज्ञानावर निष्ठा असणारा पक्ष' असे वर्णन या पक्षाचे करण्यात आले आहे. दाभाडी प्रबंधातील मुख्य वैचारिक मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१)महाराष्ट्रात भांडवलदार वर्गाविरुद्ध लढा करण्याकरिता सर्व प्रागतिक विचारांच्या संघटनांनी एकत्र येणे आवश्यक आहे. २)ग्रामीण भागातील कष्टकरी वर्गाचे शहरी भागातील भांडवलदार वर्गाकडून शोषण केले जाते म्हणून सर्व कष्टकरी वर्गाने म्हणजेच शेतकरी, कामगार, शेतमजूर यांनी संघटित लढा देणे आवश्यक आहे. ३)साम्यवादी विचारसरणीवर आधारलेल्या या पक्षाने सोव्हिएत रशियाचे नेतृत्व मान्य केले असले तरीही, साम्यवादी क्रांतीत वर्ग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो अशी या संघटनेची धारणा आहे. ४)भारतातील डाव्या विचारसरणीच्या अन्य राजकीय पक्षांवरही कठोर टीका करण्यात आली आहे. समाजवादी पक्षाची 'पांढरपेशा मध्यमवर्गीयांचा मध्यममार्गी पक्ष' अशी संभावना करण्यात आली आहे. समाजवादी पक्षाचा वर्गसंघर्षावर विश्वास नसल्याने, असा पक्ष डाव्या विचारसणीचा असूच शकत नाही असे प्रतिपादन करण्यात आले. शोषित वर्गाच्या समस्यांबाबत या पक्षाला खरीखुरी आस्था नाही अशीही टीका करण्यात आली. ५)सामाजिक व आर्थिक समतेवर आधारित असा वर्गविहीन समाज स्थापन शेतकरी कामगार पक्षाचे अंतिम उद्दिष्ट आहे. ६) भारतात शेतकरी व कामगार वर्गाचे राज्य आणि शोषणविहित समाज स्थापन करण्याची इतिहासदत्त जबाबदारी आपल्या पक्षाची आहे. शेतकरी व कामगार वर्गात एकजूट झाली नाही तर वर्गसंघर्षाचे उद्दिष्ट साध्य करता येणार नाही म्हणूनच त्यांच्यात अस्तित्वात असलेली आर्थिक तफावत दुर्लक्षून त्यांची एकजुट साधावी अशी शेकापची धारणा आहे.

थोडक्यात शेकाप मर्यादित अर्थाने ग्रामीण बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारा, प्रादेशिक आणि डाव्या विचारसरणीचा राजकीय पक्ष आहे. या पक्षाची कार्यव्याप्ती महाराष्ट्रापुरती मर्यादित असल्याने तो प्रादेशिक पक्ष आहे. सर्वसामान्यपणे या पक्षाचे भूविकास, ग्रामीण विकास, संयुक्त महाराष्ट्राची स्थापना, बेळगाव-कारवार प्रश्न अशा स्थानिक व प्रादेशिक प्रश्नांना प्राधान्य दिले.

**४. शेतकरी कामगार पक्षाची वाटचाल / शेतकरी कामगार पक्षाची निवडणुकीतील कामगिरी -**

काँग्रेसला समर्थ पर्याय ठरण्याची क्षमता असलेला, बहुजन समाजाचे नेतृत्व, कार्यकर्ते व संघटना ज्याच्यापाशी आहे, मराठी भाषिक ग्रामीण भागात ज्यास स्थान आहे अशा अपेक्षा निर्माण करणारा शेतकरी कामगार पक्ष महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर १९४८ साली उगवला. केशवराव जेध्यांसह बहुजन समाजातील बहुसंख्य नेते शेतकरी कामगार पक्षात गेल्याने काँग्रेसला मोठे आव्हान निर्माण झाले होते. शेतकरी कामगार पक्षाच्या ग्रामीण भागातील प्रभावाची जाणीव असल्याने हा पक्ष आपल्या

पक्षात विलीन व्हावा याकरिता साम्यवादी व समाजवादी पक्षाच्या नेत्यांनी प्रयत्नही केले. परंतु साम्यवादी पक्ष आपणास गिळंकृत करेल या शंकेमुळे व समाजवादी पक्षाचे नेतृत्व ब्राह्मणी असल्याने शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांनी त्यांना प्रतिसाद दिला नाही. पक्षाने १९५० साली 'दाभाडी प्रबंध' स्वीकारल्यानंतर साम्यवादी शक्तींची एकजुट व्हावी या विचाराचा एक गट पक्षात निर्माण झाला. साम्यवादी पक्षात शेकाप विलीन करता येत नसेल तर त्याच्याशी व्यापक सहकार्य करावे अशी भूमिका असणारे नाना पाटील, दत्ता देशमुख, काकासाहेब वाघ इत्यादी आपल्या समर्थकांसह पक्षाच्या बाहेर पडले आणि त्यांनी १९५१ साली कामगार किसान पक्षाची(लाल निशाण पक्ष) स्थापना केली. कालांतराने नाना पाटील व काकासाहेब वाघ साम्यवादी पक्षात सामील झाले. या पक्षफुटीचा परिणाम म्हणजे १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत शेकापचा पराभव झाला. पक्षाचे जवळपास सर्व जेष्ठ नेते निवडणुकीत पराभूत झाले. या धक्क्यातून पक्ष स्वत:ला कधीच सावरू शकला नाही. पुढे पक्षात गटबाजी वाढून मजदूर किसान पक्ष या डाव्या विचाराच्या आणखी एका पक्षाची स्थापना झाली.

१९५५ नंतर शेकापचे अनेक नेते काँग्रेसमध्ये गेले. म्हणजे १९५४ साली भाऊसाहेब राऊत आणि उद्धवराव पाटील यांचा अपवाद वगळता, पक्षाचे सर्व संस्थापक पक्षाबाहेर पडले. अशा परिस्थितीतही पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व जोपासण्याचा आणि त्याची नव्याने बांधणी करण्याचा निर्धार पक्षाच्या लातूर येथे भरलेल्या अधिवेशनात व्यक्त करण्यात आला.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्थापनेपासून शेकाप संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात अग्रभागी होता. त्याचा फायदा पक्षाला मिळाला आणि लोकसभेच्या पाच व विधानसभेच्या ३१ जागा पक्षाला मिळाल्या. पक्षाच्या सामर्थ्यात झालेली ही वाढ अल्पकालीन होती. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पक्षाचे बहुसंख्य आमदार, खासदार, इतर नेते व कार्यकर्ते काँग्रेसमध्ये गेले. परिणामी १९६२ च्या निवडणुकीत पक्षाचे विधानसभेतील संख्याबल १५ पर्यंत घसरले. लोकसभेत पक्षाचे सर्व उमेदवार पराभूत झाले. कोल्हापूरच्या दत्तक विधानाचा व महागाईवाढीचा थोडा फायदा १९६७ साली पक्षाला मिळाला. त्याचे विधानसभेवर १९ व लोकसभेवर २ उमेदवार निवडून आले. १९७१-७२ च्या लोकसभा विधानसभा निवडणुकीत पक्षाचा धुव्वा उडाला. पुन्हा एकदा शेकाप काँग्रेसमध्ये विलीन करावा अशी मागणी एका गटाने केली. १९७७ साली जनता पक्षाशी शेकापने युती केली व काँग्रेस विरोधाच्या लाटेमुळे या पक्षाचे लोकसभेवर ५ व विधानसभेवर १३ उमेदवार निवडून आले.

१९८० च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नाही. त्यांचे विधानसभेतील संख्याबल ९ पर्यंत घसरले. १९८४ च्या लोकसभेत काँग्रेस पक्षातील गटबाजीचा फायदा पक्षाला मिळाला व रायगड मतदारसंघातून दि. बा. पाटील लोकसभेवर निवडून गेले. १९८५ साली पुरोगामी लोकशाही आघाडीचा एक घटक पक्ष म्हणून या पक्षाचे १३ उमेदवार विधानसभेवर निवडून आले. १९८९ व १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला एकही जागा मिळाली नाही. तर १९९० च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाचे केवळ ८ उमेदवार निवडून आले.

**५. सारांश -**

१९७८ पासून पक्षाच्या ताब्यात असलेली रायगड, सोलापूर, परभणी, उस्मानाबाद आणि नांदेड जिल्ह्यातील काही मतदारसंघ वगळता हा पक्ष आज इतिहासजमा झाला आहे. म्हणजेच काँग्रेसला पर्यायी पक्ष ठरण्याची उमेद बाळगणारा शेकाप आज जवळजवळ संपला आहे. त्याचे प्रमुख

कारण म्हणजे बहुजन समाजातील नेतृत्वाला काँग्रेस पक्षात अधिकारपदांची प्राप्ती होते. या पक्षाला सरकारमध्ये सामील होण्याची पहिली संधी १९७८ साली पुरोगामी लोकशाही आघाडीचा एक घटक पक्ष म्हणून प्राप्त झाली होती. १९९९ साली पुन्हा एकदा पुरोगामी लोकशाही आघाडीचा घटक पक्ष म्हणून शेकाप सत्तेतील वाटेकरी होता. पक्षाचा प्रभाव केवळ काही जिल्ह्यापुरता सिमित आहे.

**टीप. आघाडीचे राजकारण -**

बहुपक्षपद्धती असलेल्या भारतात महाराष्ट्रात सत्ता संपादन करण्याच्या उद्देशाने समविचारी पक्ष निवडणूक पूर्व किंवा निवडणूकीनंतर आघाडी प्रस्थापित करतात. १९५२ साली काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या आणि ग्रामीण भागात जनाधार असलेल्या शेतकरी कामगार पक्षाचे शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनची निवडणूकपूर्व समतोल करून काँग्रेस पक्षासमोर मोठे आव्हान आव्हान उभे केले होते. मात्र निवडणूकीच्या डावपेचात ते कमी पडल्याने, त्यांचा दारुण पराभव झाला होता. १९५६ साली बिगर-काँग्रेस पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करून एकात्मिक महाराष्ट्राच्या प्रश्नावर काँग्रेससमोर जबरदस्त आव्हान उभे केले होते. अटीतटीच्या निवडणूकीनंतर काँग्रेसला काठावरचे बहुमत मिळाले.

१९६२ साली महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर १९७८ पर्यंत महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचे निर्विवाद वर्चस्व होते. मात्र १९७८ साली काँग्रेस पक्ष दुभंगल्यानंतर जनता पक्षाने बिगर काँग्रेसी पक्षांच्या आघाडीने पुन्हा एकदा काँग्रेससमोर जबरदस्त आव्हान उभे केले. जनता पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्यानंतर त्यास सत्ता संपादन करणे शक्य होते. या परिस्थितीत अर्स काँग्रेस व इंदिरावादी काँग्रेस या पक्षांनी निवडणूकीनंतर आघाडी केली. अपक्षांच्या सहकार्यानेत्यांनी सत्ता मिळविली. मात्र अल्पावधीतच शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमधील एक गट बाहेर पडला. त्यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली दुय्यम समझोता करून आघाडीचे सरकार सत्तेवर आनले. पुरोगामी लोकशाही आघाडीचा हा प्रयोग अयशस्वी ठरला. कालांतराने पवारांच्या नेतृत्वाखालील समाजवादी काँग्रेस पक्ष स्वगृही परतला. दरम्यानच्या काळात काँग्रेस पक्षाच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली.

हिंदूत्ववादी विचारांच्या शिवसेना व भारतीय जनता पक्षाने निवडणूकपूर्व आघाडी करून १९९० साली काँग्रेसच्या प्रभुत्वाला जबरदस्त धक्का दिला. १९९५ साली पुन्हा एकदा शिवसेना भाजपा युती होऊन, काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. अपक्षांच्या पाठिंब्याने शिवसेना-भाजपाचे सरकार सत्तेवर आले. वास्तव अर्थाने महाराष्ट्रातील हे पहिले बिगर-काँग्रेसी सरकार सत्तेवर आले आणि आघाडीच्या राजकारणाची महाराष्ट्रात सुरुवात झाली. या आघाडी सरकारवर शिवसेनेचे वर्चस्व होते. आणि भाजपाने दुय्यम भूमिका स्विकारली होती. शिवसेना-भाजपा युतीच्या सरकारमध्ये वैचारिक व व्यक्तिगत मतभेद असले तरी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नियंत्रणाखाली हे सरकार पूर्ण काळ सत्तेवर राहिले. १९९८ साली काँग्रेसपक्ष पुन्हा एकदा दुभंगला आणि राष्ट्रवादी काँग्रेसने आपली वेगळी चूल मांडली. सन १९९९ मध्ये शिवसेना भाजपास मुस्लीम मते संपादन करण्यात अपयश आले.

२००४ व २००९ च्या निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी आघाडीने शिवसेना-भाजपा युतीचा पराभव करून आघाडी सरकार स्थापन केले. दोन्ही पक्षात गंभीर स्वरुपाचे मतभेद असताना केवळ सत्तेत राहण्याच्या हव्यासापोटी ते एकत्र राहिले. २०१४ च्या विधानसभा निवडणूकीच्या आधी

राष्ट्रवादी काँग्रेस सरकारमधून बाहेर पडले. त्यांनी स्वतंत्र्यपणे निवडणूका लढवल्या. तर १९८९ सालापासून असलेली शिवसेना-भाजपा युतीदेखील संपुष्टात आली. २०१४ च्या चौरंगी निवडणूकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. सर्वाधिक १२२ जागा संपादन केलेल्या भाजपाने अल्पमतातील सरकार स्थापन केले. अल्पकाळ शिवसेनेने विरोधी पक्षाची भूमिका पार पाडली. राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपाला विनाशर्त पाठिंबा घोषित केला. मात्र अल्पावधीत शिवसेनेने घुमजाव करत भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारात शिवसेनेचे स्थान दुय्यम आहे, शिवसेनेचे मंत्री व आमदार असमाधानी आहेत, आघाडीतील या दोन घटक पक्षातील परस्पर अविश्वास आहे, सरकारमध्ये राहून शिवसेना विरोधी पक्षाची भूमिका पार पाडते , अशी स्थिती झाली.

अशा प्रकारे १९९५ सालापासून महाराष्ट्रात आघाडीचे राजकारण कार्यरत आहे. त्याची कामगिरी स्पृहणीय नाही. आघाडी सरकारातील मतभेदांचा परिणाम राज्यकाराभारावरही होतो. दीर्घकाळ आघाडीवर असणाऱ्या महाराष्ट्राची अनेक क्षेत्रात पिछेहाट होत आहे. राज्यकारभार अकार्यक्षम झाला असून, त्यावर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. मात्र एक उल्लेखनीय बाब म्हणजे १९९५, १९९९, २००४, २००९ आणि २०१४ च्या आघाडी सरकारांनी आपला कार्यभाग पूर्ण केल्याने महाराष्ट्रात मुदतपूर्व निवडणूका घेण्याची वेळ आलेली नाही.

## प्रकरण ७. समकालीन समस्या आणि चळवळी.

### प्रश्न १ ला. महाराष्ट्रातील आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये व समस्या विषद करा.

**अ. प्रास्ताविक / महाराष्ट्रातील आदिवासी संप्रदाय -**

आदिम जमाती, गिरिजन, वनवासी अशा विविध नावांनी आदिवासी समुदाय ओळखला जातो. भारतीय राज्यघटनेने त्यांचा उल्लेख 'अनुसूचित जमाती' असा केला आहे. डॉ. डी. एन. मजुमदार यांच्या मते, "आदिवासी म्हणजे, समान नाव धारण करणाऱ्या एका विशिष्ट भूप्रदेशावर निवास करणाऱ्या एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या व ठरावीक मूल्यांची, विचारांची जोपासना करणाऱ्या कुटुंबांचा समूह होय. गिलीन आणि गिलीन यांच्या मते, आदिवासी समुदाय म्हणजे, एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा असणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा व अक्षरज्ञानाची ओळख नसणाऱ्या लोकांचा समूह होय.

**ब. महाराष्ट्रातील आदिवासी समुदाय -**

महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या ७.५% लोकसंख्या आदिवासी आहे. त्यांचे प्रादेशिक विवरण पुढीलप्रमाणे आहे.

| | विभाग | आदिवासी जमाती |
|---|---|---|
| १ | सह्याद्री विभाग -<br>ठाणे, पालघर, पुणे, रायगड, अहमदनगर जिल्हे | महादेव कोळी, वारली, कातकरी, कोकण, ठाकर, ढोर कोळी, मल्हार कोळी, काथोडी, भिल्ल, गावीत, धानका, पावरा, हुबळा, पारधी, कोळम |
| २ | सातपुडा विभाग -<br>धुळे, नंदुरबार, जळगाव, अमरावती, औरंगाबाद जिल्हे | तडवी, माबची, कोरकू |

| | | |
|---|---|---|
| ३ | गोंदवन विभाग -<br>गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, नांदेड जिल्हे | गोंड, भाडिया गोंद, कोला, परधान, आंध, कोत्र, हलबा, करव |

**क. आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये -**

**१) विशिष्ट क्षेत्रात / भूप्रदेशात वास्तव्य** : विशिष्ट भूप्रदेशात राहणारा आसिवासी हा प्रादेशिक समुदाय आहे. त्यांचे वास्तव्य दुर्गम भागात, जंगलदऱ्यांमध्ये आणि डोंगरमाथ्यावर असते, ते स्थलांतर करीत असले तरीहि ते विशिष्ट क्षेत्रातच स्थलांतर करतात.

**२) विशिष्ट नाव** : प्रत्येक आदिवासी जमात विशिष्ट नावाने ओळखली जाते. भारतात चारशेहून अधिक आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रात भिल्ल, कोळी, वारली, कातकरी इत्यादी प्रमुख आदिवासी जमाती आहेत. ज्या विशिष्ट क्षेत्रात त्यांचे वास्तव्य असते, त्याआधारे त्यांचे नामकरण होत असते. महाराष्ट्रातील कोळी जमातीचे महादेव कोळी, सोन कोळी, मल्हार कोळी असे नामकरण करण्यात आल्याचे दिसून येते.

**३) समान गोत्र** : प्रत्येक आदिवासी समुदाय रक्तसंबंधांवर आधारित असल्याने, त्यांचे गोत्र व पूर्वज समान असतात. ते रक्तसंबंधांनी एकमेकांशी संलग्न असल्याने, त्यांना आपल्या जमातीतील अन्य व्यक्तींविषयी आत्मीयता वाटते. त्यातून त्यांचा एकसंध व एकात्म समुदाय निर्माण होतो.

**४) लहान आकारमान** : ग्रामीण किंवा नागरी समुदायांच्या तुलनेत आदिवासी समुदायाचे आकारमान लहान असते. त्यांची लोकसंख्या अनेक आदिवासी पाड्यांत विखुरलेली असते.

**५) समान भाषा** : आदिवासी समुदाय प्रचलित अर्थाने निरक्षर आहे. कारण त्यांना लेखन कला अवगत नाही. मात्र प्रत्येक आदिवासी जमात विचारांची अभिव्यक्ती करण्यासाठी बोली भाषेचा वापर करते. आदिवासींचे वाक्प्रचार, म्हणी, गाणी इत्यादी विपुल प्रमाणात आढळतात.

**६) समान धर्म** : निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या आदिवासींना निसर्गाविषयी आदरयुक्त भीती वाटते. निसर्गाला प्रसन्न राखण्यासाठी, निसर्गाचा कोप होऊ नये यासाठी ते निसर्गपूजा करतात. रोगराईचे निवारण करण्यासाठी मंत्रतंत्र, जादूटोणा, बळी देणे इत्यादी मार्गांचा अवलंब करतात. मांत्रिक, तांत्रिक, भगत इत्यादी त्यांना हे उपचार करण्यात साहाय्य करतात.

**७) समान संस्कृती** : आदिवासी समुदाय रक्तसंबंधांवर आधारित गट आहे. प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते. त्यांच्या श्रद्धा, रूढी, परंपरा व वर्तन प्रकार नियम पूर्ण असतात. प्रत्येक जमातीची स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा, खानपानाच्या सवयी, नाचगाणी आणि उत्सव-सण असतात.

**८) युवागृहे** : प्रगत लोकसमुदायांशी संपर्क आल्यानंतर अलीकडच्या काळात युवागृहे लोप पावत चालली असली, तरी अद्याप काही आदिवासी जमातीत ती आजही अस्तित्वात आहेत. आदिवासी तरुण-तरुणींना व्यावहारिक शिक्षण देण्याचे आणि संस्कृती संक्रमणाचे ते प्रभावी माध्यम आहे.

**ड. आदिवासी समुदायाच्या समस्या -**

आदिवासी समुदाय महाराष्ट्रातील सर्वात कमकुवत समाजघटक आहे. त्यांच्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) दारिद्र्य** : आदिवासी समुदायाचे शेती, वनोपज संकलन, शिकार इत्यादी आर्थिक उपक्रम कालबाह्य स्वरुपाचे असल्याने, बहुसंख्य आदिवासी दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात. स्थलांतरित शेतीपासून प्राप्त होणारे उत्पन्न अत्यंत कमी असते. जंगलतोडीवर शासकीय निर्बंध असल्याने वनोपजाच्या संकलन व विक्रीतून प्राप्त होणारे उत्पन्न अत्यल्प असते. परिणामी दारिद्र्यातून उद्भवणाऱ्या निम्नस्तरीय जीवनमान, उपसमार व कुपोषण या समस्यांमुळे आदिवासी समुदाय हलाखीचे जीवन जगतो.

**२) कर्जबाजारीपणा** : आपल्या कौटुंबिक गरजा भागवण्यासाठी आदिवासी सावकारांकडून अवाजवी व्याजदराने कर्ज घेतात. त्यासाठी आपल्या जमिनी सावकारांकडे गहाण ठेवतात. कर्जाची परतफेड करता येत नसल्याने सावकार त्यांच्या जमिनी जप्त करतात किंवा सावकाराकडे विनामोबदला काम करण्याची सक्ती यांच्यावर करण्यात येते.

**३) फसवणूक** : आदिवासी लोकांच्या निरक्षरता, दारिद्र्य व असाहाय्यतेचा फायदा घेऊन बिगर आदिवासी जमीनदार, सावकार व ठेकेदार त्यांची फसवणूक करतात. त्यांनी आदिवासींच्या जमिनी हडप केल्याचे आढळून येते.

**४) शोषण** : असंख्य भूमिहीन आदिवासी आज खाणकाम, बांधकाम अश्या व्यवसायात काम करतात. मालकवर्ग त्यांच्या निरक्षरतेचा असाहाय्यतेचा फायदा घेऊन अपरिमित शोषण करतात.

**५) विस्थापन** : औद्योगिकीकरण, जलसिंचन, वीजनिर्मिती, रस्तेबांधणी इत्यादी विकास प्रकल्पासाठी शासन आदिवासी लोकांच्या जमिनी ताब्यात घेते. असंख्य आदिवासी खेड्यांचे स्थलांतर करण्यात येते. या विस्थापितांना दिली जाणारी नुकसान भरपाई पुरेशी नसते.

**६) व्यापक निरक्षरता** : शैक्षणिकदृष्ट्या आदिवासी समुदाय सर्वात मागास आहे. लिपीचा अभाव हे त्यांच्या निरक्षरतेचे उगमस्थान आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी समुदायात शिक्षणाचा प्रसार झाला असला तरीही बहुसंख्य आदिवासी निरक्षर आहेत. निरक्षरता हा त्यांच्या विकासातील सर्वांत मोठा अडथळा आहे.

**७) अपुरी शैक्षणिक संरचना** : आदिवासी क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली संरचना अपुरी आहे. आदिवासी क्षेत्रातील बहुसंख्य प्राथमिक शाळा एक-शिक्षकी आहेत. शिक्षक, इमारत, शैक्षणिक साधनांचा अभाव आहे. आश्रमशाळांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याने, शिक्षणासाठीच्या निधीचा गैरवापर होतो. आदिवासी क्षेत्रात माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सुविधा अत्यल्प आहेत.

**८) आदिवासी समुदायाच्या मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष** : 'आदिवासी माणूस आहे, जानवर नाही' आदिवासी समुदायाच्या व्यथा त्यांच्या मोर्च्यातील या घोषणेतून व्यक्त होतात. आदिवासी चळवळीचे नेतृत्व डाव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांनी केले. आदिवासींच्या जमिनीवरचे बिगर आदिवासींची अतिक्रमणे दूर करणे, आदिवासींना वनोपज गोळा करण्याचा व वनजमीनीवर

शेती करण्याचा अधिकार असावा, आदिवासी श्रमिकांना कामाचा योग्य मोबदला मिळावा, शासकीय सेवेत आरक्षणाची कार्यवाही व्हावी, आदिवासींच्या संस्कृतीचे संवर्धन व्हावे इत्यादी मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. आदिवासी विकासाच्या कार्यक्रमांची कार्यवाहीबाबत प्रशासकीय यंत्रणा उदासीन आहे. त्यामुळे आदिवासी समुदायातील तरुण नक्षलवादी संघटनेकडे आकर्षित होत आहेत.

**प्रश्न २. रा. आदिवासींच्या संघटना आणि चळवळीवर भाष्य करा.**

**१. प्रास्ताविक -**

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आदिवासी क्षेत्रात अनेक परिवर्तनवादी संघटना आदिवासी, शेतमजूर, अल्प व सीमांत भूधारक या दुर्बल घटकांना संघटित करून, आंदोलनात्मक मार्गाने परिवर्तन घडवून आणत आहेत. धुळे जिल्ह्याच्या शहादा तालुक्यात श्रमिक संघटना, ठाणे जिल्ह्याच्या पालघर तालुक्यातील भूमिसेना व वसई, वाडा, भिवंडी व शहापूर तालुक्यातील आदिवासी क्षेत्रात कार्य करणारी श्रमजिवी संघटना आणि गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलवादी संघटना कार्य करीत आहेत. या तीन परिवर्तनवादी गटांचे कार्यक्षेत्र आदिवासी विभाग आहे. श्रमिक संघटना व भूमिसेनेच्या स्थापनेत स्थानिक नेतृत्वाने, तर श्रमजिवी संघटनेच्या स्थापनेत 'बाहेरच्या' नेतृत्वाने पुढाकार घेतला. श्रमजीवी संघटनेत पंडित दांपत्याने परिश्रमपूर्वक स्थानिक नेतृत्व विकसित केले. आदिवासी जमिनींवरील बिगर आदिवासींचे अतिक्रमण दूर करण्यात व आदिवासींना त्यांचे न्याय्य हक्क प्राप्त करून देण्यात तिन्ही संघटनांना उल्लेखनीय यश मिळाले आहे.

**२. श्रमजीवी संघटना -**

महाराष्ट्राच्या आदिवासी क्षेत्रात, परिवर्तनवादी संघटना व चळवळींना शहरी भागातील सुशिक्षित मध्यम वर्गीयांचे नेतृत्व मिळाले. ठाणे जिल्ह्याच्या वसई, वाडा, भिवंडी व शहापूर तालुक्यातील आदिवासी क्षेत्रात १९८२ पासून 'श्रमजीवी संघटना' कार्यरत आहे. विवेक व विद्युल्लता पंडित या ध्येयवादी कार्यकर्त्यांनी या चळवळीचे नेतृत्व केले आहे. शेतमजुरी व वेठबिगारी या आदिवासी क्षेत्रातील महत्त्वाच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने श्रमजिवी संघटनेने कार्य केले. वेठबिगारी विरोधी लढ्याने सुरू झालेली ही संघटना आता केवळ आदिवासींचीच शक्ती झाली आहे असे नाही, तर परिसरातील ग्रामीण कष्टकरी समूहाचे ती आशास्थान बनली आहे. सधन जमीन मालकांची एकेकाळची आदिवासींवरील घट्ट पकड केव्हाच सैल झाली आहे. जुलूम जबरदस्तीने किंवा फसवणूकीने आदिवासींच्या जमिनी लुटण्याचे प्रमाण नगण्य झाले आहे. पोलिसांबद्दलची दहशत इतिहासजमा झाली आहे. जमिनी, मजुरी, अत्याचार या संदर्भातील संघर्ष स्वतःच उभे करण्यासाठी या भागातील आदिवासींनी कंबर कसली आहे. आवश्यक तेथे पोलिसांशीही ते अहिंसात्मक संघर्षाला व गुंडगिरी विरोधात उभे राहीले आहेत. आदिवासी महिलानी समान कामाला समान दामाची मागणी लढून मिळविण्यात यश मिळवले आहे.

**३. आदिवासीच्या समस्या -**

**अ. वेठबिगारीची समस्या -** ठाणे जिल्ह्यातील लग्नगड्याच्या पद्धतीने आदिवासींचे जीवनच उद्ध्वस्त केले. आदिवासींच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा फायदा घेऊन त्यांच्यावर जन्मभराची गुलामी लादणारी

ही अमानुषी पद्धत होती. बंधनातून मुक्त होण्याआधी आणि नंतर निर्माण झालेल्या जागृतीचा आदिवासींवर जबरदस्त परिणाम झाला. आपली अमानुष पिळवणूक करणारे, आपल्याला ढोरांसारखे राबवणारे जमीनदार व त्यांच्याशी हातमिळवणी केलेले सरकार जर या दोन शत्रूशी आपल्याला लढायचे असेल तर आपल्याला संघटित होणे व शांततेच्या मार्गाने जाणे आवश्यक आहे. त्याचबरोबर स्वतःचे अज्ञान दूर करून जीवनाकडे आशावादी दृष्टिकोनातून बघणे तेवढेच आवश्यक आहे, हे त्यांनी जाणले. त्यातून १९८२ साली श्रमजिवी संघटना अस्तित्वात आली. श्रमजिवी संघटनेच्या स्थापनेमुळे ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी क्षेत्रात सामाजिक व आर्थिक विकास प्रक्रियेस चालना मिळाली.

**ब) आदिवासींच्या जमिनींची समस्या -** जमीन हे आदिवासींचे सर्वस्व आहे. त्यांचे अस्तित्व, संस्कृती ही मातीशी निगडीत आहे. त्यामुळेच ते जमिनीला 'काळी आई' म्हणतात. ही त्यांची जमीन धाकाने किंवा इतर मार्गाने त्यांच्याकडून हिसकावून घेतली जाते. परिणामी जगण्याचे प्रमुख साधन नष्ट होते. हे अगदी सर्रास चालते. या समस्या सोडविण्यासाठी प्रथम जमिनीच्या प्रश्नाबाबत माहिती मिळविण्याची मोहीम सुरु झाली. जमिनीच्या प्रश्नाबाबत शिबिरे घेवून त्यांना जमीनविषयीचे कायदे, हक्क याविषयी माहिती या शिबिरात देण्यात आली. त्यातून लोकांना जाणवले की, आपल्या जमिनी बेकायदेशीरपणे, बळजबरीने हडपल्या आहेत व त्यावर आपला अधिकार आहे. त्या आपण हक्काने, कायद्याने परत मिळवू शकतो. यामुळे स्वतःच्या हक्काविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण झाली. अहिंसेच्या मार्गाने व्यक्तिगत किंवा सामुहिकपणे बेकायदा बळकावलेल्या जमिनी परत मिळवणे, सात-बारा फेरफार यातील भ्रष्टाचार निपटणे इ. अनेक कामांनी जोर धरला. तो यशस्वीपणे पार पाडण्यात येऊ लागला. अशा तऱ्हेने लोकांना स्वत:वरचा व संघटनेवरचा विश्वास वाढू लागला. त्यातून संघटनेची घोषणा तयार झाली. 'आदिवासी, कष्टकरी ढोर नाय माणूस हाय माणुसकीची भीक नको, वाहक हवा' या घोषणेने नवीन चेतना निर्माण झाली.

**क) स्त्रीमुक्तीचे कार्य -** संघटनेने स्त्रियांच्या प्रश्नावरही काम केले. संघटनेत स्त्रियंना पुरुषांइतकेच समानतेने वागवले जाते. संघटनेच्या सर्व कार्यक्रमांत, सर्व पातळयांवर निर्णय घेणे, नवीन योजना बनवणे, इ. सर्व ठिकाणी स्त्रियांचा सहभाग असतो. संघर्षात पुरुषांशी खांद्याला खांदा लावून त्या लढतात. त्यांचा महत्वाचा सहभाग असतो. सहकारी तत्त्वावर दुग्धव्यवस्था, सामाजिक वनीकरण वगैरे इ. योजना राबवण्यात प्रमुख वाटा स्त्रियांचा असतो. त्यातून येणाऱ्या उत्पन्नावरही त्यांचाच अधिकार असतो. संघटनेच्या कार्यकर्त्या असलेल्या काही स्त्रिया ग्रामपंचायतीचे संरपंच, उपसरपंच अशी पदे भूषवत आहेत. आदिवासी स्त्रियांसाठी 'माहेर' नावाची शिबिरे घेतली जातात. त्यात स्त्रियांच्या विकास व कल्याण यावर भर दिला जातो. त्यांनी घरातील व कामावरील शारीरिक व मानसिक छळाविरुद्ध त्यांनी आवाज उठविला आहे. समानतेची नवीन जाणीव त्यांना होत आहे. आता मुलींच्या शिक्षणाला महत्त्व दिले जात आहे. पारंपारिक दास्यातून तिची मुक्तता होत आहे. तिला स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणी होत आहे.

**४. श्रमिक संघटना व चळवळी -**

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक कृतिषील संघटनांपैकी एक प्रमुख संघटना धुळे जिल्ह्याच्या शहादा तालुक्यात कार्य करणारी श्रमिक संघटना आहे. महाराष्ट्र, गुजरात सीमेवरचा, २७% आदिवासी लोकसंख्या असलेले धुळे व नंदुरबार जिल्हे आहेत. राज्यात त्या इतर आदिवासी भागांप्रमाणेच या भागातही सावकार, जमिनदार व जंगल ठेकेदारांकडून भूमिपुत्रांचे वर्षानुवर्षे अपरिमित शोषण होत असे. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या विकासाच्या योजनांमुळे आदिवासी जनसमुदायाच्या परिस्थितीत उल्लेखनीय असा कोणताच बदल झाला नव्हता. आदिवासींचे अज्ञान, दारिद्र्य व असहाय्यतेचा फायदा सावकार व जमिनदारांनी घेतला आणि स्थानिक शासकीय यंत्रणेने या अन्यायाचे निर्मूलन व्हावे याकरिता कोणतीच उपाययोजना करत नव्हते. या अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी धुळे येथे १९५६ साली ग्राम स्वराज्य समितीची स्थापना करण्यात आली. आदिवासींच्या जमिनीवरचे जमिनदारांचे अतिक्रमण दूर करण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेल्या प्रयत्नांना फारसे यश मिळाले नव्हते. अंबरसिंग सुरतवंती या भिल्ल जमातीतल्या सुशिक्षित कार्यकर्त्याने १९७० साली भिल्ल सेवा मंडळाची स्थापना केली. त्याच्या कार्याला स्थानिक जमिनदार वर्गाने विरोध केला. त्यातूनच आपल्यावरचा अन्याय दूर करण्याकरिता संघर्ष करण्याचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा निर्धार अधिक दृढ झाला.

**अ. श्रमिक संघटनेची स्थापना -**

१९७२ साली धुळे येथे राज्यव्यापी भू-मुक्ती परिषद पार पडली. तिला आदिवासी क्षेत्रात कार्य करणारे आदिवासी व बिन-आदिवासी कार्यकर्ते एकत्र आले. या परिषदेत आदिवासी समूदायाच्या विविध समस्यांची सखोल चर्चा झाली आणि कार्याची दिशा ठरवण्यात आली. या परिषदेत पुढील मागण्या करण्यात आल्या.

१) आदिवासी जमिनीबाबत शासनाने संमत केलेल्या कायद्यांची कसोशीने अंमलबजावणी करावी. आदिवासींच्या ज्या जमिनी जमीनदार व सावकारांनी बेकायदेशीररीत्या बळकावल्या आहेत, त्या मुक्त करण्यात याव्यात.

२) आदिवासी शेतमजुरांना नियमित रोजगार प्राप्त व्हावा, याकरिता रोजगार हमी योजनेअंतर्गत विकासाची कामे धुळे व अन्य आदिवासी जिल्ह्यात सुरू करावीत.

३) आदिवासींची सर्व कर्जे माफ करण्यात यावीत.

म्हणजेच आदिवासींचे दास्यत्वातून मुक्तता, त्यांच्यावरील अन्यायाचे परिमार्जन, त्यांच्याकरिता आंदोलने उभारण्याचा निर्णय परिषदेत घेण्यात आला. परिषदेत स्वीकृत करण्यात आलेल्या कार्यक्रमांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने १९७२ साली श्रमिक संघटनेची स्थापना करण्यात आली. श्रमिक संघटनेच्या नेतृत्वावर मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव असला तरी अति-जहाल मार्क्सवादी, म्हणजेच नक्षलवादी विचारसरणी त्यांना अमान्य होती. दहशतीच्या मार्गांचा अवलंब करून मिळणारे यश अल्पकालीन असते हे नक्षलवाद्यांच्या पश्चिम बंगालमधील अपयशाने

प्रस्थापित केले होते. त्यामुळे सरंजामी व शोषणयुक्त समाजव्यवस्थेविरूद्ध शोषित वर्गात असंतोष निर्माण करणे, त्यांना संघटित करणे आणि अहिंसात्मक आंदोलनाच्या मार्गाने आपली उद्दिष्टे साध्य करणे ही कार्यपद्धती श्रमिक संघटनेने स्वीकारली. श्रमिक संघटनेच्या प्रारंभीच्या काळात बाहेरच्या, समविचारी, शहरी कार्यकर्त्यांनी संघटना उभारण्यात सहकार्य केले असले तरी नंतरच्या काळात संघटनेची सुत्रे स्थानिक नेतृत्वाच्या हाती होती. स्थानिक नेतृत्वाचा विकास व्हावा याकरिता शहादा तालुक्यातील प्रत्येक गावात स्थानिक मजदूर समिती आणि तरूण मंडळांची स्थापना करण्यात समित्यांना आली. शिक्षणप्रसार, अंधश्रद्धा निर्मुलनच्या कार्यात सुशिक्षित आदिवासी तरुणांना सहभागी करून घेण्यात आले. संघटनेच्या कार्यात आदिवासी महिलांचा सहभागही उल्लेखनीय आहे. जवळजवळ ४०% कार्यकर्ते महिला आहेत. संघटनेच्या कार्यक्रमांसंबंधीचे निर्णय सर्व कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून म्हणजेच लोकशाही पद्धतीने घेतले जातात.

प्रारंभीच्या काळात संघटनेचे कार्य केवळ आदिवासींपुरते मर्यादित होते. नंतर इतर शोषित घटकांना संघटित करण्याचा प्रयत्न संघटनेने केला. 'शोषित वर्गाची एकजूट' करणे आवश्यक होते. स्थानिक शासकीय यंत्रणेच्या सहकार्याने आणि वेळप्रसंगी आंदोलने उभारून जमिनदारानी बळकावलेल्या जमिनी मुक्त करण्यात संघटनेने कार्य केले. वेळप्रसंगी न्यायालयात अतिक्रमणाची प्रकरणे घेऊन जाणे व आदिवासींचे हक्क प्रस्थापित करून, त्यांनी आदिवासी शेतकऱ्यांना जमिनी परत मिळवून दिल्या. म्हणजेच शहादा तालुक्यातील आदिवासी लोकसमुदायाच्या विकासाकरीता व त्यांच्यावरील अन्यायाचे निर्मूलन करण्याचे कार्य श्रमिक संघटना गेली दोन दशके करत आहे.

**ब. भूमिसेना -**

ठाणे जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्या ३७% होती. पालघर जिल्ह्यातील वाडा, डहाणू, जव्हार, पालघर, मोखाडा आणि विक्रमगड तालुक्यातील बहुसंख्य लोकसंख्या आदिवासींची आहे. हे आदिवासी अल्पभूधारक, किमान भूधारक व भूमिहीन शेतमजूर आहेत. १९७० साली डाव्या पक्षांनी जमीन बळकावण्याचा कार्यक्रम आंदोलन सुरू केले. पालघर तालुक्यातील या आंदोलनात काळूराम दुधाडे व अन्य आदिवासी कार्यकत्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. तुरुंगवासात असताना विचार विनिमयानंतर आदिवासी कार्यकत्यांचे एकमत झाले की आदिवासी वर्गाबाबत राजकीय पक्षांची सहानुभूती प्रतिकात्मक असते. त्यांना आदिवासीच्या समस्यांबाबत फारशी आस्था नसते. त्यांची प्रतिकात्मक आंदोलने पक्षाच्या राजकीय फायद्याकरीता आयोजित केली जातात. राजकीय पक्षांबाबत भ्रमनिरास झाल्यानंतर काळूराम व अन्य आदिवासी कार्यकर्त्यांनी स्वतःची भूमिसेना ही संघटना स्थापन केली. भूमिसेनेने भूसुधारणा कायद्यांची अंमलबजावणी करावी अशी मागणी केली. ज्या आदिवासी शेतकऱ्यांची जमीन बिगर आदिवासी व्यक्तीने बळकावली असेल, त्या प्रकरणाची पूर्ण चौकशी करून, त्यासंबंधीची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांकडे सादर करणे व त्यांच्यावर दबाव आणून अशा जमिनी सोडवून घेणे हा अत्यंत व्यावहारिक उपक्रम संघटनेने हाती घेतला. ज्या प्रकरणात स्थानिक अधिकारी सहकार्य करत नसे, त्या प्रकरणात त्या अतिक्रमीत जमिनीतील उभी पिके कापून, ते

धान्य काबिज करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. त्या दबावतंत्रामुळे अनेक सावकारांनी आदिवासी जमिनींवरचा बेकायदेशीर कब्जा सोडून दिला. भूमिसेनेच्या कार्याला प्रसिद्धी मिळाल्यानंतर, शहरी भागातील कार्यकर्त्यांनी त्याच्या कार्यात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांना संघटनेच्या कार्यात सहभागी करण्याकरिता 'भूमिपुत्र प्रतिष्ठाना'ची स्थापना केली.

**क. नक्षलवादी संघटना -**

'पीपल्स वॉर ग्रुप' या नक्षलवादी संघटनेने गेल्या दशकात महाराष्ट्र-आंध्र प्रदेश सीमाक्षेत्रातील, म्हणजेच विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे आणि मराठवाड्याच्या नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात आपला प्रभाव प्रस्थापित केला आहे. महाराष्ट्रातील आंध्रप्रदेशाला लागून असलेल्या आदिवासी क्षेत्रात नक्षलवाद्यांचा प्रवेश होणे अपरिहार्य होते. कारण या भागातील आदिवासी वर्गाचे अपरिमित शोषण जंगल ठेकेदार व सावकार वर्गाकडून केले जात होते. ते रोखण्याकरिता शासनाने कोणतीच परिणामकारक उपाययोजना केली नव्हती. १९८०-८१ च्या सुमारास नक्षलवाद्यांनी या भागात आपल्या हालचालींना प्रारंभ केला आणि गडचिरोली जिल्ह्यात आपली प्रभावी यंत्रणा स्थापन केली. पीपल्स वॉर ग्रुपचे सहा 'दलम्' गट या भागात कार्यान्वित आहेत. त्यौपकी चार गटांचे नेतृत्व शिवांना, गंगान्ना, देवजी आणि बालना करतात, तर उर्वरित दोन गटांचे नेते अज्ञात आहेत. १९९२ साली शिवन्नाच्या 'दलमने' राज्यमंत्री धर्माराव अत्राम याचे अपहरण केले. आत्रम यांची सुटका करण्याच्या मोबदल्यात राज्य शासनाने शिवन्नाची सुटका केली होती.

आदिवासी व शेतमजुरांचे प्रश्न त्यांनी परिणामकारकरित्या सोडवले आहेत. त्याकरिता त्यांनी जंगल ठेकेदार, सावकार, राजकारणी व पोलिस दलांचा सामना केला आहे. तेंदू पानाच्या एका पुड्याकरिता ठेकेदार त्यांना १९८० साली सात रुपये द्यायचे आज त्याकरिता ठेकेदार ७५० रुपये मोजतात आणि एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासन त्याकरिता ३९० रुपये देते. बल्लारशाह येथील कागद कारखाना गडचिरोली जिल्ह्यातील एकमेव औद्योगिक आस्थापना होय. या कारखान्याकरिता आदिवासींकडून बाबूची खरेदी करत असे. ठेकेदार वर्ग नक्षलवादी संघटनांच्या प्रयत्नांमुळे कारखान्याचा मालक वर्ग आदिवासी वर्गाकडून किफायतशीर दर देऊन बाबूंची प्रत्यक्ष खरेदी करतो. या कारखान्यात काम करणारे बहुसंख्य कामगार आदिवासी जमातींपैकीच आहेत. त्यांच्या वेतन, भत्ते, बोनस व अन्य सुविधांमध्ये उल्लेखनीय वाढ झाली आहे. कारखान्याचे कामकाज सुरळीतपणे व्हावे याकरिता बल्लारपूर पेपर मिल्सच्या मालक वर्गाने 'दलमच्या' नेत्यांना पन्नास लाख रुपये खंडणी दिल्याचे उघडकीस आले आहे. म्हणजेच आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे 'परमार्थाच' आणि स्वतःच्या संघटनेकरिता शस्त्र खरेदीकरिता व इतर संघटनात्मक 'परमार्थाचे' आणि स्वतःच्या घटकात शस्त्र खरेदीकरिता व इतर संघटनात्मक कामांकरिता लागणारा पैसा उभारण्याचे 'स्वार्थ'चे कार्य नक्षलवाद्यांनी प्रभावीपणे केले आहे. आधुनिक शस्त्रांचा व दहशतीच्या मार्गाचा वापर

करून त्यांनी या क्षेत्रातील आदिवासी, शेतमजूर, छोटे शेतकरी आणि कामगार वर्गाला दलमच्या ताब्यात ठेवला आहे. दलमशी 'गद्दारी' करणाऱ्या स्थानिक लोकांना क्रूरपणे शासन केले जाते. आपला प्रभाव प्रस्थापित केल्यानंतर, 'शोषित' जनतेच्या विश्वासास पात्र उरल्यानंतर त्याच शोषित जनतेचे शोषण 'प्रेषित' वर्गाकडून केले जाते. गडचिरोली जिल्ह्यातील ३००००० आदिवासींवर आज नक्षलवादी दलमची हुकूमत आहे. त्याचा वापर आपल्या राजकारणाकरिता दलमच्या नेत्याकडून केला जातो. ते केवळ आदिवासीवर हुकूमत गाजवतात असे नाही तर त्याच्यावर अत्याचार देखील करतात. आदिवासी महिला वर्गावर पाशवी अत्याचाराच्या घटना वारंवार घडतात. परंतु "दलमची दहशत असल्याने त्याविरूद्ध कोणीही तक्रार करत नाही. त्यांच्या जाचाला आदिवासी समुदायही कंटाळला आहे. त्यामुळेच शासन नक्षलवाद्यांविरुद्ध पोलिसी कारवाईच्या बरोबरच या 'अति-मागास' क्षेत्राच्या व त्यातील आदिवासी लोकसमुदायाच्या विकासाकरिता ठोस उपाययोजना हाती घेत आहे. विकासाच्या उपक्रममाद्वारा 'नक्षलवाद निर्मुलन' मोहीम यशस्वी होऊ शकेल. याच जाणिवेमुळे महाराष्ट्र शासनाने गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासास अग्रक्रम देऊन त्याकरिता विशेष निधी उपलब्ध करून देत आहे. गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्याप्रमाणेच राज्यात इतरत्र असलेल्या आदिवासी जमातींच्या विकासाकरिता योजनाबद्धरीत्या प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

**प्रश्न २. रा. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीवर भाष्य करा.**
**महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा आढावा.**

**१. प्रास्ताविक -**

महाराष्ट्रात शेतकरी संघटनेच्या निमित्ताने गेल्या तीन दशकात शेतकरी वर्गाच्या मागण्यांचे व हितसंबंधाचे मोठ्या प्रमाणात आविष्करण झाले असले तरी त्याचा उगम ब्रिटिश कालखंडात झाला. ब्रिटिश पूर्व काळात इस्लामी व मराठी राजवटीत 'वतनदार' पद्धत अस्तित्वात होती. ही पद्धत लोकहितकारी नव्हती. मात्र १८१८ नंतरच्या कालखंडात मराठी भाषिक प्रदेशावर ब्रिटिश राज्यकर्त्यांची अधिसत्ता प्रस्थापित झाली. मुंबई प्रांतात बहुतांशी रयतवारी जमीनधारना पद्धत, तर मध्य प्रातांतः मालगुजारी पद्धत तर मराठवाडा व वऱ्हाड प्रांतात पारंपारिक वतनदारी पद्धत प्रचलित होती. रयतवारी पद्धतीत रयतेचा प्रत्यक्ष संबंध परकीय राज्यकर्त्यांशी जमीन महसूल / शेतसारा भरण्याच्या निमित्ताने येत असे. मुंबई प्रांतात शेतसाऱ्याचे दर वाढवण्यात आले आणि वारंवार येणाऱ्या नैसर्गिक संकटांच्या काळात त्यात कोणतीही सवलत दिली जात नसे. अवर्षण व अतिवृष्टी या आस्मानी संकटामुळे रयतेची अवस्था हलाखीची होत गेली. जमीन महसूल व अन्य शासकीय देण्यांचा भरणा करण्याकरिता बहुसंख्य अल्पभूधारकांनी आपली जमीन सावकरांकडे गहाण टाकावी लागत. त्यावर अवाजवी व्याज आकारल्याने बहुसंख्य भूधारक कर्जबाजारी झाले.

**ब. ब्रिटिश काळ –**

एकोणिसाव्या शतकात मुंबई प्रातांत शेतकऱ्याचे दंगे वारंवार घडू लागले. परंतु परकीय राज्यकर्त्यांनी पाशवी बळाचा वापर करून ते दडपले. आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांनी रयतेस संघटित करून, परकीय राज्यकर्त्याविरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक समाजसुधारकांनी आपल्या लिखाणात रयतेच्या दयनिय अवस्थेचे चित्रण करून, शासनास त्यांच्याविषयी अधिक सहानुभूतीचे धोरण स्वीकारण्याची विनंती केली. महात्मा फुल्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या 'शेठजी भटजी' वर्गावर प्रखर टिका केली. रयतेला संघटित करण्याच्या उद्देशाने त्यांनी १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. न्या. महादेव रानडे यांनी 'अनुकंपनीय अवस्थेतील' शेतकरी वर्गाची परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी अशी मागणी केली. पुण्यातील सार्वजनिक सभेत दुष्काळग्रस्तांची पाहणी करून, त्याचा अहवाल शासनास सादर केला आणि दुष्काळग्रस्तांकरिता राहत कार्य सुरू करावे अशी मागणी केली. २० व्या शतकात गांधींच्या राष्ट्रीय चळवळीमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात राजकीय जागृती निर्माण झाली. १९१७ साली बिहार प्रांतात सरदार पटेल यांनी बारडोली बेथे 'शेतसाराबंदी' चा यशस्वी सत्याग्रह केले. १९२७ - १९२८ साली सेनापती बापट यांनी मुळशी सत्याग्रह केला. १९३०-३१ च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतसाराबंदी व जंगल सत्याग्रहांचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले. केशवराव जेधे व सत्यशोधक समाजाचे नेते राष्ट्रीय महासभेत सहभागी झाल्याने शेतकरी वर्ग संघटित होण्यास प्रारंभ झाला. राष्ट्रीय महासभेअंतर्गत १९३६ साली अखिल भारतीय किसान सभेची स्थापना करण्यात आली. किसान सभेच्या मागणी नुसार १९३७ साली मुंबई प्रांतिक विधिमंडळाने भूसुधारणाविषयक अनेक कायदे संमत केले. देशातील इतर भागाप्रमाणचे महाराष्ट्रात देखील साम्यवादी विचारसणीच्या कार्यकर्त्यांनी किसान सभा बळकावली. १९४६ साली राष्ट्रीय महासभेअंतर्गत केशवराव जेधे व बहुजन समाजाच्या अन्य नेत्यांनी शेतकरी कामगार संघ स्थापन केला. शेतकरी वर्गाने 'आपल्या' या संघटनेस पाठिंबा दिला. स्वातंत्र्योत्तर काळात जेधे व त्यांचे सहकारी काँग्रेस पक्षातून बाहेर पडले आणि १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

**क. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर –**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र शासनाने शेतकरी वर्गाच्या हितसंबंधाना अनुकूल धोरण स्वीकारल्याने शेतकरी वर्गाचा काँग्रेसला एकमुखी पाठिंबा होता. विशेष म्हणजे हे सरकार 'आपले' आहे म्हणून त्याच्याशी संघर्ष करण्याची आवश्यकता शेतकरी वर्गाला जाणवली नाही. त्याचेच पर्यावसान आपल्या हितसंबंधांचा जोपासनेकरिता 'दबाव गट' म्हणून शेतकरी वर्ग संघटित झाला नाही. पुढे 'हरितक्रांती' नंतरच्या दशकात अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले.

अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याकरिता शासनाने शेतकरी वर्गास अनेक सवलती दिल्या. परंतु त्यातुन आलेली समृद्धी व सुबत्ता केवळ बड्या शेतकऱ्यांपुतीच सीमीत राहीली. म्हणजेच सीमांत व अल्पभूधारकांच्या व शेतमजुरांच्या परिस्थितीत उल्लेखनीय असा बदल घडून आला नाही.

**ड. शेतकरी संघटनेची स्थापना -**

महाराष्ट्रात शेतकरी वर्गाला संघटित करण्याच्या उद्देशाने शरद जोशींनी १९७८ मध्ये शेतकरी संघटना स्थापन केली. या संघटनेने शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु केले. त्यामागचा उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून देणे हा होता. आंदोलनाद्वारे संपूर्ण ग्रामीण समाजाचे द्ररिद्य दूर करणे हा उद्देश आहे. शासनावर दबाव आणून वेगवेगळया पिकांसाठी उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर भाव मिळविणे ही शेतकरी संघटनेची कार्यद्धती आहे. शक्य तितक्या प्रमाणात पिकांच्या पेरणी क्षेत्रावर नियंत्रण ठेवून किंवा नंतर शेतमालाच्या पुरवठ्याची साठवणूक करून किफायतशीर किंमत येईल इतकाच पुरवठा बाजारात आणणे आवश्यक मानले आहे. आंदोलनाचा एक अल्पकालीन प्रकार म्हणून काही काळ बाजारात जाणारा माल रोखून धरणे हा मार्गही अवलंबिला जातो. किफायतशीर भावामध्ये संपूर्ण उत्पादन खर्च केला पाहिजे तरच शेतीला लागणारी सर्व आदाने व सेवा शेतकरी विकत घेऊ शकतील. असे घडले तरच शेतकन्यांना कर्ज घेण्याची गरज लागणार नाही आणि कर्जबाजारीपणाची समस्या उद्धवणार नाही. किफायतशीर किंमतीमुळे शेतकन्यांकडून शेतमजुरांपर्यंत वितरीत होऊन शेतमजुरीचे दर वाढतील. त्यामुळे शेतमजुरांची स्थिती सुधारेल. आज जो संपत्तीचा ओघ शेतीतून कारखानदारीकडे वाहतो आहे तो उलटा होईल. ग्रामीण भागाचे शोषण संपल्यामुळे देशाची आर्थिक रचनाच बदलेल. त्यादृष्टीने शेतकरी संघटनेचे नेते कृषी उत्पादनाच्या किमतीच्या प्रयत्नाला मुलभूत प्रश्न समजतात आणि कृषी उत्पादनास किफायतशीर दर यास क्रांतीकारक मार्ग लेखतात. त्यांच्या मते स्वातंत्र्यपूर्व कालखंडात इंग्रजांनी शेतीच्या शोषणाचे जे धोरण अवलंबिले होते तेच स्वातंत्र्यानंतरही सुरू राहीले. म्हणूनच जोशी सध्याच्या राज्यकर्त्यांना 'काळे इंग्रज' आणि शोषक शहरी समाजाला 'इंडिया' आणि शोषित ग्रामीण भागाला 'भारत' असे म्हणतात.

**इ. शेतकरी संघटनेची व्यूहरचना व आंदोलने :**

दबावगटाच्या राजकारणात निर्धारित उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता व्यूहरचना अत्यंत महत्वाची आहे. आपल्या संघटनेच्या लोकशाहीच्या तत्वावर विश्वास आहे हे प्रस्थापित करण्याकरिता जोशींनी संघटनेच्या अध्यक्षपदी स्वतःची निवड करून घेतली. या व्यतिरिक्त संघटनेच्या जेष्ठ नेत्यांचे नियामक मंडळ औपचारिकरित्या स्थापन केले. जनसामान्यांची मानसिकतेचा आता शासनावर दबाव आणण्याकरिता मोठ्या संख्येत अनुयायांना आंदोलनात उतरवण्याची हातोटी जोशींजवळ आहे. आपल्या संघटनेच्या संख्या सामर्थ्याचे प्रदर्शन जोशी वारंवार करत असत. त्यामुळे परिस्थिती पूर्ववत आणण्याकरिता शासन या संघटनेच्या वाजवी मागण्या मान्य करत असत. जोशींच्या मते, त्यांची

संघटना लोकशाही व्यवस्थेच्या चौकटीत राहूनच, अहिंसात्मक' आंदोलने करते. असे असले तरीही अनेक आंदोलनांना हिंसक वळण लागते ही वस्तुस्थिती आहे. आषाढी एकादशीच्या मुहूर्त साधून पंढरपूर मुक्कामी चंद्रभागेच्या काठी जोशींच्या नेतृत्वाखाली संघटनेने विठोबांना साकडे घातले होते. आपल्या संघटनेच्या मुखपत्राची नावे जोशींनी 'वारकरी' आणि 'आठवड्याचा ग्यानबा' असे होते.

रास्ता रोको, रेल रोको, गावबंदी, घेराव, आमरण उपोषण सारख्या अनेक मार्गाचा संघटना व्यापक प्रमाणात वापर करते. १९७८ ते १९८८ या दशकात जोशींनी मार्गदर्शन व नेतृत्वाखाली संघटनेने विविध प्रकारची आंदोलने केली. त्यापैकी काही यशस्वी तर काही अयशस्वी ठरली.

**ई. संघटनेतील फाटाफुट -**

शेतकरी संघटनेच्या स्थापनेनंतर चाळीस वर्षात सहा वेळा फूट पडली. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढण्यासाठी एकजूट असावी. संघटन असावा, म्हणून शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची स्थापना केली. अभ्यासू व लढवय्या नेता मिळाल्याने संघटनेचा राज्यभार दबदबा निर्माण झाला. पण अचानक जोशींनी भाजपला पाठिंबा दिला. तेथे फुटीचे बीजे रुजली. पाठिंब्याच्या निर्णयाने नाराज झालेल्या खासदार राजू शेट्टीनी 'स्वाभिमानी शेतकरी संघटने'ची पेरणी केली. त्यांच्या पाठोपाठ रघुनाथ पाटील यांनीही जोशींना रामराम केला. सदाभाऊ खोत आणि शेट्टी यांच्यातील वादही वाढत गेला. त्यातून खोतांनी रयत क्रांती संघटना काढली. तत्पूर्वी स्वाभिमानीतून बाहेर पडून बी. जी. पाटील, पंजाबराव पाटील, संजय पाटील यांनी बळीराजा संघटनेची स्थापना केली.

सरकार बदलले तरी शेतकऱ्यांकडे पाहण्याची दृष्टी बदलली नाही. अशा वेळी सामूहिक ताकद दाखवत सरकारला जाब विचारण्याबरोबरच मागण्या मान्य करून घेण्यासाठी संघटना मजबूत करणे गरजेचे होते. पण, राजकीय स्वार्थासाठी शेतकरी नेते सोयीने भूमिका घेत आहेत. यामुळेच सतत फूट पडत आहे. शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील यांच्या मते, शेतकऱ्यांची संघटना मोडीत काढण्यासाठी कारखाने, मंत्री आणि मुख्यमंत्री मलिदा पुरवत आहेत. त्यामुळेच याभागात नवीन संघटना स्थापन करणाऱ्यांचे पेव फुटले आहे. हे रोखण्याची जबाबदारी शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या नेत्यांची आहे.

**प. शेतकरी संघटनेचे मूल्यमापन -**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे हे आंदोलन १९७८ पासून सुरू झाले. एकेका पिकासाठी आंदोलन करताना सगळया पिकांसाठी व शेतकऱ्यांसाठी ही संघटना भाष्य करू लागली. सुरवातीच्या काळात संघटन व आंदोलने पूर्णपणे राजकारणापासून व निवडणुकांपासून अलिप्त ठेवल्यामुळे सगळयाच राजकीय पक्षाचे सभासद संघटनेमध्ये शेतमालाच्या किंमतीच्या प्रश्नावर एकत्र आले. शेतकऱ्यांचे जे अनेक प्रकारचे शोषण चालते त्यापैकी किंमतीद्वारे शोषण हा एक भाग असल्यामुळे डाव्या पक्षांना ह्या आंदोलनाला प्रत्यक्ष विरोध करणे शक्य नव्हते. संघटनेने शेतकऱ्याच्या मागण्या पुढे रेटणे, हा एकमेव

कार्यक्रम सुरु केला. त्यात काही प्रमाणात यश मिळाल्यावर संपूर्ण ग्रामीण दारिद्रय हटविण्याचे सिद्धांत, मानव मुक्तीची भाषा सुरू झाली. प्रत्यक्षात मात्र बहुसंख्येने असलेल्या अल्पभूधारक शेतमजुरांच्या प्रश्नाला बगल देऊन, मार्क्स, गांधी वगैरे सगळे चूक, मी फक्त आता खरे, स्वतंत्र्य आणि त्रिकालाबाधित तत्वज्ञान प्रथमःच मांडीत आहे, असा प्रचार केला गेला व आभास निर्माण केला गेला.

शेतकरी संघटनेच्या कार्याचे दोन कच्चे दुवे आहेत. एक, भारतात कोणत्याही लोक संघटनेला खऱ्याखुऱ्या शोषित जनतेचे प्रश्न हाती घेऊन पुढे आल्याशिवाय टिकून राहणे कठीण आहे. शेतकरी संघटनेने ते केले नाही. अल्प व अत्यल्प भूधारक आणि शेतमजुरांच्या दारिद्राच्या प्रश्नाला तो सामोरी गेली नाही. त्यामुळे ग्रामीण दारिद्राचा जो गाभा आहे त्याचे विश्लेषण व उपाययोजना ह्यावर संघटना बोललीच नाही. उलट कोरडवाहू क्षेत्रात शेतमजुरांना रोजगाराचे जे रोजगार हमी किंवा ग्रामोद्योगासारखे आधार आहेत ते भिकारडे म्हणून धिक्कारले आहे आणि स्वतःच व्यवहार्य पर्यायही प्रत्यक्षात किंवा सिद्धान्तात दाखविले नाही. दुसरा कच्चा दुवा म्हणजे सगळे राजकीय पक्ष चोर असे म्हणने हे राजकीय असमजूतीचे लक्षण आहे. शेतकरी संघटनेपुढे रात्रंदिवस केवळ एकच प्रश्न असतो, परंतु राजकीय पक्षांपुढे समाजजीवनाच्या सर्वच समस्या असतात त्यापैकी एक समस्या शेतमालाच्या भावाची असते. त्यामुळे शेतीचा प्रश्न फक्त स्वतःला कळला असे जे जोशींना वाटते ते गैर होते.

## प्रकरण ८. नागरी समुदायः संकल्पना आणि संघटन

**प्रश्न १. ला. नागरी समुदाय संकल्पना आणि संघटन यावर चर्चा करा.**

**नागरी समुदाय संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.**

**१. प्रास्ताविक -**

आशिया, आफ्रिका खंडातील विकसनशील देशात विकासाची संरचना उपलब्ध नसल्याने शासनाला व्यापक स्वरुपाची विकासात्मक जबाबदारी स्वीकारावी लागते. विकसनशील देशांत दारिद्रय, बेकारी, निरक्षरता असे कितीतरी प्रश्न राष्ट्रासमोर आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक विकासाबरोबर समाजाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी शासनावर आली. शासनसंस्थेने आपल्यासाठी अधिकाधिक कार्ये करावीत अशी सर्वसामान्य जनतेची अपेक्षा असते. परंतु शासनाजवळ प्रशासकीय यंत्रणा, पैसा व साधनसामग्रीची कमतरता असल्यामुळे अपेक्षित आर्थिक विकास किंवा समाजपरिवर्तन होत नाही. अशा परिस्थितीत विकास प्रक्रियेत जनतेचा सहभाग महत्वाचा ठरतो.

२१ व्या शतकात नागरी समुदाय ही संकल्पना मानवाधिकार व विकास प्रक्रिया संबंधीचे चलनी नाणी बनले आहे. या संकल्पनेचा उगम व विकास प्रथमतः अमेरिका आणि त्यानंतर पश्चिम युरोपीय देशात झाला. अमेरिकेतील या संकल्पनेचा जगभर प्रसार झाला आहे. जागतिकीकरणाचा भारताने १९९१ साली स्वीकार केल्यानंतर अमेरिकेने 'निर्यात केलेली नागरी समुदाय' ही संकल्पना व मानवाधिकारावादी विचाराचा केंद्रबिंदू बनली आहे. परदेशातून आयात केलेल्या या संकल्पना

वाढीसाठी आवश्यक असणारी परिस्थिती पर्यावरण, अर्थव्यवस्था अद्याप रुजलेली नाही. नागरी समुदाय ही संकलपना मृगजळ असल्याचा आक्षेप घेतला जातो. कारण ती अमेरिकेतही पूर्णपणे साकारलेली नाही. अमेरिकेत आजही वर्णभेद मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. आर्थिक विषमता व शोषण हे त्या देशातील वास्तव्य आहे.

**२. नागरी समुदाय संकल्पना -**

जॉन लॉक या विचारवंताने राज्याच्या निर्मितीविषयक सामाजिक करार सिद्धांतात नागरी समुदाय ही संकल्पना मांडली. निसर्गावस्थेत असणारा मानवी समुदाय सामाजिक करारा‌द्वारा प्रथमतः नागरी समुदायाची व त्यानंतर राज्याची स्थापना करतात. लोकशाहीवादी लॉकने मर्यादित राजेशाहीचे समर्थन केले. नागरिकांच्या जीवित स्वातंत्र्य आणि संपत्तीच्या संरक्षणासाठी राज्याची स्थापना करण्यात आली असे प्रतिपादन त्याने केले. लोकशाही प्रणाली, व्यक्ती स्वातंत्र्य व संपत्तीचा अधिकार या आधारीत नागरी समुदाय ही संकल्पना त्याने मांडली. त्याच्या या उदारमतवादी विचारांचा प्रभाव अमेरिकेच्या संविधानकारांवर पडला होता. त्यामुळे अमेरिकेत उदारमतवादी लोकशाही आणि भांडवलशाही अर्थव्यवस्था विकसित झाली. शासनाचा कार्यभाग मर्यादित असल्याने नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी या देशातील दानशूर आणि धर्मादाय संस्थांनी स्वीकारली. सामाजिक ऋणाची परतफेड करण्याची संस्कृती या देशात विकसित झाली.

नागरी समुदाय या संकल्पनेत व्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना, समताधिष्ठित समाजात प्रत्येक व्यक्तीला विकासाची समानसंधी, न्यायाच्या तत्त्वावर आधारित शोषण व भयमुक्त समाज, प्रत्येक व्यक्तीच्या किमान गरजांची पूर्तता, राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची प्रत्येकास समान संधी, राजकीय निर्णय प्रक्रियेत व्यक्ती व त्यांच्या संघटनांचा सक्रिय सहभाग या बाबी अभिप्रेत आहेत.

**२. नागरी समुदाय -**

नागरी समुदायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या व्यक्ती व संघटनांना Civil Society Organisations असे म्हणतात. भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेत दानशूर व्यक्ती त्यांच्या विशस्त संस्था प्रस्थापित करतात. त्यांच्याद्वारा समाजोपयोगी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना आर्थिक पाठबळ दिले जाते. धर्मादाय संस्था या सदराखाली चर्च आणि त्याच्याशी संलग्न धर्मगुरू यांचा समावेश होता. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात मिशनरी धर्मप्रसारकांची कामगिरी उल्लेखनीय आहे. आशिया व आफ्रिका खंडात पाश्चात्यांची साम्राज्ये प्रस्थापित होत असताना, धर्मप्रसारकांनी धर्म प्रसाराबरोबरच कल्याणकारी उपक्रम हाती घेतले.

२० व्या शतकात स्वयंसेवी संस्था आणि स्वयंसेवी क्षेत्र या संकल्पना विकसित झाल्या. कालांतराने त्यात बिना नफा कार्य करणाऱ्या संस्थांचा समावेश झाला. १९८० च्या दशकात नफ्याचा विनियोग सामाजिक कार्यासाठी करणाऱ्या संस्थांचा समावेश असलेली तिसरे क्षेत्र ही संकल्पना रूढ झाली. स्वयंसेवी क्षेत्राच्या अधिक मर्यादा स्पष्ट झाल्याने आंतरक्षेत्र भागीदारीचा पुरस्कार करण्यात आला.

त्यानुसार शासकीय व स्वयंसेवी, उद्योग क्षेत्र व स्वयंसेवी आणि शासकीय उद्योगक्षेत्र भागिदारी प्रस्थापित झाल्या. आरोग्य व सामाजिक कल्याणाच्या उपक्रमांची जबाबदारी तिसऱ्या क्षेत्राने स्वीकारली. त्यासाठी आवश्यक असणारा निधी व यंत्रणा शासनाने उपलब्ध करून द्यावी, असे प्रतिपादन करण्यात आले. उद्योग क्षेत्राची सामाजिक जबाबदारी या तत्वानुसार उद्योगसंस्थांनी लोक कल्याणकारी उपक्रम स्वतः राबवावेत किंवा त्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना साहाय्य करावे हा विचार रूढ झाला. विकसनशील देशात पायाभूत सेवा निर्माण करण्यासाठी शासकीय-खाजगी अधिकारीचे समर्थन करण्यात आले. त्यात समाजोपयोगी कार्य करणाऱ्या खाजगी संस्था, समाजहितैषी व्यक्ती, दानशूर व्यक्ती व त्यांच्या विश्वस्त संस्था, धर्मादाय संस्था, स्वयंसेवी संस्था, विना नफा तत्वावर कार्य करणाऱ्या संस्था या सर्व घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांच्या प्रयत्नांद्वारा नागरी समुदायाची संकल्पना राजकारणाची प्रक्रिया विकसित व विकसनशील देशांमध्ये कार्यरत आहे.

**प्रश्न २. रा. महाराष्ट्रातील स्वयंसेवी संघटनाची वैशिष्ट्ये व मर्यादा स्पष्ट करा.**

**अ. महाराष्ट्रातील स्वयंसेवी संघटना -**

विधायक कार्य करणाऱ्या संघटनांना स्वयंसेवी संघटना म्हणतात. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात रचनात्मक संघटना, बिगर सरकारी संघटना NGO आणि पक्षाबह्य कृतिशील संघटना अशा विविध नावाने ओळखले जाते. 'Voluntary' शब्दात Voluntarism स्वयंफूर्तीने केले जाणारे समाजोपयोगी कार्य असा अर्थ अभिप्रेत आहे. म्हणूनच स्वयंसेवकांच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेवा दल, काँग्रेस सेवा दल आणि अलिकडच्या काळात इस्लामिक स्वयंसेवक संघ अशा संघटना अस्तित्वात आल्या. यापैकी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर शासनाने १९४८ व १९७५ साली बंदी घातली होती. 'हिंदूचे संघटन' हिंदू हितसंबंधाची जोपासना आणि 'हिंदू राष्ट्र' ही आरएसएसची उद्दिष्टे आहेत. म्हणजेच आरएसएस, विश्व हिंदू परिषद किंवा वनवासी सेवा आश्रम, इत्यादी संघटना विधायक स्वरुपाचे कार्य करत असल्या तरी त्या जमातवादी आहेत. याचा अर्थ असा होत नाही की, पक्षाबाह्य संघटनांची स्वतःची विशिष्ट राजकीय विचारसरणी किंवा त्यांच्यावर विशिष्ट राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव नसतो. वस्तुतः गेल्या दोन दशकात अस्तित्वात आलेल्या बहुसंख्य कृतिशिल संघटना व गटांवर नव डाव्या विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. तत्पूर्वी अस्तित्वात असलेल्या अनेक संघटना स्वतःला गांधीवादी किंवा सर्वोदयी म्हणून घ्यायच्या. सामाजिक परिवर्तन, अन्यायाविरुद्ध संघर्ष, आर्थिक विषमता आणि शोषणाविरुद्ध लढा, शोषित गटांना संघटित करणे अशा प्रकारचे विचार आणि कार्यक्रम पक्षबाह्य कृतिशील गटांच्या बाबतीत आढळून येतात. या संघटनांची कोणत्याही विशिष्ट राजकीय पक्षाशी बांधिलकी नसते. विधायक कार्य करताना अशा संघटना शासनाशी सहकार्य आणि वेळोप्रसंगी संघर्ष करण्यास तयार असतात. ग्रामीण विकासाच्या उपक्रमात अशा संघटनांच्या कार्यभाग उपयुक्त ठरू शकेल. असे मत १९५० साली व्ही. टी. कृष्णमाचारी समितीने आणि १९५७ साली बलवंतराय मेहता समितीने व्यक्त केले होते. अशोक मेहता समितीच्या अहवालात सामाजिक न्याय किंवा

अन्यायनिर्मूलन समितीत आणि जिल्हा स्तरावरील नियोजनात अशा संघटना उपयुक्त भूमिका पार पाडावी, ही भूमिका घेण्यात आली होती. सातव्या पंचवार्षिक योजनेत विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीत स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्यात आले होते. म्हणजेच अशा बिगर शासकीय संघटना विकास कार्यक्रमांत शासकीय यंत्रणांशी सहकार्य करतात. सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने राजकीय पक्ष किंवा शासनाची निवडत नसलेल्या या संघटना देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात महत्वपूर्ण कामगिरी पार पाडू शकतील.

ब. **स्वयंसेवी संघटनाचा उदय -**

भारतात रचनात्मक आणि संघर्षात्मक विधायक कार्याचा प्रारंभ विसाव्या शतकात झाला. रवींद्रनाथ टागोर यांचा व त्रावणकोर-कोचीन संस्थानातील मार्तंडम् प्रकल्प हे सुरुवातीच्या काळातील रचनात्मक क्षेत्रातील उल्लेखनीय प्रकल्प आहेत. भारतीय स्वातंत्र्य युद्धाच्या अखेरच्या पर्वात, महात्मा गांधींनी राजकीय चळवळीला सामाजिक चळवळीचे परिमाण जोडले. सामाजिक कार्य हे राष्ट्रकार्य समजून त्यात स्वतःस झोकून देणारी एक पिढी निर्माण झाली. त्यातून व्यक्तिविशिष्ट अशी सामाजिक कार्याची रोपटी देशात ठिकठिकाणी रुजली व वाढली. नेहरुकाल संपताना आर्थिक व सामाजिक समतेबाबत भ्रमनिरास होऊ लागला होता. नियोजनाची दीर्घकालीन प्रक्रिया स्पर्धात्मक आणि साखळी गटांना लाभाची अशीच राहणार हेही स्पष्ट झाले. आधी उत्पादन मग विभाजन, सरकारीकरण म्हणजे समाजवाद, विकासाचा 'झिरप' सिद्धांत, औद्योगिकरणांतून दारिद्रय निमूलन आणि परकीय भांडवल परकीय चलनांतून आर्थिक स्वातंत्र्य हे सर्व आकर्षक असे आर्थिक सिद्धांत व्यवहारात फोल ठरले. या निराशाजनक वातावरणात साधारणतः १९७५ नंतर संस्थानिहाय सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. अनेक स्वयंसेवी संस्था गरिबांचे प्रश्न घेऊन उभ्या राहू लागल्या आता संघटित चळवळीचे पर्व सुरु झाले. अशा परिवर्तनवादी संघटना किंवा कृतिगटांवर नवीन डाव्या विचारसरणीची प्रभाव होता. त्याने प्रेरित होऊन शहरी भागातील मध्यमवर्गीय सुशिक्षित आणि ध्येयवादी तरुणवर्ग समाजपरिवर्तनाच्या या चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभागी झाला. १९७० च्या दशकात पुरोगामी विचारसरणींचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय पक्षांशी किंवा कामगार संघटनांशी नाते न सांगता अशा पक्षबाह्य, स्वायत्त संघटनाना सत्ताधारी पक्षाने आणि समाजातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक सत्ता उपभोगणाऱ्या सवर्ण जातींनी व सधन वर्गाने तीव्र विरोध केला. भाजपासारख्या प्रतिगामी राजकीय पक्षांबरोबरच साम्यवादी पक्षासारख्या पुरोगामी पक्षांनी त्यांच्याकडे संशयाने पाहिले. प्रत्यक्षात मात्र दोन दशकांनंतरही राजकीय सत्तास्पर्धेत न उतरता, पुरोगामी विचारांशी बांधिलकी सांगणारे, परिवर्तनवादी गट / लोकसंघटना अजूनही टिकून आहेत. तसेच त्यांची संख्या वाढतच आहे. आज अशी स्थिती आहे की, ग्रामीण आणि शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या संपन्न वर्ग भांडवली विकासाचा कार्यक्रम राबविण्यासाठी या संघटनांचा

उपयोग करीत आहे. संकुचित स्वार्थ, जातियता, धर्मवाद, प्रादेशिकवाद ह्यांच्या प्रभावाखाली भ्रष्टाचारी नोकरशाही जो कार्यक्रम राबविण्यासाठी संपूर्णपणे अपयशी ठरला आहे, तो कार्यक्रम ह्या संघटनांकडून अंमलात आणावा, अशा योजना आखल्या गेल्या. राजकीय पक्षांना, ह्या संघटना राजकीय सत्तासंघांत आपल्या प्रतिस्पर्धी नाहीत अशी खात्री पटल्याने, त्यांच्या अस्तित्वावर घाला न आणता ते सत्तेच्या राजकारणात वेळ पडेल तेव्हा त्यांचा तात्पुरता उपयोग करून घेत आहेत. स्थानिक पातळीवर संघटनांमागे समाजातील काही समाजगट निश्चितपणे उभे राहिले आहेत. थोडक्यात, अशा कृतिगटांचे आणि लोकसंघटनांचे अस्तित्व आता प्रस्थापितांनी मान्य केले आहे.

**क. शासन व स्वयंसेवी क्षेत्रात सामजस्य प्रस्थापित व्हावे यासाठी तरतुदी –**

सातव्या पंचवार्षिक योजनेच्या सुधारित आराखड्यात पक्षबाह्य कृतिशील गटांचे 'सरकारीकरण' करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शासन आणि स्वयंसेवी क्षेत्रात सामजस्य प्रस्थापित व्हावे यासाठी खालील तरतुदी करण्यात आल्या.

- स्वेच्छिक संस्थांनी गरिबांच्या उत्थानासाठी शासनांच्या प्रयत्नांना पूरक ठरणारी भूमिका पार पाडावी.
- साध्या अभिनव व कमी खर्चिक उपक्रमांसाठी मर्यादित साधनांसह अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचण्यात व लोकांना गतिमान करण्याची भूमिका बजवावी.
- ग्रामीण भागातील अंतिम व्यक्तीपर्यंत विकासाची गंगा झिरपावी, आता त्यातून स्थानिक न्याय वितरण साध्य व्हावे यासाठी प्रयत्न करावे.
- विविध माहितींचे गरजूंपर्यंत प्रसारण करावे.
- स्वयंपूर्ण व स्वावलंबनाकडे सामुदायिक वाटचाल व्हावी म्हणून धडपड करावी.
- उपलब्ध साधनसामुग्री, मानवी बळ, तंत्रकौशल्ये यांच्या पर्याप्त उपभोगाद्वारे ग्रामीण समुदायाचा विकास घडवून आणणे.
- तंत्रज्ञानाचे सुलभीकरण करून ते ग्रामीण भागात उपलब्ध करून देणे.
- तळागाळाच्या विकासासाठी गतिमान होतील असे कार्यकर्ते घडविणे.
- विविध विकास कामांसाठी लागणारी धनसंपदा लोकवर्गणीतून उभी करुन, स्वावलंबनातून स्वविकास साधावा म्हणून त्यांना प्रेरित करणे.
- ग्रामस्थानांना जनजागरणातूनच संघटित करणे, जेणेकरून त्यांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध सेवा सुविधांच्या दर्जेदारपणाची मागणी करुन प्रशासकीय यंत्रणेला सामाजिक देयतेची वारंवार जाण करून देण्यासाठी सजग राहतील.

तसेच सातव्या योजनेच्या मसुद्यात लोकसहभाग प्राप्तीसाठी, शासन व लाभार्थी यांच्यातील दुवा म्हणून स्वयंसेवी संस्थांनी महत्वाची भूमिका पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**ड. महाराष्ट्रातील स्वयंसेवी संघटनांची ठळक वैशिष्ट्ये -**

देशाच्या इतर भागांप्रमाणेच उदार विचारसरणीच्या परंपरा असलेल्या महाराष्ट्रातही समाज परिवर्तनाची चळवळ व्यापक प्रमाणात अस्तित्वात आहे. सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात कार्य

करणाऱ्या संघटनांची संख्या दोन हजाराहून अधिक आहे. तर महाराष्ट्रातील अशा मान्यताप्राप्त संघटनांची संख्या १४१ आहे. अश्या स्वयंसेवी संघटनांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) प्रस्थापितांच्या व परिवर्तनवादी संघटना** : बहुसंख्य स्वयंसेवी संस्थापैकी काही 'प्रस्थापितां'च्या संस्था आहेत. काही संघटना परिवर्तनवादी क्रियाशील चळवळी आहेत. लायन्स क्लबपासून ते कुष्ठरोग्याकरिता कार्य करणाऱ्या बाबा आमटे यांच्या संघटना प्रस्थापित गटातल्या आहेत. अशा संस्था व संघटना शिक्षणप्रसार, अपंग संगोपन, धर्मादाय स्वरुपाचे कार्य करतात. अशा प्रकारच्या बहुसंख्य संस्थांचे कार्य व अस्तित्व शासकीय अनुदानावर, परकीय मदतीवर अवलंबून असते. स्वातंत्र्योत्तर काळात अशा प्रकारे या संघटनांचे उदंड पीक आलेले आहे. अशा प्रकारच्या संस्थाकडून समाज प्रबोधन किंवा परिवर्तनाचे अपेक्षा बाळगता येत नाही. याउलट, राष्ट्र सेवा दल, आंतरभारती, युवक क्रांती दल, देवदासी मुक्ती संघटना, अंधश्रद्धा निर्मूलन संघटना, भटक्या विमुक्तांची संघटना, आदिवासी क्षेत्रात कार्य करणान्या भूमिसेना सारख्या संघटना परिवर्तनवादी आहेत. अशा प्रकारच्या स्वयंसेवी संघटना या कृतिशील व ध्येयवादी कार्यकर्त्यांचे संघटन असते. त्यांचे कार्य आंदोलन, लोकशिक्षण किंवा लोकजागृतीच्या पातळीवर चालते. समाजप्रबोधन आणि समाज परिवर्तन हे त्यांचे प्रमुख ध्येय असते. सरकारी अनुदान किंवा परकीय मदत ऐवजी, लोकांना आपल्या कार्याचे महत्व पटवून देवून, जमा झालेल्या लोकवर्गणीवर, त्याचे कार्य चालते. काही परिवर्तनाबादी संघटना, काळाच्या ओघात आणि खंबीर नेतृत्वाच्या अभावी, स्थितिशील किंवा प्रस्थापित बनतात.

**२) मर्यादित कार्यक्षेत्र** : उपेक्षित व शोषित समाजात काम करणारे अनेक गट व लोकसंघटना आहेत. यापैकी बरेच गट एका विशिष्ट कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करतात. आदिवासी जमिनीच्या प्रश्नावर व त्यांचावर होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध फार मोठे काम धुळे जिल्ह्यात झाले. मात्र या काळात आपल्या विभागात शाळा व्यवस्थित चालतात किंवा नाही, आदिवासी मुले मुली शाळेत जातात किंवा नाही यांकडे मुळीच लक्ष दिलेले नाही. काही गट काम करीत असलेल्या भागात महसूल, वनखाते आणि पोलीस याच्या जुलूम जबरदस्तीला बराच वचक बसला आहे. काही अत्याचार झाला किंवा जबरदस्ती झाली की लोक संघटनेकडे धाव घेतात आणि कार्यकर्ते केवळ संघर्षाचे ठेकेदार बनतात.

**३) नेतृत्व** : अशा संघटनेचे नेतृत्व बहुतांशी बाहेरचे असल्याचे दिसून येते. स्थानिक नेतृत्वापेक्षा शहरी भागातून आलेले नेतृत्व अधिक अनुभवसंपन्न असते. प्रतिकूल परिस्थितीत लढताना ह्या अनुभवाचा फायदा होतो. शासनाची प्रस्थापित व संघटित यंत्रणांशी संघर्ष करताना हे नेतृत्व दबून जात नाही व या गुणांचा जनमानसावर फार मोठा प्रभाव पडतो. संघटनेच्या निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकणारे बहुतांशी प्रमुख कार्यकर्ते बाहेरून आलेले असतात. त्यांच्यामध्ये लोकांना आकर्षून घेण्याची शक्ती असल्यास लोकांना संघटित करण्यासाठी त्यांचा फार मोठा उपयोग होतो. संघटनेच्या कामात

त्यांचा सर्वाधिक सहभाग असतो आणि निर्णयप्रक्रियेवर त्यांचे वर्चस्व असते. जेव्हा संघटना वाढत असते, तेव्हा प्रमुख कार्यकर्त्यामध्ये संघर्ष करण्याची जास्त ताकद असते. यश-अपयश स्वीकारण्याची तयारी असते. त्याबद्दल चर्चा करण्याचा मोकळेपणा असतो. कार्यक्रमांना यश आल्यानंतर संघटनेला जनसामान्यांकडून मान्यता मिळाल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये एक अहंकार येतो. त्यामुळे संघटनेच्या कार्यपद्धतीत ताठरपणा येऊ लागतो. विशेषतः अपयशाबद्दल चर्चा अभावानेच घडतात आणि कोणतेही बदल स्वीकारण्याचा मनमोकळेपणा नाहीसा होतो.

**४) कार्यपद्धती** : संघटनेच्या कार्यपद्धतीत काही व्यक्तींना अधिक वाव मिळतो, यशाचे अधिक श्रेय मिळते. विभागणीला, संघटनेतील काही व्यक्ती विरोध करतात. संघटनेवर एकाधिकारशाही गाजवणाऱ्या नेतृत्वाच्या विरोधात संघटनेत गट निर्माण होतात. त्यातून कार्यकर्त्यांच्या संबंधात कटूता येते. विरोध करणाऱ्या व्यक्ती हळूहळू संघटनेपासून दूर होऊ लागतात व हे संघटनेवर नियंत्रण मिळवलेल्या गटाच्या दृष्टीने अतिशय सोयीस्कर असते. संघटनांमध्ये जुने कार्यकर्ते व नवे कार्यकर्ते यांच्यात ज्येष्ठ-कनिष्ठ नाही तर अनेकवेळा मालक-नोकर असे संबंध असल्याचा आभास होतो.

सामाजिक काम सुरु करताना आपण लोकांबरोबर काम करावे, परिवर्तनासाठी होणाऱ्या संघर्षाच्या प्रक्रियेतून स्थानिक नेतृत्व उभे राहील व परिवर्तनाची लढाई पुढे घेऊन जाईल असा आशावाद मनात असतो. या प्रक्रियेतून स्थानिक नेतृत्व उभे राहात असते पण संघटनांच्या कार्यपद्धतीत या नेतृत्वाला आपले गुण सिद्ध करण्यासाठी काही वाव नसतो. संघटनेवर नियंत्रण करणारा गट, संघटनेची कार्यपद्धती या नेतृत्वाची उभारी नष्ट करून टाकतो. संघटना म्हणजे नेता हे समीकरण रूढ होते. पर्यायाने संघटना लोकाभिमुख होण्याऐवजी नेताभिमुख होते. संघटनेने केलेल्या कार्याबद्दल त्याच्या नेतृत्वाचा गुणगौरव अलिकडे वारंवार घडून येत असल्याचे दिसते. संघटनेचे कामकाज लोकाभिमुख करण्याची गरज असताना एखाद्या व्यक्तीला असे पारितोषिक देणे म्हणजे त्या व्यक्तीच्या कामाला त्याच संघटनेतील इतर कार्यकर्त्यांच्या कामापेक्षा मोठे करणे होय.

**५) ध्येयवादी कार्यकर्त्यांची अत्यल्प उपलब्धता** : धर्म व जातिव्यवस्थेच्या, श्रेणीबद्ध परंपरागत निष्ठा आणि संकुचित मानसिकता यामुळे मानवतावादी दृष्टिकोण असणारे कार्यकर्ते किंवा ध्येयवादी कार्यकर्ते मिळणे दुरापास्त झालेले आहे. परिवर्तनाच्या व कल्याणाचा विचार देखील जातिनिष्ठ किंवा धर्मनिष्ठ भूमिकेतूनच केला जातो. जातिनिष्ठ व धर्मनिष्ठ मानसिकता आणि असंतुलित पद्धतीने होत गेलेला भांडवली विकास याच्या परिणामातून घडविले जाणारे व्यक्तिमत्व, याचे परिणाम कार्यकर्त्यांच्या निष्ठावर होतात. परिणामी परिवर्तनाचा विचार मांडणारे आणि व्यवस्थेला धक्का देणारे स्वयंसेवी संघटनांचे कार्यच परिणामकारकरीत्या उभे राहू शकत नाही. किंबहुना संसदीय राजकारणामुळे निर्माण केलेल्य संख्येच्या आणि सत्तेच्या राजकारणामुळे, विविध जाती-जमाती अस्मितेचे प्रश्न करून आपले हितसंबंध जोपासणावरच केंद्रित करीत आहेत. त्यामुळे परिवर्तनाचा विचार मांडणाऱ्या

स्वयंसेवी संघटना व चळवळी क्षीण होताना दिसत आहेत. परिणामी सर्व प्रबोधनवादी संघटनांचे रुपांतर काम करणाऱ्या प्रस्थापितामध्येच होत चालले आहे. सामाजिक जाणिवांच्या आणि कृतिशील बांधिलकीच्या भावनांच्या अभावाला जसे धर्मजातीव्यवस्थेवर आधारित समाजरचना कारणीभूत आहे, तसेच भारतीय जनमानसांवर प्रभुत्व गाजविणाऱ्या कर्म सिद्धान्ताचा प्रभाव देखील जबाबदार आहे. कर्मसिद्धांन्तामुळे दुसऱ्याच्या दुःखाचा निराकरणाबाबत, ते ज्यांचे त्याचे भाग्य असते. या भावनेमुळे, उदासिनता निर्माण होते. जो तो आपापल्या कर्माचे फळ भोगत असतो, या समाजामुळे एकूण सामाजिक कार्याबद्दलच्या निष्ठाच ठिसूळ होतात आणि स्वयंसेवी संघटनांतर्फे घेतले जाणारे बरेचसे तथाकथित सामाजिक कार्य, हे पापपुण्याचे गणित मांडून केलेले धर्मादायी संस्थांचे कार्य बनते.

**६) अर्थकारण :** सुरुवातीच्या काळात लहान संघटनेच्या कामाचे स्वरुप, भौगोलिक क्षेत्र आणि आर्थिक गरजा कमी असतात. संघटनेनेच कार्य वाढल्यानंतर निधीची गरज भासू लागते. अधिक निधीची गरज पूर्ण करण्याकरिता दोन पर्याय असतात. ज्या लोकांबरोबर काम करत असतो त्या जनसमुहातून निधी उभा करणे किंवा जनजागरणाच्या कामाकरिता निधी देणाऱ्या देशी परदेशी संस्थांकडून निधी मिळविणे, जनसामान्यांकडून निधी उभारणे दुरापास्त होत चालल्याने, बहुसंख्य संघटना शासकीय अनुदान / परदेशी संस्थाकडून निधी मिळविण्याचा मार्ग स्वीकारतात. जनजागरणाच्या कामासाठी निधी देण्यारया अनेक देशी परदेशी संस्था भारतात काम करतात. या संस्थांना त्यांची स्वतःची ध्येय धोरणे, कार्यपद्धती आहे. या संस्था कालबध्द कार्यक्रमांसाठी, वेगवेगळया प्रकल्पासाठी निधी देतात. अशा प्रकारचे प्रकल्प मिळविणे, राबवणे, त्यांचा पाठपुरावा करणे, त्यांचे अहवाल पाठवणे हेच संघटनेचे मुख्य काम होते. असे घडले की काही गोष्टी अपरिहार्य ठरतात. जनसहभाग हा सवार्थाने सहभाग न राहता तो केवळ प्रकल्पाचे लाभधारक म्हणून राहतो. संघटनेतील प्रकल्प राबवणाऱ्या गटाचे संघटनेवरील नियंत्रण वाढते. संघटनेची सुरुवातीची ध्येयधोरणे, लोकांना विश्वासात घेऊन काम करण्याच्या पद्धती यात हळूहळू बदल घडू लागतो. लोकांबरोबर कामाच्या ऐवजी लोकांसाठी काम असा एक महत्वाचा फरक घडून येतो. लोकांमध्ये व संघटनेत अंतर पडू लागते. लोकसहभागितेत फरक पडल्यानंतर संघटनेच्या वाढीवर त्याचा परिणाम होतो.

**इ. महाराष्ट्रातील स्वयंसेवी संघटनांच्या मर्यादा -**

गेल्या दोन दशकात शेकडो पक्ष्यबाह्य कृतिगटांनी सामाजिक परिवर्तनाचे कार्य हाती घेतले असले तरी त्यांना अपेक्षित असे यश मिळाले नाही. किंबहुना त्यांच्या कार्यावर काही मुलभूत मर्यादा पडल्या. त्या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

**१) अभिजन वर्गाची रचना :** स्वातंत्र्यपूर्व काळापासून इंग्रजी शिक्षण व ब्रिटिश कारभाराच्या प्रभावामुळे व्यापारी, औद्योगिक आणि प्रशासकीय सत्ता ही पारंपारिक आर्थिक आणि सांस्कृतिक अभिजनांच्या हाती गेली. अभिजनवर्गाची मनोवृत्ती ही पारंपारिक धार्मिक-सांस्कृतिक श्रेष्ठत्वाची व

जातीय, वर्गीय मक्तेदारीचीच राहिली. गेल्या ६० वर्षात भारतातील शासन, प्रशासन आणि आर्थिक क्षेत्रातील सत्ता ही याच अभिजन वर्गाच्या हाती केंद्रीत झाली आहे. मध्यम जाती-जमाती, आपल्या नव समृद्धी व जाती संघटनांची संख्यात्मक शक्ती यांच्या आधाराने सत्तेच्या या संरचनेत सामील झालेल्या आहेत. या अभिजन वर्गाचा 'विकास' हा परवलीचा सिद्धांत बनलेला असून 'स्थिरता' हे उद्दिष्ट बनले आहे. तसेच आपली पारंपारिक मूल्ये, संस्कृती, भाषा सर्व समाज घटकांवर, राष्ट्रीयतेच्या नावाने लादणे, हे आपल्या मक्तेदारी आणि हितसंबंध टिकविण्यासाठी आवश्यक वाटत असते.

**२) संप्रदायवादी संघटना** : पारंपारिक भारतीय समाजातील जनसामान्यांवर संप्रदायवादाचा पगडा आहे. संप्रदायवादी पक्ष किंवा संघटना तथाकथित धर्माचे गोडवे गातात आणि धार्मिक प्रश्नांवर जनमत संघटित करून दारिद्रय, विषमता, आर्थिक शोषण सारख्या मुलभूत समस्येपासून सर्वसामान्य लोकांचे लक्ष विचलित करतात. धर्माच्या नावाने सामाजिक विषमतेचे समर्थन केले जाते किंवा सोयिस्कररीत्या त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. अशा संप्रदायवादी पक्ष व संघटनांचा प्रभाव अलिकडच्या काळात वाढला आहे. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत तो मोठा अडथळा ठरणार आहे.

**३) आर्थिक समस्या** : आर्थिकदृष्ट्या सबळ वर्ग आपली ही सबळता वाढविण्याच्याच प्रयत्नात असतो. स्पर्धामय अर्थव्यवस्थेतील व्यक्तिगत लाभवृद्धीच्या नीतीने तो इतर समाज गटाच्या शोषणाची व त्यातून टिकून राहणारा दारिद्र्याची प्रक्रिया चालू ठेवतो. त्यातच अति लोकसंख्येचा प्रश्न, वाढत्या बेकारीच्या निर्मितीतून दुर्बल गटांना उत्पन्न प्राप्तीची संधी उपलब्ध होत नाही.

**४) अविकसित ग्रामीण भाग** : शहरे आणि खेडी यांच्या विकासातले अंतर वाढत आहे. सर्व सुविधांनी, संपन्नता शहरांतून केंद्रित करीत असतानाच, कमी दर्जाच्या सुविधा शिक्षण व आरोग्य सेवा, वाहतूक व दळणवळणाच्या अपुर्या सोयी, रोजगाराची मर्यादित उपलब्धता इत्यादी ग्रामीण भाग अविकसित राहण्याची काही कारणे आहेत. ग्रामीण विकासाच्या समस्या जटिल असल्याने, स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांना लाभणारे यश मर्यादित आहे.

**टीप. १. 'सामाजिक वनीकरण' पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम.**

**१. प्रास्ताविक -**

पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांच्या आंतरसंबंधाची चर्चा सर्वप्रथम रेचेल केरोन Silent Speak या प्रस्तावात १९६२ साली करण्यात आली. त्यानंतर जागतिक स्तरावर पर्यावरणात्मक प्रश्नांची चर्चा आणि पर्यावरण संवर्धनाच्या चळवळी १९७० च्या दशकात उदयास आला. भारतात वनसंवर्धनाची चिपको चळवळ सुंदरलाल बहुगुणा यांनी उत्तराखंडमध्ये तर नर्मदा नदीतील सरदार सरोवर या पाटबंधारे प्रकल्पाच्या विरोधात मेघा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलन सुरु केले. यापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात स्वयंसेवी संस्थांनी पर्यावरण संवर्धनाची विविध उपक्रम हाती घेतले. अण्णा हजारे यांच्या राळेगणसिद्धी, विजयअण्णा बोराडे यांच्या आडगाव प्रकल्पात, विजयराव साळुंखे यांच्या पाणी पंचायत प्रकल्पात, डॉ. द्वारकादास लोहिया यांच्या मानवलोक प्रकल्पात, वसंतराव गंगावणे यांच्या

गोकुळ प्रतिष्ठान प्रकल्पात पर्यावरण जागृती आणि पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम हाती घेण्यात आले. स्वयंसेवी संस्थांच्या पुढाकाराने पर्यावरण संवर्धनाच्या व्यापक प्रकल्प मोहन धारीया यांच्या वनराई स्वयंसेवी संस्थेने हाती घेतला.

**२. सामाजिक वनीकरण -**

सामाजिक वनीकरण हा पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण शासकीय कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम स्थानिक स्तरावरील बिगर-शासकीय स्वयंसेवी संघटनांच्या सक्रिय सहभागाद्वारा राबवला जातो. या अंतर्गत पडिक जमीन व खाजगी मालकीची लागवडीखाली नसलेल्या जमिनीवर वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या कृती स्थानिक जनतेच्या / संघटनांच्या सहकार्याने हाती घेतले जातात. आंतरराष्ट्रीय विकास संस्थेच्या सहकार्याने महाराष्ट्र शासनाने ऑक्टोबर १९८२ पासून सामाजिक वनीकरण हा पर्यावरण संवर्धनाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यात महाराष्ट्र शासन व आंतरराष्ट्रीय विकास संघटन या कार्यक्रमाच्या खर्चाची जबाबदार स्वीकारतात. वनीकरणासाठी लागणारी रोपे शासकीय रोपवाटिकातून विनामूल्य उपलब्ध करून दिले जातात. राज्यातील अनेक गावातील २,१२,००० हेक्टर जमीन सामाजिक वनीकरणाखाली आणण्यात आली आहे. सन १९९२-९३ पासून खाजगी मालकीच्या जमिनीवर वृक्ष लागवड आणि कुरण विकास हे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. राज्यातील पाच प्रमुख शहरांत कुरण विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. राज्यातील जिल्ह्यांच्या मुख्य ठिकाणी १० हेक्टर क्षेत्रात स्मृतिवनांची उभारणी करण्यात आली आहे. राज्यातील कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे आणि स्वयंसेवी संस्थांना सामाजिक वनीकरण उपक्रमात सक्रियरित्या सहभागी करून घेण्यात आले आहे.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक वनीकरण कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. उपसंचालकाच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक वनीकरण यंत्रणेद्वारा जळाऊ लाकडासाठी वृक्ष लागवड, रोपवाटिका, शाळा, सरकारी कार्यालयात रोपवाटिका, पश्चिम घाट, विकास कार्यक्रम, महामार्गावर वृक्षपट्टा योजना अन्य रस्त्यांवर दुतर्फा वृक्षलागवड इत्यादी वनीकरणाचे उपक्रम हाती घेतले जातात. लोकांनी वृक्षांची लागवड करावी आणि त्यांची जोपासना करावी असा संदेश या कार्यक्रमाद्वारा खेडोपाडी पोहचला आहे. सन २००३ पासून राज्यात संयुक्त वनीकरण योजना राबवली जात आहे. वनांचे संरक्षण, अवैध प्रतिबंध, वनक्षेत्रावरील अतिक्रमणे हटवणे असे उपक्रम हाती घेतले गेले. सन २००६ मध्ये नवीन राष्ट्रीय पर्यावरण धोरणाच्या अंतर्गत जंगलावर उपजीविका असणाऱ्यांना पूर्ण शाश्वती पर्यावरण संरक्षण, पर्यावरणात स्थानिक संस्थांचा सहभाग इत्यादी बाबी समाविष्ट आहेत.

सामाजिक वनीकरणाच्या बरोबरीने वनशेती हा उपक्रमही राबवला जातो. खाजगी मालकीच्या शेतजमिनीचा पूर्ण बापर व्हावा यासाठी वन उत्पादने, चारा, फळ लागवड इत्यादी उत्पादने शेतीच्या बरोबरीने घेतली जातात. त्यामुळे वन उत्पादनात व शेतकऱ्यांच्या वैयक्तिक उत्पादनात वाढ होते. कृषी विद्यालये, कृषी विज्ञानकेंद्र शेतकऱ्यांना या कार्यात मार्गदर्शन करतात.

**टीप. २. 'पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम' एक पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम.**

**१. प्रास्ताविक -**

पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांच्या आंतरसंबंधाची चर्चा सर्वप्रथम रेचेल केरोन Silent Speak या प्रस्तावात १९६२ साली करण्यात आली. त्यानंतर जागतिक स्तरावर पर्यावरणात्मक प्रश्नांची चर्चा आणि पर्यावरण संवर्धनाच्या चळवळी १९७० च्या दशकात उदयास आला. भारतात वनसंवर्धनाची चिपको चळवळ सुंदरलाल बहुगुणा यांनी उत्तराखंडमध्ये तर नर्मदा नदीतील सरदार सरोवर या पाटबंधारे प्रकल्पाच्या विरोधात मेघा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलन सुरु केले. यापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात स्वयंसेवी संस्थांनी पर्यावरण संवर्धनाची विविध उपक्रम हाती घेतले. अण्णा हजारे यांच्या राळेगणसिद्धी, विजयअण्णा बोराडे यांच्या आडगाव प्रकल्पात, विजयराव साळुंखे यांच्या पाणी पंचायत प्रकल्पात, डॉ. द्वारकादास लोहिया यांच्या मानवलोक प्रकल्पात, वसंतराव गंगावणे यांच्या गोकुळ प्रतिष्ठान प्रकल्पात पर्यावरण जागृती आणि पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम हाती घेण्यात आले. स्वयंसेवी संस्थांच्या पुढाकाराने पर्यावरण संवर्धनाच्या व्यापक प्रकल्प मोहन धारीया यांच्या वनराई स्वयंसेवी संस्थेने हाती घेतला.

**२. सर्वकक्ष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम :**

महाराष्ट्रातील जलसिंचनाखालील क्षेत्र १८% असल्याने, कृषी व्यवसाय पावसावर अवलंबून असतो. महाराष्ट्रातील ८२% क्षेत्र कोरडवाहू असल्याने, उपलब्ध जलसंपत्तीचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने सर्वकक्ष पाणलोट क्षेत्र कार्यक्रम आणि त्यासाठी ग्रामीण भागात जलसंधारणाचे उपक्रम १९८० च्या दशकापासून हाती घेतले आहे. या कार्यक्रमाच्या कार्यवाहीत मानवलोक, गोकुळ प्रतिष्ठान, पाणी पंचायत इत्यादी स्वयंसेवी संस्था आणि अण्णा हजारे यांनी राळेगण सिद्धी व आडगाव बुद्रुक येथे हाती घेतलेले प्रकल्प उल्लेखनीय आहेत.

**३. सर्वकक्ष पाणलोट खालील बाबी -**

१. जमिनीची धूप थांबविण्यासाठी सपाटीकरण, बांध बंदिस्ती, जमिनीच्या उताराला आडवी वळणे घालणे इत्यादी. २. गाळ थांबविण्यासाठी ओहळ बंदी, नाल्यावर सिमेंट काँक्रिटचा बांध घालणे. लागवडीस अयोग्य जमिनीवर वृक्षारोपण व गवत लागवड करणे. ३. जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी पीक पद्धती, मशागत पद्धतीत योग्य बदल घडवून आणणे. ४. सार्वजनिक जमिनीची निगराणी ठेवणे. ५. चराई बंदी किंवा नियंत्रित चराईचा अवलंब करणे. ६. शिवारातील रस्त्यांचे नियोजन करणे. ७. गावठाणचा विकास करणे उदा. आरोग्य, सांडपाणी पिण्याचे पाणी, शिक्षण गावातील रस्ते इत्यादींची सोय करणे. ८. सर्व उपक्रमात स्थानिक लोकांचा सहभाग मिळविणे.

**४) शासकीय प्रयास :**

जल, भूमी व जंगल यांचे ग्रामीण आर्थिक विकासातील महत्त्व ओळखून या साधनांच्या संवर्धनाचा प्रयत्न भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून केला आहे. विशेषत: जंगलांचा -हास व

जमिनीची धूप चोपविण्यासाठी विशेष प्रयत्न सतत केले जात आहेत. महाराष्ट्रातही जुलै १९८३ पासून जल, भूमी व जंगल संवर्धनासाठी ठोस प्रयत्न व्हावेत म्हणून सर्वकष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत जमिनीची उत्पादकता टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी दर हेक्टरी रु. ३००० प्रमाणे मंजूर करून पूर्णतः शासकीय खर्चाने राबविण्याची तरतूद आहे. म्हणजेच १२०० हेक्टर क्षेत्र असलेल्या शिवारासाठी ३६ लक्ष रुपये शासनाच्या मृदसंधारण खात्यामार्फत खर्च केले जातात व त्यासाठी पुढीलप्रमाणे शासकीय यंत्रणेची रचना अस्तित्वात आहे.

सर्वकष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यासाठी शेती सहाय्यक हा तळाशी असलेला शासकीय अधिकारी आहे. त्याच्याकडे २ किंवा ३ लहान पाणलोट क्षेत्राचं काम असते. ५ शेती सहाय्यकाच्या कामावर निगराणी ठेवण्यासाठी एक शेती पर्यवेक्षक असतो. या अशा ५ शेती पर्यवेक्षकांच्या मिळून एक उपविभाग तयार होतो. तर ५ उपविभागीय कार्यालयाचे नियंत्रण एका विभागीय कार्यलयामार्फत केले जाते.

**५) राळेगण सिद्धी व आडगाव बुद्रुक प्रकल्प :**

अहमदनगर जिल्ह्याच्या कायम अवर्षणग्रस्त पारनेर तालुक्यात राळेगणसिद्धी, तर मराठवाड्याच्या औरंगाबाद जिल्ह्यात आडगाव बुद्रुक ही गावे आहेत. अत्यल्प व अनियंत्रित पर्जन्यमान आणि त्यातून उद्भवणारे दुष्काळ ही या दोन्ही गावांची समान वैशिष्ट्ये होती. अण्णा हजारे या भारतीय सैन्यातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याला आपल्या गावाची परिस्थिती बदलली पाहिजे असे प्रामाणिकपणे वाटत होते. त्याकरिता त्यांनी राळेगणसिद्धी विकास प्रतिष्ठानाची स्थापना केली. विजय अण्णा बोराडे मराठवाडा विकास मंडळ या स्वयंसेवी संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाने सर्वकष पाणलोट क्षेत्र कार्यक्रम आपल्या गावात यशस्वीपणे राबवला. त्यांच्या गावांचे लागवडीखालील क्षेत्र १५०० हेक्टर इतके होते.

**टीप. ३. 'वनराई' एक पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम.**

**१. प्रास्ताविक -**

पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांच्या आंतरसंबंधाची चर्चा सर्वप्रथम रेचेल केरोन Silent Speak या प्रस्तावात १९६२ साली करण्यात आली. त्यानंतर जागतिक स्तरावर पर्यावरणात्मक प्रश्नांची चर्चा आणि पर्यावरण संवर्धनाच्या चळवळी १९७० च्या दशकात उदयास आला. भारतात वनसंवर्धनाची चिपको चळवळ सुंदरलाल बहुगुणा यांनी उत्तराखंडमध्ये तर नर्मदा नदीतील सरदार सरोवर या पाटबंधारे प्रकल्पाच्या विरोधात मेघा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलन सुरु केले. यापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात स्वयंसेवी संस्थांनी पर्यावरण संवर्धनाची विविध उपक्रम हाती घेतले. अण्णा हजारे यांच्या राळेगणसिद्धी, विजयअण्णा बोराडे यांच्या आडगाव प्रकल्पात, विजयराव साळुंखे यांच्या पाणी पंचायत प्रकल्पात, डॉ. द्वारकादास लोहिया यांच्या मानवलोक प्रकल्पात, वसंतराव गंगावणे यांच्या गोकुळ प्रतिष्ठान प्रकल्पात पर्यावरण जागृती आणि पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम हाती घेण्यात आले.

स्वयंसेवी संस्थांच्या पुढाकाराने पर्यावरण संवर्धनाच्या व्यापक प्रकल्प मोहन धारीया यांच्या वनराई स्वयंसेवी संस्थेने हाती घेतला.

**२. वनराई -**

वनराई ही पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात कार्य करणारी अग्रगण्य संस्था पुणे येथे माजी मंत्री स्व. मोहन धारीया यांनी १९८२ साली स्थापन केली. १९८६ साली या संस्थेची धर्मादाय संस्था म्हणून नोंदणी करण्यात आली. गेल्या ३६ वर्षात या संस्थेचा कार्यविस्तार महाराष्ट्रभर आणि शेजारच्या राज्यांतही झाला आहे. राष्ट्रीय स्तरावरील अग्रगण्य स्वयंसेवी संस्था अशी त्यास मान्यता मिळाली आहे. पर्यावरणविषयक शासकीय धोरणाची जडणघडण करण्यात धारीया व त्यांच्या सहकार्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. लोक सहभागातून पर्यावरण संवर्धन या तत्त्वविचाराची एकनिष्ठ राहून ही संस्था कार्य करते. पुण्यातील टेकड्यांवर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाने या संस्थेने आपल्या कामाची सुरुवात केली. आज महाराष्ट्रातील २५० हून अधिक खेड्यात संस्थेचा कार्यविस्तार झाला आहे. पर्यावरण संवर्धन आणि शेतीविषयक उपक्रमांद्वारा या गावांचा कायापालट झाला आहे. ती गावे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाली आहेत. हि संस्था शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्री - उपकरणे सामुहिक मालकीच्या तत्वाद्वारा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देते. त्यासाठी बँकांकडून कर्जपुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी सहकार्य करते. शेतीव्यतिरिक्त पशुसंवर्धन आणि वनशेतीचे उपक्रम हाती घेतले जातात. निरक्षरता निर्मूलन कुटुंब नियोजनाचा प्रचार व प्रसार, आरोग्यविषयक जाणीव जागृती, प्रत्येक घरात शौचालय व गोबर गॅस संयंत्र इत्यादी उपक्रम हाती घेतले जातात. भूमीहीन शेतमजूरांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून दिला जातो. अशा प्रकारे वनराई ही एक लोक चळवळ बनली आहे.

वनराईने १९९० साली एकात्मिक, ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमाची सुरुवात पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील गावडेवाड़ी येथे केली. त्यासाठी भारत सरकारच्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमातर्गत उपलब्ध असणारा निधी ग्रामस्थांना उपलब्ध करून दिला. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम हा स्वयं रोजगाराच्या निर्मितीद्वारा ग्रामीण दारिद्र्य निर्मूलनाचा उपक्रम आहे. दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबांना विकासाच्या व रोजगार निर्मितीच्या उपक्रमासाठी शासकीय निधी उपलब्ध करून देण्यात आला. अतिरिक्त अर्थसहाय्य वनराई संस्थेने पुण्यातील दानशूर व्यक्ती उद्योगपतींच्या सहकार्याने उपलब्ध करून दिले. गावडेवाडी गावात संस्थेने खालील उपक्रम हाती घेतले.

- शेतीबरोबर दुग्धव्यवसाय करण्यास ग्रामस्थांना प्रोत्साहन. सन १९९० मध्ये दूधाचे उत्पादन प्रतिदिवशी २०० लिटर होते, ते आज १२००० लिटर आहे.

- आधुनिक कृषीतंत्र व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कृषी उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली आहे. फळभाज्यांच्या उत्पादनात प्रोत्साहन दिल्याने टॉमेटोचे उत्पादन १२,५०० किलोवरून ६२,००० किलो इतके वाढले आहे. कृषीमालाच्या विपणनाची जबाबदारी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पार पाडण्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव बाढ झाली आहे.
- सामाजिक वनीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. गावाच्या परिसरात विविध जातींच्या ७००००० झाडांची लागवड करण्यात आली. गावामध्ये सिताफळ, आंब्याच्या झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली.
- गावामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शाळा सुरू करण्यात आल्या. त्यात संगणकविषयक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली.
- गावामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यात आली. ग्रामस्थांना आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.
- गावातील तरुणांना व्यावसायिक शिक्षण देणारे केंद्र सुरु करण्यात आले.
- गावात पर्यावरणाचे संवर्धन करण्यात आले.

आंबेगाव तालुक्यातील पथदर्शक प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर, संस्थेने पुणे जिल्ह्यातील १५ गावात ग्रामीण विकासाचे उपक्रम हाती घेतले. आधुनिक शेतीचे व जलसंवर्धनाचे उपक्रम या गावात हाती घेण्यात आले. वनराईचे कार्यकर्ते महाराष्ट्रातील इतर भागात गेले आणि ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांविषयी त्यांनी प्रबोधन केले. क्रमाक्रमाने महाराष्ट्रातील २५० गावात वनराई प्रणीत ग्रामीण विकास व पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम राबविले जात आहेत.